
एप्रिल २०१६ / पाने ७६ / किंमत ₹१०

# लोकराज्य

भारतीय संविधानाचे शिल्पकार
थोर समाजसुधारक
आर्थिक धोरणाचे धुरीण
दलितांचे कैवारी
आंतरराष्ट्रीय संबंधांचे जाणकार व भाष्यकार
सांप्रदायिक सद्‌भावना व सहिष्णुता प्रेरक
अंधश्रद्धेचे विरोधक
महिलांच्या समान हक्कांसाठी संघर्षरत
प्रखर देशभक्त
झुंजार पत्रकार, संपादक व लेखक
शांतताप्रेमी व अहिंसेचे पुरस्कर्ते
प्रभावी वक्ते
सच्चे लोकशाहीवादी
कामगारांच्या न्याय्य अधिकारांचे लढवय्ये
प्रखर विज्ञाननिष्ठ
शिक्षणाचे प्रेरणास्तंभ
शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी जागरुक
ज्ञानपुरुष व समताप्रेमी
निस्सीम ग्रंथप्रेमी
विचार स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते
ऊर्जा व जलसंसाधनाचे नियोजक

असामान्य : अद्वितीय

## प्रज्ञासूर्य



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
१२५ वर्ष
१८९१-१९५६
समता व सामाजिक न्याय वर्ष
२०१५-१६

# स्मारक महामानवाचे...




इंदू मिल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक शासनाच्या वतीने उभारण्यात येणार आहे. या स्मारकाचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ११ ऑक्टोबर २०१५ रोजी केले. या स्मारकाच्या नियोजित प्रतिकृतीची माहिती घेताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, राज्यमंत्री दिलीप कांबळे आणि इतर मान्यवर.

वर्ष ६७ वे | अंक १० | एप्रिल २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — प्रज्ञा गायकवाड

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

# प्रज्ञासूर्य

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील उपेक्षित आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याचे क्रांतिकारक कार्य केले. डॉ. आंबेडकर हे प्रकांडपंडित होते. ते चतुरस्र प्रतिभेचे धनी होते. आधुनिक भारताच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान हे अविस्मरणीय असे आहे. भारतीय महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क आणि अधिकार मिळावे यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाचा नवा इतिहास लिहिला. देशाच्या लोकशाहीला समर्थ आणि सक्षम बनवणारी घटना दिली. जगातील सर्वोत्कृष्ट अशा घटनांपैकी एक आपली राज्यघटना समजली जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त लोकराज्यच्या विशेषांकात अनेक मान्यवरांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व, कर्तृत्व व प्रतिभेच्या विविध पैलूंचे दर्शन घडवणारे लेख लिहिले आहेत.**



६ - ५३

### शासन शेतकऱ्याच्या शिवारात

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील जवळपास सर्व मंत्र्यांनी मराठवाड्यातील ३ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.




५८



५४

### शेतकऱ्यांसाठी २५ हजार कोटी रुपये

अर्थसंकल्प २०१६-१७ चे विश्लेषण व वैशिष्ट्ये

### दुष्काळमुक्तीला सिंचनाची जोड

जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांची विशेष मुलाखत..

६४

### दुष्काळग्रस्तांना दिलासा



दुष्काळग्रस्त भागातील जनतेच्या मदतीसाठी राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. पुढील तीन महिने टंचाई परिस्थितीशी सामना करण्याची जय्यत तयारी शासनाने केली आहे.

६२

### मागेल त्याला शेततळे...

यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये शेततळ्यांच्या निर्मितीसाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. दुष्काळी भागामध्ये मोठ्या प्रमाणात ही मोहीम ठिकठिकाणी राबवली जात आहे.




७२

## महिला धोरणाचा आरसा

महिला शक्तीला समर्पित मार्च २०१६ चा लोकराज्य अंक आवडला. यात महिलांसाठी माहिती असलेल्या विविध योजनांची दिलेली माहिती खूप उपयुक्त आहे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून काढलेला हा महिला विशेषांक राज्याचे महिला धोरण अधोरेखित करणारा ठरला. अंकातील महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे यांची विशेष मुलाखत, राज्यमंत्री विद्या ठाकूर यांनी महिलांशी साधलेला संवाद, याशिवाय महिला आयोगाच्या नवनियुक्त अध्यक्षा विजया रहाटकर यांची मुलाखत माहितीपूर्ण आहे. त्यासोबतच स्वच्छतेची सप्तपदी उपक्रमात राज्यभरातील महिलांनी घेतलेल्या पुढाकाराचा वृत्तांत वाचनीय आहे. 'मेक इन इंडिया'अंतर्गत महाराष्ट्राला मिळालेली गुंतवणुकीची संधी, लोणार या पर्यटन स्थळाची माहिती उपयुक्त आहे. महिला आयएएस अधिकारी विजया जाधव यांची मुलाखत मार्गदर्शक तेवढीच प्रेरणादायी आहे.


**– सतीश बाहेकर, चिखली, जि. बुलडाणा**




## महत्त्वपूर्ण माहिती

फेब्रुवारी २०१६ चा अंक आवडला. आपले सरकार वेबपोर्टल सेवेचा विस्तार २६ जानेवारीपासून सर्व जिल्ह्यांसाठी केला आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक नागरिकासाठी ही माहिती महत्त्वाची आहे. 'मेक इन महाराष्ट्र' उपक्रमावर आधारित विशेष लेख महाराष्ट्राचा उंचावणारा विकासाचा आलेख दर्शवतो. तिकीट कलेक्टर ते डिस्ट्रिक्ट कलेक्टर ही प्रेरणादायी मुलाखत प्रेरणा देऊन गेली.

**– खालदास आचार्य, हिंगणघाट, जि. वर्धा**




## ज्ञानाचा खजिना

दर महिन्याला प्रसिद्ध होणारे लोकराज्य मासिक म्हणजे ज्ञानाचा खजिना असतो. यामधून राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळते. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेच्या उमेदवारांना मार्गदर्शन मिळते.


**– विनोद सातपुते**

## कल्याणकारी योजनांचा आरसा

लोकराज्यचा जानेवारी २०१६ चे मुखपृष्ठ अत्यंत बोलके व मनोवेधक आहे. शासन जनतेसाठी राबवत असलेल्या कल्याणकारी योजना व उपक्रमांचा लोकराज्य हा आरसा आहे. सर्वांसाठी हे मासिक उपयुक्त आहे.

**– दे. ना. जोशी, इसोली, ता.चिखली, जि.बुलढाणा.**




## वाचनीय

लोकराज्य डिसेंबरचा अंक वाचनीय आहे. डॉ. आंबेडकरांचे वास्तव्य असलेले लंडन येथील घर आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे स्मारक म्हणून खुले करण्याचा निर्णय आवडला. त्यांच्या जीवनाशी निगडीत पंचतीर्थांबद्दलचा लेख माहितीपूर्ण आहे.

**– भीमदास जाधव, मोहोने, कल्याण**

## संग्राह्य

लोकराज्य हे खरोखरच संग्रही ठेवण्यासारखे मासिक आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या योजना व सरकारने आखलेल्या योजनांची माहिती या मासिकामधून मिळते. दर महिन्याच्या लोकराज्यची आम्ही आतुरतेने वाट बघतो.

**– राजकुमार किंगरे, पिंपरी डुकरी (जालना)**

## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## विशेष आभार

**लोकराज्यच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांकासाठी छायाचित्रांचे सहकार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीने केले आहे. त्यासाठी शासनाच्या या समितीचे सदस्य सचिव प्रा. श्री. अविनाश डोळस यांचे विशेष आभार...**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाइन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# महामानवास अभिवादन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान द्रष्टे नेते व युगपुरुष होते. समाजातील उपेक्षित व वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अद्वितीय असे आहे. अत्यंत कठीण परिस्थितीशी सामना करत त्यांनी देशात व परदेशात शिक्षण घेतले. आपल्या प्रकांड बुद्धिमत्तेचा ठसा त्यांनी परदेशातील शिक्षण संस्थांवर उमटवला.

आधुनिक भारताला त्यांची सर्वात मोठी देणगी म्हणजे भारतीय राज्यघटना. या राज्यघटनेमुळे देशाला लोकशाही व्यवस्था मिळाली. घटनेतील विविध तरतुदींमुळे ही व्यवस्था बळकट आणि सक्षम झाली. त्यामुळेच आज आपल्या देशाची घटना ही जगातील सर्वोत्कृष्ट घटनांपैकी एक समजली जाते.

बाबासाहेब हे थोर सामाजिक क्रांतिकारक होते. भारतातील महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान न्याय व हक्क मिळाला पाहिजे यासाठी बाबासाहेब आग्रही होते. त्यांनी त्यासाठी घटनेत विविध तरतुदी केल्या. त्यामुळेच आज महिलांना सर्वच क्षेत्रात प्रगती, उन्नती आणि विकासाच्या चौफेर संधी उपलब्ध होत आहेत.

१२५ व्या जयंतीनिमित्त लोकराज्यच्या या अंकात आम्ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविधांगी पैलूंचे दर्शन घडवणारे मान्यवर अभ्यासकांचे लेख समाविष्ट केले आहेत. बाबासाहेबांच्या पुण्यस्मृतीस लोकराज्यतर्फे मनःपूर्वक अभिवादन.

नुकताच राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर करण्यात आला. ग्रामीण आणि नागरी भागाच्या समन्यायी विकासास चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे. कृषी विकासासाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याने, राज्यातील शेतीविकासास गतिमानता प्राप्त होईल. जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे या योजनांना पुरेसा निधी मिळून जलसिंचन वाढवण्याच्या उपक्रमांनाही गती मिळेल.

मा. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाने दुष्काळग्रस्त मराठवाड्याचा दौरा करून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. दुष्काळग्रस्तांच्या दिलाशासाठी विविध निर्णय घेतले, या दौऱ्यावर आधारित विशेष लेख या अंकात समाविष्ट केला आहे. पाणी बचत, जलसंवर्धन याबाबत जनजागृती करण्यासाठी राज्यात जलजागृती सप्ताहाचे यशस्वी आयोजन करण्यात आले, त्याचा आढावाही या अंकात घेण्यात आला आहे.

लोकराज्य, महाराष्ट्र अहेड, महान्यूज, दिलखुलास, जय महाराष्ट्र या आमच्या विविध माध्यमांची घोडदौड सुरू असून शासनाच्या विविध योजना व निर्णय प्रभावीरीत्या तळागाळापर्यंत पोहोचवण्यात ही माध्यमे यशस्वी होत आहेत.

हा अंक आपणास आवडेल, अशी आशा आहे.

**मनीषा पाटणकर–म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

# कृतिशील सामाजिक न्याय

यंदाचे (२०१५-१६) हे वर्ष बाबासाहेबांच्या जयंतीचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष असून महाराष्ट्र सरकारने समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून आदर भावनेने साजरे केले. विविध उपक्रमांतून त्यांच्या लोकोत्तर कामगिरीचे स्मरण करतानाच तिला जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न केला. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात जपानमधील कोयासन विद्यापीठात बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. महाराष्ट्र शासनातर्फे झालेला हा कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये इंदू मिलच्या जागेवरील बाबासाहेबांच्या प्रस्तावित भव्य स्मारकाचे प्रधानमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. आंबेडकरी जनतेची गेल्या अनेक वर्षांची ही जिव्हाळ्याची मागणी प्रत्यक्षात साकारण्याच्या दृष्टीने आमच्या सरकारने एक महत्त्वाचे पाऊल टाकले.

मुंबईत बाबासाहेबांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक लवकरच उभारण्यात येणार आहे. या दोन्ही कार्यक्रमांपाठोपाठ लंडनमध्ये शिकत असतानाच्या काळात, बाबासाहेबांचे वास्तव्य असलेली वास्तू राज्य सरकारने ताब्यात घेऊन; तिचे जागतिक पातळीवरील स्मारकात रूपांतर केले.

या स्मारकासाठी राज्य शासनाने गतिमानतेने कार्यवाही पार पाडून प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत एक भावपूर्ण सोहळा घडवून आणला.



**चैत्यभूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठमंत्री नितीन गडकरी, सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले, खासदार रावसाहेब दानवे, खासदार रामदास आठवले आदी मान्यवर.**

**देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री**

### संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन

गेल्या २६ नोव्हेंबरला संविधान दिनानिमित्ताने लक्षावधी बालकांच्या मुखातून संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन घडवून आणताना तिच्याप्रती असणारी बांधिलकी जोपासण्याचा अनोखा संस्कार आम्ही विद्यार्थ्यांवर रुजवला. त्यानंतर नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान १७ डिसेंबरचे औचित्य साधून विधिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान यासंदर्भात विशेष चर्चा घडवून आणली. १७ डिसेंबर १९४६ रोजी बाबासाहेबांनी घटना समितीमध्ये पहिले भाषण केले होते. या ऐतिहासिक घटनेला तब्बल ७० वर्षानंतर उजाळा देताना त्यानिमित्ताने महाराष्ट्र विधिमंडळात अत्यंत प्रबोधनकारी ठरू शकणारे विचारमंथन घडवून आणले.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताच्या उभारणीतील योगदान ऐतिहासिक आणि दूरगामी परिणाम करणारे ठरले आहे. देशाच्या राजकीय-सामाजिक वाटचालीसाठी एक परिपूर्ण मार्गदर्शक ठरलेल्या संविधानाच्या निर्मितीपुरते ते मर्यादित नाही. त्यांच्या कर्तबगारीचा आवाका फार मोठा आणि विविधांगी असून या महामानवाच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक श्रेष्ठत्तम पैलू आहेत.**

महाराष्ट्राच्या समाजमनात सामाजिक समरसता प्रस्थापित करण्यासाठी अनुकूल अशी मनोभूमिका निर्माण करण्याचे कार्य या वर्षात प्राधान्याने करण्यात आले. सामाजिक समरसता रुजल्यास सामाजिक न्यायासाठी होत असलेल्या प्रयत्नांना पूरक असे वातावरण निर्माण होण्यास मोठी मदत होऊ शकेल. त्या दृष्टीने जाणीव आणि कृती अशा दोन्ही पातळ्यांवर आम्ही गेले वर्षभर प्रयत्नशील होतो.

### बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू


बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू लोकांसमोर आहेत. संघर्षशील समाजक्रांतिकारक, सव्यसाची विचारवंत, व्यासंगी अभ्यासक, दूरदृष्टीचे अर्थतज्ज्ञ, थोर जलतज्ज्ञ, विधिविशारद, प्रबोधन पेरणाऱ्या जाणिवांचा लेखक आणि तळमळीचे समाजसुधारक अशा अनेक पैलूंपैकी काही दुर्लक्षित राहिले आहेत. अर्थतज्ज्ञ डॉ. आंबेडकर हा असाच एक दुर्लक्षित पैलू आहे. लंडन येथील घराच्या लोकार्पणाच्या निमित्ताने लंडन स्कूल

ऑफ इकॉनॉमिक्सला भेट दिल्यावर तेथील प्राध्यापकांशी चर्चा झाली. आमच्या येथील रेअर व रेव्हर्ट स्कॉलर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी या संस्थेत शिक्षण घेताना आर्थिक विषयांवर लिहिलेले विविध प्रबंध हे लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये बहुमूल्य संदर्भ म्हणून वापरले जातात, असे त्यांनी आम्हाला अभिमानाने सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने संशोधन शिष्यवृत्ती आणि अध्यासन सुरू करावयाचे असल्याचे त्यांनी सांगितल्यानंतर या उपक्रमासाठी लागणारे आर्थिक पाठबळ महाराष्ट्र सरकारकडून दिले जाईल, असे आश्वासन आमच्याकडून देण्यात आले.

### संविधानाचे निर्माते

बाबासाहेबांनी देशासाठी सर्वश्रेष्ठ संविधान तयार केल्याने या संविधानाचे निर्माते म्हणून असणारी त्यांची ओळख सर्वत्र रूढ झाली आहे. मात्र, त्यामुळे श्रेष्ठ अर्थतज्ज्ञ म्हणून असणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व विसरून चालणार नाही. रुपयाच्या परिवर्तनीयतेबद्दल अत्यंत अधिकारवाणीने भाष्य करू शकणाऱ्या अभ्यासकांपैकी बाबासाहेब हे एक प्रमुख अर्थतज्ज्ञ होते. रुपयाच्या परिवर्तनीयतेच्या आर्थिक परिणामाबद्दल आणि भारतास प्रमुख आर्थिक महासत्ता होण्याबाबत त्यांनी केलेले लिखाण अतिशय पथदर्शी आहे. आपल्या संविधानामध्ये आर्थिक बाबींसंदर्भात केलेल्या घटनात्मक तरतुदी अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. संविधानामध्ये प्रत्येक राज्याला अधिकारांप्रमाणेच काही जबाबदाऱ्याही दिल्या आहेत. देशाने व राज्याने फिस्कल रिस्पॉन्सिबिलीटी आणि बजेट मॅनेजमेंट (एफआरबीएम) कायदा तयार केला. राजकोषीय उत्तरदायित्व विधेयक आपण तयार केले. हे विधेयक तयार करण्याची वेळ केंद्र व राज्य शासनावर कधी तरी येईल, याची कल्पना बाबासाहेबांना त्या काळात होती. त्याचा उल्लेखही त्यांनी केला व तशी व्यवस्था देखील राज्यघटनेच्या माध्यमातून केली. केंद्र व राज्याने कायद्याच्या माध्यमातून स्वत:वर बंधन घालून घेतले पाहिजे, यासाठी आवश्यक तरतुदी करण्यात आल्या. राज्यघटनेमध्ये आज आपण १०० पेक्षा अधिक सुधारणा केल्या असतील. पण राज्यघटनेची मूळ तत्त्वे एवढी मजबूत आहेत की, आपल्या समोरील कोणत्याही प्रश्नाचे उत्तर त्यामधून मिळू शकते. भारतीय लोकशाहीचे प्राणपणाने रक्षण करण्याचे कार्य या संविधानाच्या माध्यमातून झाले आहे. त्याच्या निर्मितीमागे असलेल्या बाबासाहेबांच्या दूरदृष्टीची प्रचिती अशी वेळोवेळी आली आहे.

**जगभरातील बौद्धधर्मीयांसाठी महत्त्वपूर्ण असणाऱ्या नागपूर येथील दीक्षाभूमीस 'अ' वर्ग पर्यटनस्थळ म्हणून दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. नागपूर येथील दीक्षाभूमी ऐतिहासिक महत्त्वाची असून या ठिकाणी बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. वर्षभरात जवळपास ११ लाख एवढ्या मोठ्या संख्येने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पर्यटक, भाविक आणि अभ्यासक या ठिकाणी भेट देत असतात. यापूर्वी दीक्षाभूमीस 'क' वर्ग पर्यटनस्थळ म्हणून दर्जा देण्यात आला होता. मात्र, गेल्यावर्षी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षनिमित्ताने दीक्षाभूमीच्या विकासाची घोषणा केली होती. त्यानुसार दीक्षाभूमीला 'अ' वर्ग पर्यटनस्थळ म्हणून मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे भविष्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या दीक्षाभूमीच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.**



### लोकशाहीचे रक्षण

केवळ मूठभरांच्या हिताचा विचार न करता संपूर्ण देशातील प्रत्येकाला घटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची हमी दिली आहे. लोकशाही व्यवस्थेच्या रक्षणासोबतच आपल्या देशाने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे कारण ही राज्यघटनाच आहे. या घटनेच्या माध्यमातून त्यांनी देशातील वंचित-उपेक्षित समूहाच्या सामाजिक पुनरुत्थानाचा मार्ग खुला केला आहे. संविधानाच्या माध्यमातून वंचित समाजासाठी दिलेली संधीची समानता ही सर्वात महत्त्वाची तरतूद आहे. गेली हजारो वर्षे वंचित समाजाला समान पातळीवर आणण्यासाठी बाबासाहेबांनी दाखविलेली दूरदृष्टी परिवर्तनाला कारणीभूत ठरली आहे. त्यासाठी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक या बाबींवर ज्यांचे मागासलेपण होते, त्यांना प्राधान्याने आरक्षण दिले. समाजात विषमता जोपासून आपला देश कधीही पुढे जाऊ शकत नाही. त्यामुळे समाजातील एकही व्यक्ती भेदभावग्रस्त असेपर्यंत आरक्षण ठेवावेच लागेल.




### असामान्य व्यक्तिमत्त्व

लंडनमधील बाबासाहेबांचे वास्तव्य असलेल्या वास्तूला भेट दिली, तेव्हा तेथे असलेल्या फोटोजवळ डॉ. आंबेडकरांनी जर्मनीतील बॉन विद्यापीठाला पाठवलेले एक पत्र ठेवण्यात आले होते. जर्मन भाषेमधील हे पत्र अतिशय सुंदर हस्ताक्षरामध्ये लिहिले होते. ते अतिशय प्रतिभाशाली व्यक्ती असून त्यांना जर्मन भाषादेखील अवगत होती. ते एकेका गोष्टीचे अतिशय सखोल असे विवेचन करायचे. त्यामुळेच त्यांचे लिखाण काळाच्या कसोटीवर उतरले. बाबासाहेबांनी तयार केलेला हस्तलिखित प्रबंध सादर करण्यापूर्वी एकदा हरवला. त्यांनी तो संपूर्ण प्रबंध पुन्हा जसाच्या तसा लिहून काढला. इतकी विलक्षण स्मरणशक्ती त्यांना लाभली होती.

### नव्या महाराष्ट्राच्या उभारणीचे स्वप्न

'मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्र'सारख्या अभियानातून औद्योगिक विकासाचे नवे पर्व महाराष्ट्रात अवतरण्याची चाहूल लागली आहे. या परिवर्तन पर्वाचा लाभ दलित उद्योजकांनाही झाला पाहिजे. या समूहातूनही उद्योजकता विकसित झाली पाहिजे, या उद्देशाने आम्ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून वंचित, उपेक्षित समूहातील उद्योजकांसाठी विविध सवलती देण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. बाबासाहेबांचे १२५ वे जयंतीवर्ष आम्ही समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. २०१९ पर्यंत वंचित समूहातील बेघरांना घरे देण्याच्या घोषणेमागे, उक्तीतला सामाजिक न्याय कृतीत आणण्याचीच भावना आहे.

**(शब्दांकन : हेमराज बागूल, मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी)**

# स्वाभिमानाचे नवचैतन्य

रत्नाकर गायकवाड

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या क्रांतीचे मुख्य प्रणेते होय. हजारो वर्षे येथील पददलित समाजाला धर्माच्या नावाने दाबून टाकण्यात आले होते, त्या पददलित समाजाला बाबसाहेबांनी आपल्या हक्कांची जाणीव करून दिली आणि त्यांना संघर्ष करण्यास प्रेरित केले. बाबासाहेब केवळ एक क्रांतिकारक, राजकीय किंवा धुरंधर नेता नव्हते तर ते एक गंभीर अभ्यासक, सम्यक विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ होते. खऱ्या अर्थाने, बाबासाहेब एक महापुरुष होते. महापुरुष आपल्या असामान्य विचारांनी समाजाच्या मूळ ढाच्यातच बदल घडवून आणतात व एका नव्या क्रांतीची सुरुवात करतात. बाबासाहेबांनी पददलित समाजात असलेली न्यूनगंडाची भावनाच मुळासकट उखडून टाकली आणि या समाजात अस्मिता निर्माण केली. परिवर्तनासाठी अस्मिता जागृत करावीच लागते हे बाबासाहेबांना माहीत होते. भौतिक आणि धार्मिक गुलामीतून मुक्त होण्यासाठी एकाच वेळी दोन पातळ्यांवर बाबासाहेबांना संघर्ष करावा लागला. एका बाजूला दलितांना त्यांचे राजकीय हक्क मिळवून द्यायचे होते तर दुसऱ्या बाजूला त्यांची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करायची होती.

**धर्मांतरामुळे लगेच सर्व काही बदलेल अशी भाबडी समजूत बाबासाहेबांची मुळीच नव्हती. मात्र धर्मांतराने दलितांमध्ये स्वाभिमान जागृत होणार होता. धार्मिक अंधश्रद्धा आणि उच्चनीचतेने ग्रासलेल्या समाजाला स्वतंत्र, समता व बंधुत्वाने बांधले जाणार होते. जग हे ईश्वरनिर्मित आहे आणि उच्चवर्णीय त्याची नाळ आहेत. पारतंत्र्यात नेणाऱ्या अशा विचारांचे जोखड धर्मांतरामुळे फेकले जाणार होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसाला माणसासारखी वागणूक मिळणार होती. म्हणूनच १९३५ साली धर्म बदलण्याची बाबासाहेबांनी घेतलेली प्रतिज्ञा १९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारण्याने झाली.**



**नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा दिल्यानंतर आपल्या अनुयायांना २२ प्रतिज्ञा देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर.**

## स्वाभिमानाची जागृती

धर्मांतरामुळे लगेच सर्व काही बदलेल अशी भाबडी समजूत बाबासाहेबांची मुळीच नव्हती. मात्र धर्मांतराने दलितांमध्ये स्वाभिमान जागृत होणार होता. धार्मिक अंधश्रद्धा आणि उचनीचतेने ग्रासलेल्या समाजला स्वतंत्र, समता व बंधुत्वाने बांधले जाणार होते. जग हे ईश्वरनिर्मित आहे आणि उच्चवर्णीय हे त्याची नाळ आहे. हे पारतंत्र्यात नेणाऱ्या विचारांचे जोखड धर्मांतरामुळे फेकले जाणार होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणसाला माणसासारखी वागणूक मिळणार होती. म्हणूनच १९३५ साली धर्म बदलण्याची बाबासाहेबांनी घेतलेली प्रतिज्ञा १९५६ मध्ये बौद्ध धर्म स्वीकारण्याने झाली. १२ मे १९५६ साली 'बीबीसी'वर दिलेल्या 'मला बौद्ध धर्म का आवडतो या भाषणात बाबासाहेब म्हणतात, 'मला बौद्ध धर्म आवडतो कारण तो मला तीन तत्त्वे देतो, जी जगातल्या कोणत्याही धर्मात मिळत नाहीत. सगळे धर्म देव, आत्मा, पुनर्जन्म याचीच व्याख्या करण्यात दंग आहेत. मात्र बौद्ध धर्म मला प्रज्ञा, समता आणि करुणा शिकवतो. बौद्ध धर्म जगाला हेच सांगू इच्छितो की, कोणताही देव किंवा आत्मा जगाला वाचवू शकत नाही. केवळ मनुष्यच आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने समाजाला वाचवू शकतो आणि ती त्याला प्रज्ञा, शील आणि करुणेने प्राप्त होते. कोणतेही धर्मांतर हे कटुता निर्माण करू शकते, मात्र बाबासाहेबांनी याची पूर्ण दक्षता घेतली होती, कारण त्यांचे धर्मांतर ही सुडाची कृती नव्हती. बाबासाहेब म्हणतात, बौद्ध धर्म हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. माझे धर्मांतर हे माझ्या देशाच्या संस्कृतीला किंवा इतिहासाला धक्का न पोहोचवणारे असेल, याची काळजी घेतली आहे.

## नवचैतन्य मिळाले

बाबासाहेबांच्या धर्मांतराने काय साधले असे विचारल्यास गेल्या ६० वर्षांच्या इतिहासाची उजळणी आम्हाला करावी लागेल. ज्या लोकांना वेशीबाहेरचे जीवन होते, ज्यांना चांगले कपडेलत्ते नशिबी नव्हते, ज्यांना केवळ शिळेपाके अन्न खायला मिळत होते, आज तोच समाज बंगल्यांमध्ये राहतो आहे, जगप्रवास करतो आहे व काहींची तर स्वत:ची हॉटेल्स देखील आहेत! बाबासाहेबांच्या धर्मांतराने पददलित समाजाला एक नवचैतन्य दिले ज्यात प्रत्येक व्यक्तीचा स्वाभिमान जागृत झाला. याच धर्मांतराने बाबासाहेबांनी दिलेला शिका, संघटित व्हा,



संघर्ष करा हा मंत्र दलित समाजाने आपलासा केला व आज एक स्थान निर्माण केले आहे. बाबासाहेबांच्या मते शिक्षण हे सामाजिक – आर्थिक प्रगतीचे लक्षण आहे. १९५१ मध्ये केवळ १८.३% साक्षरता असलेल्या दलितांची साक्षरता २००१ मध्ये ५६.२% झाली व २०१० मध्ये ती ७६.८% होती. कुठल्याही समाजाने एवढ्या कमी काळात एवढी प्रचंड प्रगती केलेली नाही. धर्मांतराने या समाजाला भगवान बुद्धांची प्रज्ञा, शील व करुणा याची शिकवण दिली. बौद्ध धर्माने दिलेली नीतिमत्तेची शिकवण ही मानवी उत्कर्षाची पहिली पायरी होय. बौद्ध धर्मात असलेला वैज्ञानिक विचार हे माणासाच्या विश्वाला प्रगल्भ करतात, बुद्धविचारामध्ये असलेले सर्व जिवांविषयी करुणा व एकात्मता भावना ही मानवतेची शिकवण देणारी आहे आणि सद्सद्विवेक बुद्धी जोपासणारी आहे. म्हणूनच बाबासाहेबांच्या धर्मांतराने जसा स्वाभिमानी व स्वतंत्र विचाराचा माणूस घडवण्याचे काम केले तसेच तो जबाबदार व आदर्श नागरिक घडेल याचीही खात्री दिली.

**१२ मे १९५६ साली बीबीसी वर दिलेल्या मला बौद्ध धर्म का आवडतो या भाषणात बाबासाहेब म्हणतात, मला बौद्ध धर्म आवडतो कारण तो मला तीन तत्त्वे देतो जी जगातल्या कोणत्याही धर्मात मिळत नाहीत. सगळे धर्म देव, आत्मा पुनर्जन्म याचीच व्याख्या करण्यात दंग आहेत, मात्र बौद्ध धर्म मला प्रज्ञा, समता आणि करुणा शिकवतो. बौद्ध धर्म जगाला हेच सांगू इच्छितो की, कोणताही देव किंवा आत्मा जगाला वाचवू शकत नाही. केवळ मनुष्यच आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने समाजाला वाचवू शकतो आणि ती त्याला प्रज्ञा, शील आणि करुणेने प्राप्त होते. कोणतेही धर्मांतर हे कटुता निर्माण करू शकते. बौद्ध धर्म हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. माझे धर्मांतर हे माझ्या देशाच्या संस्कृतीला किंवा इतिहासाला धक्का न पोहचवणारे असेल याची काळजी मी घेतली आहे.**

### परिवर्तनाची चळवळ

स्वाभिमानाने व शिक्षणाने प्रगत झालेल्या दलित समाजातून राजकीय वारसदार तयार झाले. दलित समाजाचा आवाज ग्रामपंचायतीपासून लोकसभेपर्यंत गेला. कधीकाळी केवळ भिकेवर जगणारा समाज क्लास फोर पासून ते कलेक्टर, मुख्य सचिवांपर्यंत पोहोचला. हे सर्व शक्य झाले ते केवळ धर्मांतरामुळेच. परिवर्तनाची चळवळ ही सतत चालणारी प्रक्रिया होय. त्याला खतपाणी घालणे नवनिर्माणाच्या कक्षा रुंदावणे व खणखणीत पिढी तयार करणे ही सततची क्रिया होय. बाबासाहेबांच्या नंतरची पहिली पिढी शिकली, सावरली, स्वत:च्या पायावर उभी राहिली, कष्ट केले व बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दृष्टीने पावले उचलली. मात्र दुसऱ्या पिढीपर्यंत बाबासाहेबांचा संघर्ष म्हणावा तेवढा न पोहोचल्यामुळे, ही पिढी थोडी स्वार्थी झाली. सुखवस्तू झालेली दुसरी पिढी ही मुळातच आपल्या स्वत:च्या परिघातच राहिली. संघर्षासाठी लागणारा त्याग, ध्येय व चिकाटी कमी झाली. मात्र सध्याची पिढी, ही उपजतच दोन पिढ्यांची विचारधारा घेऊन जन्माला आल्यामुळे; त्यांच्यात बाबासाहेबांबद्दल असलेला आदर, चळवळीबद्दल असलेली आस्था आणि बुद्ध विचार समजून घेण्याची तळमळ खूप आशादायक आहे. तीन पिढ्यांचे गुण वारसाहक्काने मिळाल्यामुळे बाबासाहेबांच्या या आताच्या पिढीबद्दल आपण सर्वांनीच आशा बाळगण्यास हरकत नाही.

डॉ.बाबासाहेबांच्या धर्मांतरांकडे केवळ दलितांना माणुसकीचा हक्क प्राप्त करून देणे या मर्यादित दृष्टिकोनातून न बघता, त्यांच्या या महान धम्मक्रांतीत संपूर्ण देशाच्या तात्त्विक, वैचारिक,धार्मिक जीवनात परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य आहे, हे येथे मी विशेष नमूद करू इच्छितो. सारा भारत मी बौद्धमय करीन या डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिज्ञेत भगवान बुद्धांची मूळ शिकवणूक व शाश्वत तत्त्वे देश निश्चित मान्य करेल हा त्यांचा विश्वास होता.



नागपूर येथे दीक्षाभूमीवर उसळलेला भीमसागर

विशेषत: भगवान बुद्धानंतरचा सुमारे १२०० वर्षाचा भारताचा इतिहास हा या देशावर भगवान बुद्धांच्या शास्त्रशुद्ध विचारांचा प्रचंड परिणाम व त्यातून निर्माण झालेले सुवर्णयुग लक्षात घेता पुनश्च देशाला देदीप्यमान दिवस प्राप्त होऊ शकतील यात शंका नाही. संपूर्ण जगाने मान्य केलेल्या या धम्माचा उगम आपल्या देशात झाला, याचा प्रत्येक राष्ट्रभक्त भारतीय नागरिकाला अभिमान आहेच, परंतु हा अमोल ठेवा व वारसा पुनश्च प्राप्त करण्याची इच्छा प्रत्येक भारतीय नागरिकांमध्ये निर्माण होत आहे हेच खरे परिवर्तन डॉ. बाबासाहेबांच्या धर्मांतरांतून होत आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

**(लेखक हे महाराष्ट्र राज्याचे मुख्य माहिती आयुक्त आहेत.)**

# ज्ञानयोगी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे श्रेष्ठ ज्ञानयोगी होते. ते प्रकांडपंडित होते. त्यांची विद्वता अद्वितीय अशी होती. मात्र यासाठी त्यांनी अपार कष्ट केले. प्रचंड व्यासंग केला. परदेशात जाऊन अत्यंत कठीण परिस्थितीत उच्च शिक्षण घेतले. संशोधन केले. विचारप्रवर्तक अशी ग्रंथसंपदा लिहिली. परदेशातील शिक्षणासाठी त्यांनी जे कष्ट घेतले, त्याला तोड नाही. दररोज अठरा-अठरा तास याप्रमाणे काही महिने त्यांनी सलग, सतत अभ्यास केला. शिक्षणामुळेच प्रगतीच्या आणि विकासाच्या विविध संधी प्राप्त होतात. हे त्यांनी आपल्या उदाहरणावरून सिद्ध केले. या ज्ञानयोग्याने विविध विषयांचे ज्ञान मिळवण्यासाठी जे अथक परिश्रम घेतले, ते सर्वांसाठीच प्रेरणादायी आहेत. हा प्रेरणादायी प्रवास अतिशय प्रभावीरीत्या धनंजय कीर यांनी बाबासाहेबांच्या चरित्रग्रंथात रेखाटला आहे. त्यातील काही अंश लोकराज्यच्या वाचकांसाठी खास देण्यात येत आहेत...**

वडलांच्या मृत्यूमुळे भीमराव आंबेडकरांचा होता नव्हता तो आधार तुटला. पैशाचे पाठबळ नाही, आप्तांचा आधार नाही अशी परिस्थिती. बडोद्यात नोकरीवर रुजू होण्यासारखी त्यांची मन:स्थिती नव्हती. त्या नोकरीतील अनुभवही काही चांगला नव्हता. आता त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यावाचून गत्यंतर नव्हते. त्यांच्या ठायी ज्ञान संपादन करण्याची अनिवार इच्छा होती. जगात काही महत्तम कार्य करावे अशी त्यांची अबोल महत्त्वाकांक्षा होती, त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ होई. कुटुंबाचे पालनपोषण तर केले पाहिजे आणि शिक्षण पुढे चालवावे म्हटले तर पदरी कवडीदेखील नाही. वडलांचा शेवट कर्जबाजारीपणात झालेला. अशाप्रकारे जीवनकलहाच्या तीव्र धुमाळीतून मार्ग कसा काढावा ह्या विवंचनेत असताना ते बडोदा नरेशांना मुंबईत भेटले. त्या सुमारास बडोदे सरकारने उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन चार विद्यार्थी अमेरिकेस पाठवण्याचा विचार केला होता.

महाराजांनी शिष्यवृत्तीसाठी भीमरावांना अर्ज करण्यास सांगितले. त्या चार विद्यार्थ्यांत त्यांनी भीमराव आंबेडकरांची निवड केली. त्याप्रमाणे भीमराव बडोद्याला गेले. तेथे उपशिक्षण मंत्र्यांसमोर ४ जून १९१३ रोजी त्यांनी करारपत्रावर सही केली. त्या करारान्वये भीमरावांनी संकल्पित विषयांचा अभ्यास अमेरिकेत करावा व नंतर दहा वर्षे बडोदे सरकारची नोकरी करावी असे ठरले.

**धनंजय कीर**

### अभूतपूर्व घटना

१९१३सालच्या जुलै महिन्यातील तिसऱ्या आठवड्यात आंबेडकर न्यूयॉर्कला पोहोचले. प्रथमत: ते विश्वविद्यालयाच्या वसतिगृहात राहिले. परंतु तेथील अर्धेकच्चे अन्न आणि गोमांसाचे पदार्थ ह्यांची त्यांना शिसारी आल्यामुळे जेथे हिंदी विद्यार्थी राहत असत, त्या सर्व कुटुंबात राहावयास गेले. त्यानंतर ते नवल भथेना पारशी विद्यार्थ्याबरोबर लिव्हिंग्स्टन हॉल शयनमंदिरामध्ये राहत असत. न्यूयॉर्कमधील आंबेडकरांचे जीवन हा एक अपूर्व असा अनुभव. तेथील विद्यार्थ्यांसंगे आंबेडकर बरोबरीने बोलत, चालत, जेवत, फिरत; सर्वच ठिकाणी समतेचे वातावरण. ते जीवन हा त्यांना एक साक्षात्कारच वाटे. त्या नवीन जगाने त्यांच्या मनाचे क्षितिज वाढविले. त्यांचा अंतरात्मा एकप्रकारच्या नवीन तेजाने स्फुरू लागला. अमेरिकेहून वडलांच्या एका मित्रास लिहिलेल्या पत्रात त्यांनी पददलितांच्या दैन्यावर एक रामबाण उपाय सुचवला. तो उपाय म्हणजे पददलितांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा होय. त्याच पत्रात आंबेडकर पुढे म्हणतात की, आईबाप मुलास जन्म देतात, कर्म देत नाहीत, असे म्हणणे ठीक नाही. आईबाप मुलांच्या आयुष्याला वळण लावू शकतात, ही गोष्ट आपल्या लोकांच्या मनावर बिंबवून जर आपण मुलांच्या शिक्षणाबरोबर मुलींच्याही शिक्षणासाठी धडपड केली तर आपल्या समाजाची प्रगती झपाट्याने होईल.



लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या घरात वास्तव्य केले. त्या घराचे स्मारकात रूपांतर करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनाप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

## ध्येयनिष्ठ आंबेडकर

सुखविलासात रमून जाण्याकडे सामान्यत: प्रत्येक विश्वविद्यालयीन तरुण विद्यार्थ्यांचा कल असतो. परंतु ध्येयनिष्ठ आंबेडकरांचे मन तशा जीवनास अनुकूल नव्हते. शिवाय पैसा तर जवळ नव्हताच. चित्रपट पाहावयास जाणे, नयनमनोहर सौंदर्यस्थळे पाहणे, क्रीडोद्यानात सहलणे, ह्यांसारखे विचार त्यांच्या मनालासुद्धा शिवले नाहीत. त्यांना सपाटून भूक लागे परंतु ती एक कप कॉफी, दोन केक, एक बशी सागुती किंवा मासे यांवरच शमवावी लागे. त्या जेवणाचा खर्च एक डॉलर दहा सेंटस् येई. शिष्यवृत्तीच्या पैशातून पत्नीला घरखर्चासाठी काही पाठवावे लागे. यास्तव खर्च हात आखडून करावा लागे. ही परिस्थिती ज्या सहाध्यायांनी पाहिली, त्यांनी पुढे मोठ्या अभिमानाने सांगितले की, 'आयुष्यात मिळालेल्या संधीचा भरपूर लाभ घेण्यासाठी आंबेडकरांनी प्रत्येक क्षण सोन्याचा क्षण मानून अभ्यासासाठीच व्यतीत केला. धनाचा प्रत्येक कण योग्य ठिकाणी लावला.' आंबेडकरांचे ध्येय अमेरिकेतील मोठ्यातली मोठी विश्वविद्यालयीन  पदवी मिळवणे हेच केवळ नव्हते. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र आणि मानववंशशास्त्र इत्यादी विषयांत पारंगत होण्याची प्रबळ महत्त्वाकांक्षा त्यांनी बाळगली होती. आंबेडकरांच्या मनावर तेथील एका प्राध्यापकाच्या व्यक्तिमत्त्वाची चांगलीच पकड बसली होती. त्याचे नाव एडवीन आर.ए.सेलिग्मन. संशोधनाची कोणती पद्धत आपण अनुसरावी असे आंबेडकरांनी त्यांना एकदा विचारले. त्यावर त्या गुरुवर्यांनी आबंडेकरांना असा हितोपदेश केला की, 'तुम्ही आपले काम कळकळीने करीत जा, म्हणजे त्यातूनच तुमची स्वत:ची पद्धती आपोआप निर्माण होईल.'

## अथक परिश्रम

अमेरिकेतील आंबेडकरांच्या ज्ञानयज्ञास अशाप्रकारे प्रारंभ झाला. दररोज अठरा-अठरा तास याप्रमाणे काही महिने अभ्यास चालला होता. सरतेशेवटी दोन वर्षाच्या अखंड तपश्चर्येनंतर त्यांच्या गळ्यात यशाने माळ घातली. 'प्राचीन भारतातील व्यापार' (एन्शन्ट इंडियन कॉमर्स) ह्या विषयावर त्यांनी १९१५ साली प्रबंध लिहून एम.ए. पदवी संपादन केली. १९१६ सालच्या मे महिन्यात डॉ. गोल्डनवेझर ह्यांच्या वादकथा सभेत (सेमिनार) 'भारतातील जातिसंख्या, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास' (कास्ट्स इन इंडिया, देअर मेकॅनिझम, जेनिसिस ॲण्ड डेव्हल्पमेंट) ह्या विषयावर त्यांनी एक निबंध वाचला.

पुढे आठ वर्षांनी लंडनमधील पी.एस.किंग ॲण्ड सन्स ह्या प्रकाशन संस्थेने हा प्रबंध विस्तृत स्वरूपात 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वैत्तिक उत्क्रांती' (दी इव्हॅल्यूशन ऑफ प्रॉव्हिन्शल फायनॅन्स इन ब्रिटिश इंडिया) या नावाने प्रसिद्ध केला. आंबेडकरांनी या ग्रंथाच्या छापील प्रती नियमाप्रमाणे कोलंबिया विश्वविद्यालयाला सादर करताच त्या विश्वविद्यालयाने रीतसर त्यांना 'डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी' ही अत्युच्च पदवी दिली. आंबेडकरांनी हाताळलेला प्रश्न हा जगातील विचारवंतांच्या चर्चेतील एक महत्त्वाचा विषय आहे असे सांगून सेलिग्मन प्रस्तावनेत म्हणतात, 'या विषयाचा इतका सखोल आणि सांगोपांग अभ्यास अन्य कोणी केल्याचे आपणांस माहीत नाही.' यावरून त्या ग्रंथाचे महत्त्व आणि मौलिकता लक्षात येईल.

भारतातील प्रांतिक आणि केंद्रीय विधिमंडळातील सदस्यांच्यादृष्टीने हा ग्रंथ अतिशय उपयुक्त ठरला. भारतीय चलनविषयक मंडळासमोर आंबेडकरांना साक्ष देण्यास बोलावण्यास आले होते. त्यावेळी कमिशनच्या सदस्यांच्या हाती आपला ग्रंथ पाहून आंबेडकरांना मोठी धन्यता वाटली असेल.

**'भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक परिशीलन' (नॅशनल डिव्हिडन्ड ऑफ इंडिया - ए हिस्टॉरिक ॲण्ड ॲनॅलिटिकल स्टडी) नामक प्रबंधासंबंधी त्यांचा अभ्यास नि विचारविनिमय उपरोक्त प्रबंधाच्या सोबतच चालला होता. पुष्कळ दिवसांच्या परिश्रमानंतर तो प्रबंध त्यांनी पूर्ण केला. १९१६ जूनमध्ये तो कोलंबिया विश्वविद्यालयाने स्वीकारला. शैक्षणिक क्षेत्रातील हे त्यांचे यश एवढे दैदीप्यमान होते की, त्या वेळी कोलंबिया विश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मेजवानी देऊन त्यांचे हार्दिक अभिनंदन केले. त्यांनी लिंकनचा निर्धार नि जीवितोद्देश आणि बुकर टी.वॉशिंग्टनची उद्योगशीलता अंगी असलेल्या आंबेडकरांचे अभिनंदन करावे हा एक मोठाच योग म्हणायचा.**



**कोलंबिया विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासोबत वॅलेस स्टिव्हन्स.**

## खडतर प्रवास

लंडनमध्ये कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास करण्याची बडोदे नरेशाकडून त्यांनी संमती मिळविली होती. आंबेडकरांनी कायद्याचा अभ्यास करण्यासाठी 'ग्रेज इन' मध्ये ऑक्टोबरात नाव दाखल केले, त्याचवेळी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पॉलिटिकल सायन्स' ह्या संस्थेतही अर्थशास्त्राच्या अभ्यासाकरिता त्यांना प्रवेश मिळाला. अर्थशास्त्र विषयातील त्यांची प्रगती पाहून तेथील प्राध्यापकांनी त्यांना एका परीक्षेस न बसण्याची सवलत दिली आणि डी.एस्सीच्या परीक्षेची सिद्धता करण्यास त्यांना अनुज्ञा दिली. त्यांनी अभ्यासाला आरंभ केला न केला तोच त्यांच्यावर दुर्दैवाची दृष्टी फिरली. मध्यंतरी बडोद्याच्या दिवाणपदी सर मनुभाई मेहता यांची नेमणूक झाली. ते १० फेब्रुवारी १९२७ पर्यंत त्याच पदावर होते. 'शिष्यवृत्तीचा ठरलेला काळ संपला आहे, तेव्हा तुम्ही आता भारतात निघून या' असे आंबेडकरांना बडोद्याच्या या नवीन दिवाणांकडून

कळवण्यात आले. ते आज्ञापत्र वाचून डॉ. आंबेडकरांना मोठा धक्काच बसला! तथापि, काही झाले तरी अभ्यासासाठी लंडनला परत यायचेच असा मनाशी निर्धार करून त्यांनी १९१७ च्या ऑक्टोबरपासून चार वर्षाच्या आत पुन्हा अभ्यास सुरू करण्याची अनुमती लंडन विश्वविद्यालयाकडून मिळवली.

## जग जिंकण्याचा निर्धार

याही स्थितीत त्यांनी आपल्या बुद्धिवैभवाने जग जिंकण्याचा निर्धार काही सोडला नव्हता. त्यांनी तत्त्वज्ञ बर्ट्रान्ड रसेल यांच्या 'सामाजिक पुनर्रचनेची तत्त्वे ' या ग्रंथावर 'जर्नल ऑफ दि इंडियन इकॉनॉमिक सोसायटी'च्या अंकात परीक्षणात्मक एक लेख लिहिला.

आंबेडकरांनी याच सुमारास आपला 'भारतातील जाती' हा निबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध केला. 'भारतातील लहान जमिनी आणि तद्‌विषयक उपाययोजना' (स्मॉल होल्डिंग्स इन इंडिया ॲण्ड देअर रेमिडिज) या विषयावर त्यांनी एक अभ्यासपूर्ण प्रबंध लिहिला. जमिनीसंबंधीच्या प्रश्नावर त्या वेळी काही विचारवंतानी आपले विचार मांडले होते. 'बडोदा समिती'च्या निष्कर्षावर आणि त्या विषयावरील इतर अधिकारी पुरुषांच्या मतांवर त्यांनी कडक पण विधायक टीका केली.

आंबेडकरांचे मन निराशेत असे हेलकावे खात असता, सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची एक जागा रिकामी झाली आहे, असे त्यांना कळले. मुंबईचे माजी राज्यपाल लॉर्ड सिडनेहॅम ह्याच्या खटपटीने त्यांना ती जागा मिळाली. त्यांची अर्थकारण (पोलिटिकल इकॉनॉमी) या विषयाच्या प्राध्यापकाच्या जागी नेमणूक झाली. लंडनला पुन्हा जाऊन आपला कायदा आणि अर्थशास्त्र याचा अपुरा राहिलेला अभ्यास पुरा करण्यासाठी लागणारा पैसा आपणास ह्या नोकरीमुळे लाभेल हा उद्देश मनाशी बाळगून त्यांनी ती प्राध्यापकाची हंगामी नेमणूक स्वीकारली.

आंबेडकर प्राध्यापक असताना मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांच्या अनुंषगाने साउथ बरो समिती भारतात निरनिराळ्या जातीची मताधिकारविषयक चौकशी करीत फिरत होती. अस्पृश्य वर्गाच्या वतीने कर्मवीर शिंदे आणि आंबेडकर ह्यांची त्या समितीपुढे साक्ष झाली. 'स्वराज्य हा जसा ब्राह्मणांचा जन्मसिद्ध हक्क आहे, तसाच तो महारांचाही आहे, ही गोष्ट कोणीही मान्य करील. म्हणून पुढारलेल्या वर्गांनी दलितांना शिक्षण देऊन त्यांच्या मानाची आणि सामाजिक दर्जाची उंची वाढवणे, हे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. ही बाब बाबासाहेबांनी समितीपुढे निदर्शनास आणली. डॉ. आंबेडकरांना राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक साहाय्य देऊन एक पाक्षिक काढावयास लावले. ते 'मूकनायक' नावाचे पाक्षिक ३१ जानेवारी १९२० या दिवशी त्यांनी सुरू केले. अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने तो काळ किती प्रतिकूल आणि कठोर होता ह्याची कल्पना केसरीसारख्या वर्तमानपत्राने 'मूकनायक'बद्दल दोन शब्द लिहिणे तर सोडाच, पण पैसे घेऊन त्याची जाहिरातसुद्धा छापण्याचे नाकारले, ह्यावरून येईल. त्या वेळी टिळक हयात होते.

## साधने नि सामर्थ्य

डॉ. आंबेडकर त्या वेळी प्राध्यापक होते. हिंदू समाजावर उघड चढाई करण्याची त्यांची सिद्धता नव्हती. साधने नि सामर्थ्यही मिळवावयाचे होते. कोल्हापूरच्या शाहू महाराजांशी आंबेडकरांचे संबंध आता दृढावू लागले होते. त्या संस्थानातील माणगाव येथे संस्थानची अस्पृश्यांची पहिली परिषद मार्चमध्ये भरली. शाहू महाराज तेथे आपल्या लवाजम्यासह उपस्थित होते. या परिषदेनंतर शाहू महाराज, त्यांचे सरदार मानकरी ह्यांच्यासमवेत आंबेडकर आणि इतर अस्पृश्य कार्यकर्ते यांचे भोजन झाले.प्राध्यापक आंबेडकरांना भरपूर मासिक वेतन होते. तरी ते कामगार विभागात इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट चाळीतील दोन खोल्यांतच राहत असत. अभ्यासपूर्तीसाठी लंडनला जाण्याची इच्छा तीव्र तर होत होती. मासिक वेतनातून प्रा. आंबेडकरांनी बरीच बचत केली. नवल भथेंना यांजकडून पाच हजार रुपये वचनचिठ्ठीवर कर्ज घेतले. थोडे आर्थिक साहाय्य कोल्हापूरच्या महाराजांकडून मिळवले. शिक्षण पूर्ण करण्यासाठी अशा रीतीने पैसे उभारून त्यांनी लंडनला जाण्याची सिद्धता केली. त्यांनी सिडनेहॅम महाविद्यालयातील प्राध्यापकपदाचा राजीनामा दिला. आणि ते जुलैच्या शेवटच्या आठवड्यात लंडनला पोहोचले.




**एका समारंभात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा घेतलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा.**

## अभ्यासाची सिद्धता

लंडनला पोहोचल्यावर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स या संस्थेत आंबेडकरांनी अभ्यास सुरू केला. त्यांनी बॅरिस्टरीचा अभ्यासही ग्रेज इनमध्ये सुरू केला. अभ्यासाची सिद्धता क्रमिक पुस्तकावरूनच करून ते थांबले नाहीत त्यांनी आपली दृष्टी अध्यात्म नि ज्ञानशास्त्र यांच्या विचारांचे जे निधान, जगाच्या प्राचीन इतिहासाचे नि स्थित्यंराचे जेथे अवशेष जतन करून ठेवले आहेत, जेथे मार्क्स, मॅझिनी,

लेनिन, सावरकर यांनी संशोधनाचे कार्य केले, त्या लंडन म्युझियमकडे वळवली. पुरेसा पैसा नसल्यामुळे त्यांना सर्व विद्याभ्यास ठरावीक वेळेतच संपवावयाचा होता. आंबेडकर पोटास चिमटा काढून जेवढे ग्रंथ विकत घेणे शक्य असे तेवढे विकत घेत. प्रवासाकरिता खर्च न करिता वाचनालयातून दुर्मीळ ग्रंथ मिळविण्याकरिता ते मैलनमैल पायपीट करीत असत. त्यांची दिनचर्या म्हणजे खरोखरच मूर्तिमंत तपश्चर्या होती. ज्या बाईकडे ते राहत असत. ती. नतद्रष्ट होती. सकाळी न्याहारीच्या वेळी चहा, एक पावाचा तुकडा, त्या तुकड्याच्या टोकाला चिंचोक्याएवढा मुरांबा एवढेच ती देई. ते अपुरेसे अन्न खाऊन ते सकाळी म्युझियममध्ये वाचायला जात. वाचक



म्हणून सर्वांआधी प्रवेश बहुतेक आंबेडकरांचा असायचा. दुपारचे जेवण घेण्यास त्यांच्यापाशी पैसेच नसायचे. बरोबर आणलेले सॅन्डविचचे दोन तुकडे ते तेथे हळूच खात. परंतु एक दिवस म्युझियममधील नोकराने त्यांना नियमाकडे बोट दाखवताच त्यांनी तेथे पावाचे तुकडे खाणे सोडून दिले. ते तसेच पोटाची भूक मारून पाच वाजेपर्यंत वाचीत बसत. पैशात बचत होई, वेळेची कमाई होई. टिपणवह्यांनी खिसे फुगलेले, चेहरा घामाने डबडबलेला, शरीर शिणलेले पण डोळे टवटवीत झालेले असे आंबेडकर वाचनालयातून सर्वात शेवटी बाहेर पडत. बिऱ्हाडी परत आल्यावर थोडा वेळ पाय मोकळे करीत. नंतर रात्रीचे अपुरे जेवण. पुन्हा वाचनाची दुसरी फेरी सुरू होई.

रात्री दहाला चरचरून भूक लागे. भुकेचा डोंब उसळे. एका गुजराथी मित्राने त्यांना एक पापडाची करंडी दिली होती. त्यातील चार पापड एका पत्र्यावर भाजून ते मध्यरात्री खात. वर कपभर दूध. पुन्हा पहाटेपर्यंत अभ्यास चालू राही. त्यांना बाहेरील जगाची शुद्धबुद्ध नसे. अस्नाडेकर नावाचे मुंबईचे एक गृहस्थ त्याच खोलीत राहत. ते उत्तर रात्री जागे झाले की आंबेडकरांना कळकळीने म्हणत, अहो आंबेडकर, रात्र फार झाली. किती जागता दररोज. आता विश्रांती घ्या. झोपा. तेव्हा शांतपणे आंबेडकर म्हणत, अहो, अन्नाला पैसा व झोपायला वेळ मजपाशी नाही. शक्यतो लवकर माझा अभ्यासक्रम पुरा करावयाचा आहे. मग काय करणार? आयुष्य थोडे विद्या फार असे त्यांना वाटे. त्यामुळे लोखंडाचे चणे खाऊन आपला अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते अहोरात्र झटत होते, रात्रीचा दिवस करीत होते. ही ज्ञानोपासना किती

## ग्रंथ सवलतीच्या दरात

**धनंजय कीर लिखित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील ग्रंथ आता सवलतीच्या दरात उपलब्ध करण्याचे पॉप्युलर प्रकाशनने जाहीर केले आहे. या ग्रंथाची किंमत ५५० रुपये असून बाबासाहेबांच्या १२५व्या जयंतीनिमित्त हा ग्रंथ ३५० रुपये किंमतीत उपलब्ध असेल.**

www. popularprakashan.com

कडक. आंबेडकर काटकसरीने लंडनला राहत होते की, त्यांचा मासिक व्यय आठ पौंडांपलीकडे जात नसे. तरी प्रकृती नि मन दोन्ही उल्हासित! एक दोन वेळा प्रकृती बिघडली. परंतु त्याविषयी पत्नीजवळ ब्र काढला नाही. उपहारगृहे, नाटकगृहे, चित्रपटगृहे ही त्यांचा गावीही नव्हती. आपल्या व्यक्तित्वाचा नि भवितव्याचा अभेद्य असा पाया पराक्रमी पुरुष कसा उभारतो, अडचणीमुळे त्याचे अंगचे गुण कसे प्रकट होतात, याचे आंबेडकरांचे जीवन हे एक मोठे स्पृहणीय उदाहरण आहे. अशी उदाहरणे इतिहासात थोडीच पाहावयास मिळतात. अविश्रांत परिश्रम करण्याचा उत्साह, अपरिमित हालअपेष्टा सहन करण्याची शक्ती, नि उच्च विचार यामुळेच जगातील थोर पुरुषांना यश लाभते.

उच्च शिक्षणाने डॉ. आंबेडकर एक बुद्धिमान आणि सामर्थ्यशाली पुरुष झाले. तीन विश्वविद्यालयांत त्यांनी ज्ञानसंपादनासाठी तपश्चर्या केली. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, निर्बंधशास्त्र, इतिहास ह्यांचा संसार त्यांनी पाठीशी बांधला होता.

पंडितांना, राजकारणी धुरंधरांना नि अर्थशास्त्रज्ञांना आव्हान देणाऱ्या पांडित्याचे पाशुपत अस्त्र अर्जुनाप्रमाणे घोर तपश्चर्येच्या जोरावर संपादन करून ते पुढील संग्रामास सिद्ध झाले.

**(साभार : धनंजय कीर लिखित डॉ. बाबासाहेब आंबेडकर या चरित्र ग्रंथातील 'विद्येसाठी खडतर तपश्चर्या' या भागातील संपादित मजकूर. हा ग्रंथ पॉप्युलर प्रकाशनने प्रकाशित केला. पहिली आवृत्ती १४ एप्रिल १९६६ ला प्रकाशित.)**


# अतुलनीय... अद्‌भुत...

**डॉ. नरेंद्र जाधव**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवी हक्क व लोकशाहीचे कडवे समर्थक होते. लोकशाहीची त्यांची संकल्पना सर्वसामान्यपणे राजकीय स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाच्या ज्ञात कल्पनेपेक्षा अधिक व्यापक होती. लोकशाहीच्या सामाजिक व आर्थिक बाजूंवर डॉ. आंबेडकरांनी भर दिला आणि बजावले की, जर सामाजिक व आर्थिक लोकशाही नसेल तर केवळ राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकणार नाही.

## लोकशाहीची व्याख्या

अनेक तत्त्वज्ञांनी तसेच समाजशास्त्र व राज्यशास्त्राच्या लेखकांनी केलेल्या लोकशाहीच्या व्याख्यांचा उल्लेख डॉ. आंबेडकरांनी केला आहे. वॉल्टर बॅगहॉटची 'चर्चेद्वारे राज्यकारभार' (गव्हर्नमेंट बाय डिस्कशन) व अब्राहम लिंकनने सुचवलेली ''लोकांचे, लोकांसाठी, लोकांकडून चालवले जाणारे राज्य या दोन व्याख्यांची ते खास करून आठवण काढत. तथापि या रुळलेल्या व वारंवार सांगितल्या जाणाऱ्या व्याख्यांहून वेगळी 'रक्तपाताचा अवलंब न करता जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवणारी राज्यपद्धती' अशी ते लोकशाहीची व्याख्या करतात.



घटनेच्या मसुदा समितीच्या सदस्यांसोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

**भारतीय आर्थिक समस्यांची उकल करण्यासाठी त्याचप्रमाणे भारतीय अर्थशास्त्रीय विचार विकसित करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लक्षणीय कामगिरी केलेली आहे. 'इस्ट इंडिया कंपनी : प्रशासन आणि अर्थनीती' 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्तांची उत्क्रांती' यासारखे त्यांचे विद्वत्ताप्रचुर संशोधन 'सार्वजनिक वित्त' या सदराखाली येते. तर 'रुपयाचा प्रश्न : उद्‌गम आणि उपाय' हा मौलिक ग्रंथ 'मौद्रिक अर्थशास्त्र' आणि 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' या पोटशाखांमध्ये मोडतो. 'खोती पद्धत' आणि 'महार वतने' यांच्या निर्मूलनात डॉ. आंबेडकरांनी बजावलेली भूमिका त्यांना एक नामांकित कृषी अर्थतज्ज्ञ ठरवते तर औद्योगिक मजुरांसाठी त्यांनी दिलेला लढा डॉ.आंबेडकर एक ख्यातनाम कामगार नेते असल्याची साक्ष देतो. जातिव्यवस्था आणि अस्पृश्यता यासारख्या सामाजिक व्याधींच्या आर्थिक परिमाणांच्या डॉ. आंबेडकरांनी केलेल्या मर्मभेदक पृथक्करणामुळे अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांची सांगड घालणारे ते एक अतुलनीय पंडित ठरतात. तर भारतीय आर्थिक विकासाच्या त्यांच्या योजनांमुळे ते भारतीय आर्थिक नियोजनाचे तज्ज्ञ म्हणून समोर येतात.**

यावरून दिसून येईल की, डॉ. आंबेडकर राजकीय लोकशाहीला केवळ एक अंतिम साध्य मानत नव्हते तर त्यांना अभिप्रेत असलेल्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे एक अमोघ साधन म्हणून ते लोकशाहीकडे पाहत होते. सामाजिक व आर्थिक लोकशाही जणू काही राजकीय लोकशाहीच्या पेशी व तंतू असतात. पेशी व तंतू जेवढे मजबूत तेवढे शरीरही असा डॉ. आंबेडकरांना विश्वास होता. सामाजिक व आर्थिक लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही, या तत्त्वाचे आकलन न झाल्यामुळे अनेक ठिकाणी संसदीय लोकशाहीच कुचकामी ठरवण्यात आली आहे असे ते म्हणतात.

मे १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांनी व्हॉइस ऑफ अमेरिका या संस्थेने आयोजलेल्या एका संवाद मालिकेत भारतातील लोकशाहीचे भवितव्य या विषयावर भाषण केले. त्यात ते म्हणाले, 'लोकशाही म्हणजे प्रजासत्ताक किंवा संसदीय सरकार नव्हे लोकशाहीची मुळे सरकारी पद्धतीत, संसदीय किंवा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीत नसतात.' डॉ. आंबेडकर पुढे म्हणतात, 'लोकशाही म्हणजे सहजीवनाने राहण्याची एक पद्धती. लोकशाहीची मुळे

सामाजिक संबंधात शोधावयाची असतात.'

लोकशाहीचे कट्टर समर्थक असलेल्या डॉ. आंबेडकरांसमोर एक भव्य कॅनव्हास होता. या कॅनव्हासवर माणसामाणसांमधील राजकीय, सामाजिक व आर्थिक नात्यांचे मनोहर रंग एकमेकांत मिसळून त्यामधून ते सामाजिक-आर्थिक लोकशाहीचे स्वयंपूर्ण चित्र चितारू पाहत होते.

## सामाजिक-आर्थिक लोकशाहीसाठी अत्यावश्यक पथ्ये

राजकीय समता आणि विचार व कृतीचे स्वातंत्र्य या गोष्टी कुठल्याही लोकशाही समाजाच्या कोनशिला समजल्या जातात. तथापि डॉ. आंबेडकरांनी केवळ राजकीय हक्कांशी लोकशाहीची बांधिलकी असू नये, तर सामाजिक व आर्थिक बाबतीत समान संधी हाच लोकशाहीचा खरा अर्थ असला पाहिजे यावर भर दिला.

डॉ. आंबेडकरांनी प्रतिपादन केले की, स्वातंत्र्याबरोबरच लोकांना देशाच्या सामाजिक व आर्थिक घडामोडीत भाग घेण्याची समान संधी मिळणार नसेल तर त्या स्वातंत्र्याचाच नाश होईल.

लोकशाही यशस्वीपणे राबवण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या बाबींचा विस्ताराने ऊहापोह करताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, पहिली अट म्हणजे, ... समाजात प्रकर्षाने जाणवणारी उच्चनीचता असू नये. समाजात दडपलेला वर्ग असू नये. समाजात शोषित वर्गही असू नये. सर्व सुखसोयींचा व सवलतींचा लाभ उठवणारा एक वर्ग व केवळ हालअपेष्टा सहन करणारा, ओझी वाहणारा दुसरा वर्ग अशी स्थिती समाजात असू नये. अशा परिस्थितीतच, अशा विभागलेल्या सामाजिक रचनेत रक्तरंजित क्रांतीची बीजे असतात व लोकशाही अशा क्रांतीला पायबंद घालू शकत नाही.

याच भाषणात डॉ. आंबेडकरांनी भाकीत केले की, 'समाजातील वेगवेगळ्या वर्गात असलेली ही खोल दरी लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीतील मोठा अडथळा ठरण्याची शक्यता आहे.'

... लोकशाहीत जो जो दडपला गेला आहे त्याला, जो जो तुडविला गेला आहे त्याला, ज्यांचे हक्क हिरावून घेतले गेले आहेत त्यांना आणि ज्यांना ओझी वाहावी लागतात त्यांना, तसाच आणि तेवढाच मतदानाचा अधिकार असतो जेवढा 'आहे रे' वर्गाला असतो. आणि 'आहे रे' वर्ग 'नाही रे' वर्गाच्या तुलनेत नेहमीच अल्पसंख्याक असतो. ज्या अर्थी आपण बहुमताच्या कौलाला निर्णायक म्हणून मान्यता दिली आहे त्या अर्थी अशी शक्यता आहे की, जर अल्पसंख्य 'आहे रे' वर्गाने स्वयंस्फूर्तीने आणि आपणहून आपल्या विशेष सवलतीचा त्याग केला नाही तर त्यांच्यातील आणि समाजाच्या खालच्या स्तरातील दरी वाढून लोकशाहीचा नाश होईल आणि तिच्या जागी भलतेच काहीतरी येईल. तुम्ही जर जगातील वेगवेगळ्या भागातील लोकशाहीचा इतिहास तपासलात तर या सामाजिक अटीच्या पूर्ततेच्या अभावी तेथील लोकशाही नष्ट झाल्याचे आढळून येईल. याविषयी माझ्या मनात तिळमात्रही शंका नाही.

दुसऱ्या एका ठिकाणी जगातील दुसऱ्या काही भागातील संसदीय लोकशाहीच्या अपयशाच्या कारणांची मीमांसा करता ते नमूद करतात की, अनेक देशात संसदीय लोकशाहीने स्वातंत्र्याची आस निर्माण केली परंतु समतेचे महत्त्व ओळखण्यात ती अपयशी ठरली आणि स्वातंत्र्य नि समतेमधील समतोल साधण्याचा तर तिने प्रयत्नच केला नाही. त्याचा परिणाम असा झाला की, स्वातंत्र्याने समता गिळंकृत केली व लोकशाही म्हणजे एक फार्स झाला.

स्वातंत्र्याच्या तत्त्वासारखीच बंधुत्वाच्या तत्त्वाची स्थिती झाली. डॉ.आंबेडकरांच्या मते 'बंधुता' हे लोकशाहीचेच दुसरे नाव होते. त्याचप्रमाणे सामाजिक जुलूम, जातीयवाद, वेठबिगार, वाईट वागणूक आणि असुरक्षितता हे सर्व लोकशाहीच्या स्थापनेला हानिकारक होते.

## न्यायाचा अभाव

'न्यायाचा अभाव' हा लोकशाहीच्या मार्गातील दुसरा एक अडथळा आहे, हेही डॉ. आंबेडकरांनी ओळखले होते. त्यांच्या मते समाज जर वस्तुस्थिती आणि व्यवहार यांच्यात समतोल राखू शकला तर न्यायाची अंमलबजावणी होऊ शकते. जर समाजाने वस्तुस्थितीला आदर्श समजण्याची चूक केली (उदा-वेगवेगळ्या वर्गाचे अस्तित्व) तर न्यायाच्या तत्त्वाला बाधा येईल. म्हणूनच चातुर्वर्ण्यात अनुस्यूत असलेल्या सामाजिक व आर्थिक बंधनांना नाकारणे ही आर्थिक न्यायासाठी पूर्वअट आहे आणि आर्थिक लोकशाहीच्या प्राप्तीसाठीही ती एक अत्यावश्यक बाब आहे.

डॉ. आंबेडकर सांगतात की, लोकशाहीसाठी सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धीची आवश्यकता असते. त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, आपण दक्षिण आफ्रिकेतील भेदभावाबद्दल इतके बोलत असताना आपल्याला याचे भान असते का की, आपल्या इथे प्रत्येक खेड्यात एक दक्षिण आफ्रिका आहे ही वस्तुस्थिती आहे. जाऊन पाहा म्हणजे कळेल याचे कारण.. आपल्यात सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धीचा अभाव आहे.

**'न्यायाचा अभाव' हा लोकशाहीच्या मार्गातील दुसरा एक अडथळा आहे, हेही डॉ. आंबेडकरांनी ओळखले होते. त्यांच्या मते समाज जर वस्तुस्थिती आणि व्यवहार यांच्यात समतोल राखू शकला तर न्यायाची अंमलबजावणी होऊ शकते. जर समाजाने वस्तुस्थितीला आदर्श समजण्याची चूक केली (उदा-वेगवेगळ्या वर्गाचे अस्तित्व) तर न्यायाच्या तत्त्वाला बाधा येईल. म्हणूनच चातुर्वर्ण्यात अनुस्यूत असलेल्या सामाजिक व आर्थिक बंधनांना नाकारणे ही आर्थिक न्यायासाठी पूर्वअट आहे आणि आर्थिक लोकशाहीच्या प्राप्तीसाठी ती एक अत्यावश्यक बाब आहे.**

अन्यायामुळे भरडल्या जाणाऱ्या अल्पसंख्याकांना या अन्यायापासून सुटका करून घेण्यासाठी कुणाकडूनही मदतीचा हात मिळत नाही. यामुळेच क्रांतिकारी प्रवृत्ती बळावतात व लोकशाही धोक्यात येते.

अशाप्रकारे सामाजिक व आर्थिक बाबींत समान संधी, भ्रातृभावावर आधारित समाजव्यवस्था, न्याय मिळण्याची खात्री व सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धी या डॉ. आंबेडकरांच्या मनोराज्यातील सामाजिक आर्थिक लोकशाहीच्या उदयासाठी आवश्यक अशा पूर्वअटी होत.

## घटनात्मक खबरदारी

इ.स.१९४७ मध्ये डॉ.आंबेडकरांनी घटना समितीला एक निवेदन सादर करून अनुसूचित जातीच्या रक्षणासाठी घटनेत कोणत्या तरतुदी असणे आवश्यक आहे त्यासंबंधीची आपली मते मांडली. या निवेदनाचे शीर्षक होते, राज्ये आणि अल्पसंख्याक. या निवेदनात संसदीय लोकशाही कायम ठेवण्याच्या आवश्यकतेवर भर देऊन, साध्या बहुमताने राज्य समाजवादाची

अंमलबजावणी रोखून धरता येऊ नये, त्यात दुरूस्ती करता येऊ नये वा मुळातच ती रद्द करता येऊ नये म्हणून राज्य समाजवादाची अंमलबजावणी राज्यघटनेद्वारा व्हावी, असे त्यांनी सुचवले.

केवळ या रीतीनेच संसदीय लोकशाही कायम ठेवणे, समाजवादाची अंमलबजावणी करणे व हुकूमशाही टाळणे हे तिन्ही हेतू साध्य करता येतील असे डॉ. आंबेडकरांना वाटत असे. नंतर घटना समितीसमोर भाषण करताना डॉ.आंबेडकरांनी सांगितले की, नवीन राज्यघटना निर्माण करण्यामागे दोन उद्दिष्टे होती. १) राजकीय लोकशाहीची पद्धत रूढ करणे. २) आर्थिक लोकशाही हेच आपले उद्दिष्ट आहे असे नमूद करणे व कुठलेही सरकार सत्तेवर असो, ते आर्थिक लोकशाही आणण्यास बांधील राहील असे जाहीर करणे. याप्रमाणे आर्थिक लोकशाहीची संकल्पना भारतीय राज्यघटनेत सुरुवातीपासूनच घट्टपणे रुजवण्यात आली होती.

अर्थातच सरकारी धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांचा घटनेत



**डॉ.आंबेडकर म्हणतात, आर्थिक लोकशाही अनेक मार्गांनी साध्य करता येईल असा लोकांना विश्वास वाटतो. काही लोकांना आत्यंतिक व्यक्तिवाद हा आर्थिक लोकशाहीचाच सर्वोत्कृष्ट प्रकार आहे असे वाटते, तर काही लोकांना समाजवादी राज्यामुळेच आर्थिक लोकशाही येईल असे वाटते. आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी साम्यवादी मार्ग हाच एकमेव मार्ग आहे. परंतु एखाद्या प्रवाही कल्पनेला असे बंदिस्त करणे बरोबर नाही (आर्थिक लोकशाही) ही एक मूलत: बदलत जाणारी संकल्पना आहे आणि परिस्थिती व कालानुरूप ती सतत बदलत असते म्हणून आर्थिक लोकशाहीचा पाया घालण्यासाठी, सरकारी धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा भारतीय घटनेत अंतर्भाव करण्याचा त्यांनी आग्रह धरला.**

समावेश करणे आवश्यक असले तरी सामाजिक-आर्थिक लोकशाहीच्या अंमजबजावणीसाठी तेवढेच पुरेसे नाही, याची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. म्हणून राज्यघटनेचा स्वीकार करताना केलेल्या भाषणात त्यांनी ताकीद दिली की, २६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंवादी जीवनात प्रवेश करणार आहोत. आपल्यात राजकीय समता असेल पण आर्थिक आणि सामाजिक जीवनात विषमता असेल. राजकारणात एक व्यक्ती एक मत व प्रत्येक मताची समान किंमत हे तत्त्व आपण मान्य करू. परंतु आपल्या सामाजिक व आर्थिक जीवनात, आपल्या सामाजिक आणि आर्थिक धाटणीमुळे सर्व व्यक्ती समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारत राहू. असे विसंवादी जीवन आपण कुठपर्यंत जगत राहणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळापर्यंत समानता नाकारत राहणार आहोत? फार काळपर्यंत आपण तसे करीत राहू तर आपली राजकीय लोकशाही संकटात सापडेल. शक्य तितक्या लवकर आपण हा विसंवाद दूर केला पाहिजे. नाहीतर या असमानेतेचे बळी ठरणारे लोक राजकीय लोकशाहीचा डोलारा उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाहीत.

## डॉ. आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान

भारतीय अर्थशास्त्रीय विचार आणि भारताचे अर्थशास्त्रीय प्रश्न यासंबंधी डॉ. आंबेडकरांनी जे विविधांगी व व्यापक योगदान दिले त्यामुळे त्या प्रश्नांचे नाजूक आंतरदुवे काहीसे अस्पष्ट झालेले आहेत. आणि म्हणूनच त्यांच्या वरवर भिन्न भासणाऱ्या अंशदानात एक सूत्रबद्धता आहे हे ध्यानात घेणे आवश्यक ठरते. खरे पाहता, एक अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ.आंबेडकरांनी केलेल्या सर्व योगदानांमागे एक सुस्पष्ट व सुसंबद्ध आर्थिक तत्त्वज्ञान आहे.

## आर्थिक तत्त्वज्ञानाचे सार

डॉ. आंबेडकरांच्या सर्वंकष आणि विविधलक्ष्यी अर्थशास्त्रीय कामगिरीमागील आर्थिक तत्त्वज्ञानाचा उलगडा होऊ शकतो. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे मूलसूत्र आहे 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय.' डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाला सामाजिक, धार्मिक आणि नैतिक अधिष्ठान आहे. शोषित आणि पीडित समाज हा त्यांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वयत्रींचा; राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा व्यापक दृष्टिकोनातून हे तत्त्वज्ञान पुरस्कार करते. जाती, पंथ यांचा विचार न करता दीनदुबळ्यांना आधार देऊन सर्व भारतीयांसाठी स्वातंत्र्य, समता आणि न्याय प्रस्थापित करणे हा डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा मूलाधार आहे. प्रज्ञा, शील आणि करुणा यांवर आधारित, जातीविरहित, वर्गविरहित आणि लोकशाहीप्रणीत समाजाची निर्मिती हे डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक विचारांकडे दुर्लक्ष करून भारतीय समाजाने त्यांच्यावर अन्याय तर केलाच आहे, पण स्वत:चे देखील अपरिमित नुकसान करून घेतले आहे. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक तत्त्वज्ञान हे काही विशिष्ट घटकांसाठी नव्हते, तर संपूर्ण देशाचे हित त्यांच्या डोळ्यांपुढे होते. त्यांना केवळ दलितांचे नेते मानणे हा या महान राष्ट्रनेत्याचा अपमान तर आहेच, परंतु ते या देशाचे दुर्दैवदेखील आहे. भारतीय अर्थकारणावर डॉ. आंबेडकरांनी केलेले विद्वत्तापूर्ण लेखन-संशोधन, तसेच प्रत्यक्ष जनआंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी केलेले कृतिशील अर्थशास्त्रीय योगदान लक्षात घेतले तर डॉ. आंबेडकर हे भारतातील अत्यंत श्रेष्ठ अर्थतज्ज्ञ होते यात शंका उरत नाही.

**(लेखक हे पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि आंबेडकरी विचारांचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत.)**
**संपर्क : ०९७११९८२७९**

# वेगळे बाबासाहेब...

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अष्टपैलू होते. राजकारणी, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार, लेखक म्हणून बाबासाहेबांनी असामान्य कार्य केले आहे. या कार्यात अखंड व्यस्त असताना सुद्धा ते इतरही क्षेत्रात रस घेत. विविध विषयांचा अभ्यास करत. अशा प्रकारे त्यांनी आपले व्यक्तिमत्त्व परिपूर्ण केले होते.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बऱ्यापैकी चित्रकार होते. त्यांनी बरीच पेंटिंग्ज केली होती. बाबासाहेबांना कसरत करणे आवडायचे. आवडीनिवडी साऱ्या चोख व टापटीप होत्या. त्यांना मसाज करवून घेणे आवडे. गावठी विनोदावर ते बेहद फिदा असत. एकदा त्यांनी व्हायोलिन शिकायचे ठरविले. उस्ताद लावण्यात आला. तो शिकवू लागला. काही दिवसांनी बाबासाहेब त्याला शिकवित आहेत की काय असे दृश्य असायचे. व्हायोलिनच्या तांत्रिक बाबीवर, स्वरज्ञानावर बाबासाहेब त्याला इतके प्रश्न विचारायचे, इतकी माहिती पुरवायचे की तो हैराण व्हायचा. बाबासाहेबांच्या



**छायाचित्र काढताना रावबहादूर सी. के. बोले यांना बसायला जागा नसल्याने डॉ. आंबेडकरांनी त्यांना आपल्या मांडीवर बसवून घेतले. त्यावेळी खदखदून हसतानाची डॉ. आंबेडकरांची दुर्मीळ मुद्रा.**

आवडीनिवडीच्या या गोड, अविस्मरणीय आठवणी त्यांचे निजी सचिव नानकचंद रत्तु नागपुरात सहा दिवसाच्या मुक्कामाने डिसेंबर १९८९ रोजी आले होते; त्या वेळी त्यांनी जागोजागी झालेल्या सत्कार समारंभाप्रसंगी सांगितल्या.

### संगीत

बाबासाहेबांनी मुंबईत नाना व बाळ साठे या बंधुद्वयाकडून व्हायोलिनचे धडे (१९५१ ते १९५३, १९५४) घेतले होते. तेव्हा ते पहिल्या भारतीय मंत्रिमंडळात होते. उतारवयात या महामानवाला व्हायोलिन तंतुवाद्य का शिकावे वाटले असेल? या विषयी मानसिकता अभ्यासली तर असे कळते की, तंतुवाद्यातून निघालेले सूर मनुष्याला ताणतणाव कमी करावयास मदत करतात.

### पेन/पेन्सिली

उत्तम पेनांचीही बाबासाहेबांना हौस होती. त्यांचा साहाय्यक जॉन मुंबईतला बाजार धुंडाळून शहरात उपलब्ध असलेले विविध आकाराची पेने आणत असे. प्रत्येक पेनने छोट्या कागदावर आपली स्वाक्षरी करून पाहता आणि आवडलेली पाच-सात पेने आपल्या कोटाच्या खिशाला लावत असत. तसेच लिखाणासाठी निरनिराळ्या तऱ्हेच्या शिसपेन्सिली जमविण्याची त्यांना हौस होती. फिरावयास जाताना त्यांची मोटार हटकून एखाद्या स्टेशनरीच्या दुकानापुढे थांबे व दुकानवाला निरनिराळ्या प्रकारच्या वीस-पंचवीस पेन्सिली त्यांच्यापुढे आणून दाखवी. त्यापैकी सात-आठ पेन्सिली ते विकत घेत. निरनिराळ्या तऱ्हेच्या फाउंटन पेनप्रमाणेच निरनिराळ्या पेन्सिली त्यांच्या टेबलावर असत व त्यापैकी एखादी शिसपेन्सिल त्यांच्या टेबलावरून कोणी नेली तर ते संतापत व ती परत मिळाल्याशिवाय घरातील इतर लोकांची धडगत नसे.

### बागकाम

बाबासाहेब उत्कृष्ट बागवान होते. त्यांना बागकामाची अतिशय आवड होती. निसर्गाच्या सहवासात काम करण्यात त्यांना आनंद वाटे. साताऱ्याचे निवास, मुंबईचे राजगृह, पृथ्वीराज मार्गावरील निवास, नवी दिल्लीतील 'कनिका हाऊस' अथवा औरंगाबादचे मिलिंद महाविद्यालयातील रमणीय बागा येथील फुलझाडे स्वतः बाबासाहेबांनी लावली होती. निरनिराळी वृक्षसंपदा पाहून त्यांना पुरातन काळातील आयुर्वेदिक औषधीशास्त्राचे स्मरण होई. दिल्लीतील त्यांच्या बागेला 'घरासमोरील उत्तम बगिचा' म्हणून बक्षिसही मिळाल्याचे ते अभिमानाने सांगत.

### पशू/श्वानप्रेम

१९३३ च्या पूर्वी बाबासाहेबांचे वास्तव्य बी.आय.टी. चाळीत असताना त्यांनी हरिण पाळले होते. बाबासाहेबांच्या 'राजगृह' निवासस्थानी टॉबी नावाचा कुत्रा होता. सायंकाळी घरी परतताना ते टॉबीसाठी जिलेबी आणत. घटना मसुदा समितीचे अध्यक्ष असताना त्यांनी 'कॉकर सॉनियल' जातीचा कुत्रा पाळला होता. त्याचे नाव पीटर होते. पीटरची सोबती मोनिका नावाची कुत्री होती.

बाबासाहेबांना मोनिकाचा फारच लळा होता. ते तिला हाताने जेवण भरवीत. टॉबीचे निधन झाले तेव्हा बाबासाहेब धाय मोकलून रडले होते. एकनिष्ठ पीटरने बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर एक महिन्याच्या आतच देह ठेवला.

**- मिलिंद मानकर**

**(लेखक हे नागपूर येथील महाराष्ट्र टाइम्स येथे कार्यरत असून बाबासाहेबांच्या वेगळ्या आठवणींचे संग्राहक आहेत.)**

**संपर्क : ०७७०९३२९८०२**

# उभारणी देशाची

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाचे आणि विचारांचे मूल्यांकन केल्यानंतर स्पष्ट होते की, त्यांचे देशाच्या विकासामध्ये फार मोठे योगदान आहे. डॉ. आंबेडकरांनी देशाचे संविधान लिहिले आणि त्यांनी देशातील वंचित लोकांच्या उत्थानाकरिता चळवळ केली. या दोनच बाबी सर्वसामान्य लोकांना माहीत आहेत. परंतु त्यांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रांमध्ये मूलभूत स्वरूपाचे योगदान दिले. स्वातंत्र्योत्तर भारताचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी एक आदर्श प्रारूप तयार केले. त्यांनी हे आर्थिक विकासाचे प्रारूप** (Model of Economic Development) **'राज्य आणि अल्पसंख्याक'** (States and Minorities) **मध्ये मांडले आहे. त्याकरिता त्यांनी राज्य समाजवादाची** (State Socialism) **संकल्पना मांडली.**

**डॉ. प्रदीप आगलावे**

भारतात मताधिकाराच्या संदर्भात सुधारणा करण्यासाठी लॉर्ड साउथबोरो यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीला साउथबोरो समिती असे म्हटले जाते. या समितीला २७ जानेवारी १९१९ रोजी डॉ. आंबेडकरांनी लिखित साक्ष दिली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे प्रतिपादन केले होते की, ''लोकप्रिय शासनाचा अर्थ केवळ लोकांकरिता शासन असा नाही, तर लोकांचे शासन असा आहे. म्हणून भारतात लोकप्रिय शासनाकरिता मताधिकार आणि निर्वाचन क्षेत्राची व्यवस्था करताना मताधिकार समितीला हे ध्यानात ठेवावे लागेल की, विचारांचे प्रतिनिधित्व आणि व्यक्तीच्या प्रतिनिधित्वाची व्यवस्था करावी.''



स्वतंत्र भारताचे पहिले विधिमंत्री म्हणून शपथ घेताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

लोकांचे शासन हा खरा शासनाचा अर्थ आहे. त्याकरिता लोकांनी आपले प्रतिनिधी निवडण्यासाठी प्रौढ मताधिकाराचा स्वीकार केला पाहिजे असे डॉ. आंबेडकरांनी लॉर्ड साउथबोरो यांना १९१९ मध्ये सांगितले होते. यावरून डॉ. आंबेडकरांचे देशप्रेम दिसून येते. त्यावेळी त्यांचे वय केवळ २८ वर्ष होते.

## शेतकऱ्यांची चळवळ

गरीब, दरिद्री शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी १९२८ पासूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले होते. १९२७ मध्ये देशात समता प्रस्थापित व्हावी म्हणून महाडचे आंदोलन त्यांनी केले होते. तर त्यानंतर लगेच दुसऱ्या वर्षी म्हणजे १९२८ पासून त्यांनी कोकणातील शेतकऱ्यांची खोतांच्या दास्यातून मुक्तता व्हावी म्हणून फार मोठी चळवळ सुरू केली होती. १४ एप्रिल १९२९ रोजी रत्नागिरी जिल्हा शेतकरी परिषद चिपळूण येथे

आयोजित करण्यात आली होती. या शेतकरी परिषदेचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. त्यांनी कोकणातील खोतीदारांविरुद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन उभारले. १७ सप्टेंबर १९३७ रोजी खोती पद्धत नष्ट करणाऱ्या कायद्याचे विधेयक डॉ. आंबेडकरांनी मुंबई विधिमंडळात मांडले होते. १० जानेवारी १९३८ रोजी २५ हजार शेतकऱ्यांचा मोर्चा डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली विधिमंडळावर नेण्यात आला होता. शेतकऱ्यांच्या या यशस्वी मोर्च्यानंतर, शेतकऱ्यांची चळवळ अधिक तीव्र करण्याच्या उद्देशाने; त्यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कोकणचा दौरा केला. शेतकऱ्यांच्या अनेक सभांमध्ये त्यांनी मार्गदर्शन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. विशेष म्हणजे हे शेतकरी कुणबी, मराठे आणि मुस्लीम होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या जातीचा विचार न करता सर्व जातिधम र्चिया शेतकऱ्यांसाठी चळवळ उभारली होती.

## कामगारांच्या विकासाकरिता चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजुरांच्या उत्थानाकरिता विशेष कार्य केले. मजुरांच्या समस्या राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर मांडण्यासाठी त्यांनी १५ ऑगस्ट १९३६ मध्ये 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला होता. या पक्षात सर्व जातिधर्माचे मजूर होते. या पक्षातर्फे त्यांनी मुंबई आणि सी.पी. ॲण्ड बेरार प्रदेशातील विधानसभेच्या निवडणुका १९३७ मध्ये लढविल्या होत्या त्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाचे उमेदवार निवडून आणले. विशेष म्हणज ते वेगवेगळ्या जातीचे होते.

सप्टेंबर १९३८ मध्ये मुंबई विधानसभेत शासनाने 'औद्योगिक विवाद विधेयक' सादर केले होते. या विधेयकात विशिष्ट परिस्थितीत काम गारांचा संप बेकायदेशीर ठरविण्याची तरतूद होती. डॉ. आंबेडकर हे त्या वेळी मुंबई विधानसभेत विरोधी पक्षनेते होते. त्यांनी या विधेयकाला कडाडून विरोध केला. 'औद्योगिक विवाद विधेयक म्हणजे मजुरांकरिता काळा कायदा होय.' अशा शब्दात त्यांनी या बिलाची निर्भत्सना केली होती.

या विधेयकास विरोध करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर १५ सप्टेंबर १९३८ रोजी मुंबई विधानसभेत म्हणाले की, ''माझ्या मते, या विधेयकास कामगारांचे 'नागरिक स्वातंत्र्य हनन विधेयक' या नावाने संबोधले पाहिजे. हे विधेयक याच रूपात पारित करायला नको. हे विधेयक कामगारांना अपंग बनविते. संपावर प्रतिबंध लावणे म्हणजे कामगारांना गुलाम बनविणे होय. काम गारांना माहीत नसेल की, हे विधेयक काय आहे. परंतु जेव्हा हे विधेयक लागू होईल आणि कामगारांना या विधेयकाचा सामना करावा लागेल तेव्हा ते म्हणतील की, हे विधेयक वाईट आहे, खुनी आहे आणि क्रूर आहे.''

मुंबई विधानसभेत या विधेयकाला विरोध करून डॉ. आंबेडकर थांबले नाही तर त्यांनी कामगारांना संघटित करून गिरणी आणि कारखान्यातील कामगारांचा एक दिवसाचा संप ७ नोव्हेंबर १९३८ रोजी घडवून आणला. भारतीय कामगारांच्या इतिहासातील हा सर्वात मोठा संप होता. त्या दिवशी सर्व कापड गिरण्या आणि इतर उद्योगातील आणि महानगरपालिकेचे सर्व कारखाने बंद होते. संपात गिरणी कामगार युनियनेदेखील सहभागी झाली होती. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वात झालेल्या या संपात जमनादास मेहता, कॉ. परुळेकर, कॉ. डांगे इत्यादी अनेक कामगार नेते सहभागी झाले होते. या ऐतिहासिक संपामुळे डॉ. आंबेडकर हे कामगार नेते म्हणून प्रसिद्धीस आले.



**आज शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्ता मिळतो. महागाई निर्देशांकानुसार महागाई भत्ता देण्याची योजना डॉ. आंबेडकरांची आहे. ते कामगार मंत्री असताना कामगारांना जो महागाई भत्ता मिळत होता तो अपुरा आहे; भडकत्या महागाईला कामगार तोंड देऊ शकणार नाहीत म्हणून वाढत्या महागाईच्या निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्यांची पूर्तता करण्यात यावी, असे त्यांनी प्रतिपादन केले होते.**

## मजुरांच्या कल्याणासाठी कायदे

जुलै १९४२ मध्ये व्हाईसराय जनरलच्या मंत्रिमंडळात मजूरमंत्री म्हणून डॉ. आंबेडकरांचा समावेश करण्यात आला होता. डॉ. आंबेडकर मजूरमंत्री झाल्यानंतर देशातील मजुरांच्या कल्याणाच्या संदर्भात त्यांनी अनेक कायदे केले. आज पुरुष आणि स्त्री मजुरांच्या कल्याणाबाबत जे विविध कायदे आढळतात त्या सर्व कायद्यांची मुहूर्तमेढ डॉ. आंबेडकरांनी १९४२-४६ या आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात केली होती.

७ ऑगस्ट १९४२ ला दिल्ली येथे झालेल्या संयुक्त श्रमिक अधिवेशनात दिलेल्या भाषणात डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, ''या अधिवेशनाचे तीन मुख्य उद्देश आहेत - १) श्रमासंबंधी कायद्यांच्या एकरूपतेस प्रोत्साहन देणे. २) औद्योगिक विवाद त्वरित निकालात काढण्याची प्रक्रिया निश्चित करणे. ३) कर्मचारी आणि नियोजक यांच्यामधील अखिल भारतीय म हत्त्वाच्या बाबींवर विचारविमर्श करणे.'' त्यानंतर त्यांनी श्रमासंबंधीच्या कायद्यामध्ये एकरूपता आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

त्या वेळी जे अनुभवी आणि अर्धशिक्षित तंत्रज्ञ वेगवेगळ्या योजनांमधून तयार होत होते ते नोकरीसाठी भटकत असत. म्हणून डॉ. आंबेडकरांनी अशा बेरोजगार तरुणांची नोंदणी करण्यासाठी सेवायोजन कार्यालयाची स्थापना केली. ही बाब अनुभवी आणि अर्धशिक्षित बेरोजगार तरुणांच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त ठरली.

## कामगार कायद्यात सुधारणा

डॉ. आंबेडकरांनी मजुरांच्या हिताच्या दृष्टिकोनातून कामगार कायद्यांमध्ये अनेक सुधारणा घडवून आणल्या. स्त्रियांना कारखाना कायद्यान्वये रात्री काम करण्याची बंदी घातली. स्त्रियांच्या प्रसूतीकाळात त्यांना विशेष भरपगारी रजेचा फायदा मिळावा म्हणून विशेष प्रयत्न केले. खाणी प्रसूती लाभ कायद्यात सुधारणा केली. भूमिगत कोळसा खाणीतील महिला कामगारांसाठी प्रसूती लाभ (संशोधन) विधेयक मंजूर करवून घेतले. कामगारांच्या कल्याणकारी कार्यक्रमासाठी कल्याण फंड स्थापन केला. महिला-पुरुष कामगारांना समान वेतनाची तरतूद केली. खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्याच्या दृष्टीने खाणी मालकांनी विशेष सोयी कराव्यात यासाठी १९२३ च्या भारतीय खाण कायद्यात संशोधन करणारे भारतीय खाण विधेयक मंजूर करून घेतले. कामगारांच्या कामाचे तास कमी करण्यासाठी १९३४ च्या कारखाना कायद्यात सुधारणा केली.

कारखान्यातील बारमाही कामगारांना भरपगारी रजा द्यावी अशी तरतूद कामगार कायद्यात केली. त्यापूर्वी अशा कामगारांना कोणत्याच रजेचा फायदा मिळत नसे. सक्तीची किंवा लवाद हे कामगारांना अत्यंत हितावह आहे. त्यामुळे हे तत्त्व कामगारांच्या न्याय पद्धतीत कायम स्वरूपाचे मान्य करण्यात आले.

**डॉ. आंबेडकरांनी भारताच्या नियोजित विकासाबाबत केवळ विचार मांडले नाहीत. तर त्यांनी भारताच्या विकासाच्या संदर्भात अत्यंत महत्त्वाकांक्षी असे बहुउद्देशीय प्रकल्प देशात उभारले. बहुउद्देशीय नदी खोरे प्रकल्पाची (Multi-purpose River Valley Project) संकल्पना त्यांनी मांडली. दामोदर नदी खोरे योजना तयार करण्यापासून तर ती मंजूर करून घेण्यापर्यंत सर्व कार्य डॉ. आंबेडकरांनी आपल्या देखरेखीखाली पूर्ण केले होते. दामोदर नदी योजनेप्रमाणेच हिराकुड नदी योजना, सोने नदी खोरे योजना इत्यादी योजनांचे प्रारूपदेखील त्यांनी तयार केले होते. स्वातंत्र्योत्तर काळात देशात धरणांचे जे प्रकल्प उभारण्यात आले त्याची पायाभरणी डॉ. आंबेडकरांनी १९४२-१९४६ च्या दरम्यान केली होती. केंद्रीय जल आयोगाची स्थापना १९४५ मध्ये त्यांनी केली होती. दामोदर नदी योजना, हिराकुड नदी योजना, सोने नदी खोरे योजनांमुळे पुराचे संकट टळले. त्याचबरोबर धरणांमुळे लाखो शेतकऱ्यांच्या शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था झाली. तसेच औद्योगिक विकासाकरिता विद्युतची निर्मिती करण्यात आली. दामोदर प्रकल्पाबद्दल कोलकता येथील परिषदेत ३ जानेवारी १९४५ रोजी डॉ. आंबेडकर यांनी सांगितले की, ''दामोदर प्रकल्प हा बहुउद्देशीय प्रकल्प असेल. आमचा उद्देश केवळ पुराची समस्या सोडविण्यापुरता मर्यादित नसून सिंचन, विद्युत आणि जल वाहतूक हा असला पाहिजे.''**



**हिराकुड धरण : या प्रकल्पाचे प्रारूप डॉ. आंबेडकर यांनी तयार केले.**

कामगार स्थायी समितीची बैठक ऑगस्ट १९४५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी त्यांनी औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी घरे बांधण्यासंबंधीची मालकांवरील जबाबदारी आणि भरपगारी रजा यावर भर दिला होता. डिसेंबर १९४५ मध्ये मुंबईच्या सचिवालयात विभागीय कामगार प्रशासकाची परिषद भरली होती. या परिषदेचे उद्घाटन करताना डॉ. आंबेडकर म्हणाले, ''औद्योगिक अशांतता टाळण्यासाठी किंवा ती कमी करण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे समेट घडवून आणण्यासाठी योग्य अशी समेट यंत्रणा हवी. दुसरी गोष्ट म्हणजे औद्योगिक कलह कायद्यात सुधारणा केली पाहिजे आणि तिसरी गोष्ट काम गारांना कमीत कमी किती पगार असावा हे शासनाने ठरवले पाहिजे.''

केंद्र सरकारचे काही कामगार कायदे होते. परंतु ते कायदे अपुरे आणि कामगारांना जाचक होते. उदा. इंडियन बॉयलर्स ॲक्ट, मोटार वाहन कायदा, स्त्री प्रसूती लाभ कायदा, कारखाने अधिनियम, इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट, पगार देण्याचा कायदा, अपघात नुकसान भरपाई कायदा, अभ्रक खाण कामगार कल्याण कायदा, औद्योगिक कलह कायदा इत्यादी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः पुढाकार घेऊन कामगारांच्या दृष्टीने अपुरे आणि जाचक असलेल्या विविध कामगार कायद्यात सुधारणा घडवून आणल्या.

ऑगस्ट १९४७ मध्ये डॉ. आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री झाले. त्यावेळी त्यांनी औद्योगिक कलह कायदा १९४७, कारखाने अधिनियम १९४८, किमान वेतन कायदा १९४८ इत्यादी कायद्यात मजुरांच्या हिताच्या दृष्टीने अनेक सुधारणा केल्या. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांनी कामगारांच्या कल्याणाकरिता कामगाराचे आंदोलन चालविले आणि स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर कामगारांच्या हिताचे कायदे करून कामगारांना खरा न्याय मिळवून दिला. देशातील कामगारांच्या संदर्भात त्यांचे योगदान विशेष आहे. त्यांना कामगारांच्या प्रश्नांची जाणीव होती. इतकेच नव्हे तर कामगारांचे कल्याण व्हावे, ही त्यांची तळमळ होती.

## अखंडता आणि एकता टिकवणारी राज्यघटना

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना लिहून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष महत्त्वपूर्ण योगदान दिले. देशाची अखंडता आणि एकता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात राज्यघटनेचे विशेष योगदान आहे. राज्यघटनेने देशातील सर्व नागरिकांना मूलभूत हक्क आणि न्यायाची हमी दिली. आपली राज्यघटना मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी आहे म्हणून आपल्या देशाची राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आहे. जगातील अनेक देशांनी भारतीय राज्यघटना ही सर्वश्रेष्ठ आणि अद्वितीय असल्याचे मान्य केले. ऑक्सफोर्ड आणि केंब्रिज विद्यापीठातील नामवंत प्राध्यापक आणि राज्यशास्त्रज्ञ अर्नेस्ट वार्कर ह्यांनी १९५१ मध्ये 'Principles of Social and Political Theory' हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ प्रोफेसर वार्कर ह्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेस (Preamble) अर्पण केला. ग्रंथाच्या प्रास्ताविकेत त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, ''माझ्या या प्रस्तुत ग्रंथाचे विचारसार भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत सामावलेले आहे. भारतीय जनतेने आपल्या स्वातंत्र्याचा प्रारंभ करताना ह्या श्रेष्ठ मानवी मूल्यांचा अंगीकार केला ह्याचा मला अभिमान वाटतो.''

## देशाला स्थैर्य

आपल्या शेजारच्या देशांचा अभ्यास केल्यास असे आढळून येते की, पाकिस्तान, बांग्लादेश, म्यानमार, नेपाळ इत्यादी देशांमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊ शकली नाही. त्या देशांमध्ये सतत राजकीय अस्थैर्य आहे. परंतु आपला देश मात्र राजकीयदृष्ट्या स्थिर आहे. इतकेच नव्हे तर सर्वात जास्त लोकसंख्या असलेला लोकशाही भारत म्हणून एक वेगळी प्रतिमा संपूर्ण जगात निर्माण झाली आहे. याचे एकमेव कारण म्हणजे भारतीय राज्यघटना होय. देशात शांतता आणि स्थैर्य असल्यामुळे देशाचा विकास होऊ शकला. भारतीय राज्यघटनेमुळे आपला देश अस्थिर झाला नाही. देश अस्थिर करण्याचे अनेकदा प्रयत्न झाले. देशाचे विभाजन करणाऱ्या खलिस्तान, गोरखालँड इत्यादी अनेक विघटनकारी घटना घडल्या. परंतु राज्य घटनेनुसार देशाचे केंद्र सरकार हे मजबूत आणि स्थिर असल्यामुळे या सर्व विघटनकारी शक्तीचा बीमोड करणे केंद्र सरकारला शक्य झाले.

आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे. कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत. कुणीही लहान किंवा मोठा नाही. 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' (One Man, one Vote and one Value) हे तत्त्व आपल्या राज्यघटनेने स्वीकारले आहे. सर्व गोष्टींच्या तुलनेत देश मोठा आहे, बाकीच्या गोष्टीनंतर देशाची अखंडता आणि एकतेबाबत कुठेही तडजोड नाही. देशाची अखंडता आणि एकता टिकवून ठेवण्याच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेचे फार मोठे योगदान आहे. ही गोष्ट कुणालाही नाकारता येणार नाही. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटना लिहिली नसती तर आपली राज्यघटना ही वेगळी राहिली असती. सर्वसामान्य लोकांना घटनेत स्थान राहिले नसते. कालबाह्य रूढी आणि परंपरांच्या आधारावर कायदे करण्यात आले असते. परंतु डॉ. आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष असल्यामुळे सर्वसामान्य लोकांना न्याय देणारी आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार करणारी राज्यघटना लिहिण्यात आली म्हणून भारतीय राज्यघटनेच्या रूपात डॉ. आंबेडकरांचे देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये विशेष योगदान आहे.

### आर्थिक विकासाच्या योजना

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे थोर अर्थशास्त्रज्ञ होते. त्यामुळे त्यांनी देशातील आर्थिक विकासाबाबत चिंतन करून अतिशय महत्त्वपूर्ण विचार मांडले. त्यांनी औद्योगिकीकरणाचा पुरस्कार केला. औद्योगिकीकरण हे देशातील आवश्यक गरजा आणि देशातील स्त्रोत यावर आधारित असले पाहिजे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. अलीकडे शाश्वत विकास (Sustainable Development) महत्त्वाचा मानला जातो. जगातील सर्व अर्थशास्त्रज्ञ आणि विचारवंत शाश्वत विकासाला महत्त्व देतात. डॉ. आंबेडकरांनी १९४२-४६च्या दरम्यान शाश्वत विकासाबाबत आपली भूमिका मांडली होती.**



भारताच्या विकासाबाबत डॉ. आंबेडकरांनी महत्त्वाचा विचार मांडला होता. आपल्या देशात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधने आहेत. त्या नैसर्गिक साधनांवर आधारित आपले उद्योगधंदे असले पाहिजेत. विशेष म्हणजे नियोजन करून आपल्याला योग्य प्रकारे देशाचा विकास करणे शक्य आहे असे त्यांचे विचार होते. भारताचा विकास कशाप्रकारे केला पाहिजे? या संदर्भात ते म्हणतात की, ''आपल्या देशातील नैसर्गिक स्त्रोतांचे नियोजन करून त्या स्त्रोतांचा योग्य उपयोग केला तर भारताचा विकास होईल.'' देशात औद्योगिकीकरण घडवून आणण्यासाठी विद्युत आवश्यक आहे, याची जाणीव डॉ. आंबेडकरांना होती म्हणून त्यांनी विद्युतची निर्मिती करण्याबाबत राष्ट्रीय धोरण ठरवले.

देशात विद्युतचा विकास करण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे धोरण महत्त्वाचे ठरले. विद्युतच्या संदर्भात राष्ट्रीय धोरण ठरवताना २५ ऑक्टोबर १९४३ रोजी डॉ. आंबेडकरांनी ''भारतामध्ये विद्युत ही स्वस्त आणि मुबलक का असावी?'' असा प्रश्न उपस्थित करून त्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी स्वतः दिले. त्यांच्या मते, ''स्वस्त आणि मुबलक विद्युत असल्याशिवाय भारताचे औद्योगिकीकरण यशस्वी होऊ शकत नाही.'' यावरून डॉ. आंबेडकरांची दूरदृष्टी आपल्या लक्षात येते. डॉ. आंबेडकरांनी विद्युतच्या संदर्भात अतिशय महत्त्वपूर्ण राष्ट्रीय धोरण तयार केले होते. त्या राष्ट्रीय विद्युत धोरणाच्या आधारावरच स्वातंत्र्योत्तर काळात विद्युतचा विकास झाला.

त्यांच्या मते,''देशातील मोठे आणि पायाभूत उद्योग हे राष्ट्राच्या मालकीची असले पाहिजेत.'' त्याचप्रमाणे त्यांनी शेती हा राष्ट्रीय उद्योग असावा ही अभिनव संकल्पना मांडली. संपूर्ण शेती ही राष्ट्राच्या मालकीचे असेल आणि शेती करण्यासाठी ती शेतकऱ्यांना दिली जाईल. शेतीची लागवड आणि बी-बियाणे इत्यादीकरिता पतपुरवठा शासन करील. पीक आल्यानंतर शेतकरी शासनाने लावलेला पैसा शासनाला वापस करील. परंतु ही त्यांची अभिनव संकल्पना विरोधामुळे राज्यघटनेत समाविष्ट होऊ शकली नाही.

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्षेत्रात प्रचंड योगदान दिले. डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. परंतु त्याचबरोबर ते स्वातंत्र्योत्तर भारताचेदेखील शिल्पकार आहेत.

**(लेखक हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथील डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग आणि डॉ. आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख आहेत.)**
**संपर्क : ०९८८१२६२६६०**

# दोन बाबा, अनोखा मर्मबंध

**गाडगेबाबा आणि बाबासाहेब यांच्यात गुरूशिष्याचे नाते असले तरी ते अगदी पारंपरिक अर्थाने कधीच या दोघांनीही स्वीकारले नाही. दोघांनीही त्या परंपरेचा उदो-उदो केला नाही. एक वेगळाच अद्वैती बाणा, हे त्यांच्या संबंधाचे वैशिष्ट्य होते. जिव्हाळा, आपुलकी, काळजी, प्रेम, आदर, कळवळा, सार्थ अभिमान, सामंजस्य, समन्वय, समाजाप्रतीचा आत्मभाव आणि परस्परातील आत्मीयता असे हे अद्वैत होते. गाडगेबाबांची कीर्तने हा त्यांच्यातला संवाद होता. त्यांची वाचा होती, विचाराची देवाणघेवाण होती. म्हणूनच बाबासाहेब सातत्याने गाडगेबाबांच्या कीर्तनांना हजेरी लावत.**

**डॉ. सतीश पावडे**

भारताच्या संत परंपरेत लोकसंत गाडगेबाबा हे सर्वार्थाने आगळेवेगळे संत आहेत. कीर्तन हे त्यांचे लोक प्रबोधनाचे माध्यम पण त्याचे रूप–स्वरूपही या कर्मयोग्याचेच दर्शन घडवणारे होते. त्याच्या शैलीत, आकृतिबंधात, रूपबंधात आमूलाग्र बदल त्यांनी केला. परंपरेपेक्षा एक नवी कीर्तनशैली त्यांनी जन्मास घातली. या कीर्तनाच्या माध्यमातूनच गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब एकत्र आले. मुंबईत जेव्हा जेव्हा गाडगेबाबांचे कीर्तन असेल तेव्हा तेव्हा बाबासाहेब त्यांचे कीर्तन ऐकायला जात. खाली जमिनीवरच बसून ते सर्वसामान्यांसारखे कीर्तन ऐकत. हळूहळू गाडगेबाबांनाही ते कळले. एकदा मुंबईच्या भायखळा मार्केटमध्ये गाडगेबाबांचे कीर्तन होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या सहकाऱ्यांसोबत कीर्तनाला गेले. कीर्तन सुरू होताच श्रोत्यांपैकी एकाने त्यांना विचारले, 'महाराज एक इचारू का?' त्यावर गाडगेबाबा म्हणाले, 'इचारा मायबाप. पण मले महाराज मनू नका. मी आपले लेकरू हाय. बोलविते धनीच बसलेत तुमच्या पलीकडे. तेच हाये खरे महाराज. गर्रीब लोकायसाठी, आपल्या समाजासाठी लढणारे महाराज, तुमच्यासाठी आथीस जमिनीवर बसून माह्य कीर्तन आईकून राह्यले', असे म्हणून त्यांनी बाबासाहेबांकडे बोट दाखवले. डॉ. आंबेडकर चक्क जमिनीवर बसून कीर्तन ऐकत होते.

### अतूट नाते

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांचे अतूट नाते होते. समाजातील जुनाट रूढी, परंपरा, अंधकार नष्ट करण्यासाठी या दोन्ही महापुरुषांनी घरादारावर, संसारावर, सुख–दुःखावर तुळशीपत्र ठेवून पददलितांच्या उद्धाराची, विकासाची, आधुनिक विचारांची स्वप्ने पाहिली.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील आणि भाऊराव गायकवाड यांच्यासोबतचे पंढरपूर येथील छायाचित्र.**



**शिक्षणाविषयीचा बाबासाहेबांचा विचार गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून मांडत. बाबासाहेबांचा जीवन संघर्ष ते आपल्या कीर्तनातून लोकांना सांगत. त्यांच्या शिक्षणविषयक कामाची माहिती देत. समाज प्रबोधनाच्या कार्यात दोघेही परस्परांना पूरक होते. त्यांच्यात एक वेगळाच अनुबंध होता. हा परस्परांतील आत्मभाव एकमेकांना कळत होता.**

डॉ. बाबासाहेबांच्या विद्वत्तापूर्ण व्यक्तिमत्त्वाने संत गाडगेबाबांचे मन भारावून जाई. त्यांच्या कर्तृत्वाने गाडगेबाबा अतिशय प्रभावित झाले होते. म्हणूनच बाबा आपल्या कीर्तनातून डॉ. बाबासाहेबांच्या नावाचा जयजयकार करण्यास लोकांना सांगत. त्यांच्याविषयी कुठे अनादर दिसला तर ते अस्वस्थ होत. लोकांना त्यांची कामगिरी समजावून सांगत. लोकांना शिक्षणाचे महत्त्व सांगताना बाबा कीर्तनात नेहमी डॉ. आंबेडकरांचा दाखला देत. बाबासाहेबांनीही गाडगेबाबांना आपले गुरू मानले. गाडगेबाबांनीही बाबासाहेबांची गुरू परंपरा समृद्ध केली. गाडगेबाबा नेहमीच आपल्या कीर्तनात बाबासाहेबांच्या कामाचा आवर्जून उल्लेख करीत. त्यांचे काम, विचार, संघर्ष लोकांपर्यंत पोचवत. एवढेच नव्हे तर लोकांना बाबासाहेबांच्या नावाच्या घोषणा द्यायला लावत. गाडगेबाबा यांनी बाबासाहेब यांच्यावर कविताही रचली होती. अनेक कीर्तनात ते तालासुरात गाऊन दाखवत. आपल्या अखेरच्या कीर्तनात गाडगेबाबा म्हणतात, ''विद्या केवढी मोठी गोष्ट आहे. डॉक्टर आंबेडकर साहेब यांच्या पिढ्यान् पिढीनं झाडू मारायचं काम केलं. यांच्या वडिलाले सुबुद्धी सुचली आणि आंबेडकर साहेबाले शाळेत घातलं. आंबेडकर साहेबांनी काही लहानसान कमाई नाही केली. हिंदुस्थानची घटना केली. घटना. अन् तेच शाळेत जाते ना, अन शिकते ना, तर झाडू मारनंच त्यांच्या कर्मात होतं. विद्या मोठं धन आहे. जेवनाचं ताट मोडा. बायकोला लुगडं कमी भावाचं घ्या. मोडक्या घरात रहा. पन मुलाले शिक्षन दिल्याविने सोडू – नीका!''



**डॉ. बाबासाहेबांच्या मनात जेव्हा हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्म स्वीकारण्याचा विचार आला, त्या वेळी बाबासाहेब सरळ गाडगेबाबांजवळ गेले . आपली मन:स्थिती व्यक्त केली. गाडगेबाबाही सर्व जाणत होते. बाबासाहेबांच्या, दलित समाजाच्या हालअपेष्टा, त्यांचा जीवनसंघर्ष त्यांना माहीत होता. बाबासाहेबांचा अभ्यास, त्यांची विद्वत्ता, त्यांची निर्णयक्षमतासुद्धा त्यांना माहीत होती. म्हणून ते बाबासाहेबांना म्हणाले,''डाक्टर साहेब मी अडाणी-अज्ञानी मानुस. तुम्ही शिकले सवरले हायेत, लय बुक वाचली आहेत, तुम्हाले आपल्या समाजाची दुक-दैना माहित हाये...मले इस्वास हाये, तुमी जो निर्णय घ्यान तो बेसच असन. बुद्ध अन त्याचा धरम माणुसकीचा धरम हाये. आम्ही बाप्पा त्याच धर्माचे वारकरी आहोत. हाच धरम मानुस्किले अंन साऱ्या समजाले पुढ नेईन. तुम्ही करान ते बरुब्बर आसन. सारा समाज तुमच्या पाठीशी हाये.''**

## ऐतिहासिक भूमिका

डॉ. आंबेडकर व गाडगेबाबांच्या या सल्ला घेण्याच्या आणि देण्याच्या प्रक्रियेत कुठलीच औपचारिकता नव्हती की कुठला पूर्वग्रह. दोन महान कर्मयोग्यांनी माणुसकीच्या हितासाठी बजावलेल्या ऐतिहासिक भूमिका होत्या. बाबासाहेबांचे प्रचंड अभ्यास, चिंतनमनन करून गाडगेबाबांचा सल्ला घ्यायला जाणे आणि बाबासाहेबांच्या निर्णयाला सूचना व सल्ला न देता, पूर्णपणे पाठिंबा देणे, स्वतःला बुद्धाचा वारकरी म्हणून जोडणे, हा त्यांच्या नात्यातल्या अद्वैताचा उत्कृष्ट नमुना आहे.

बाबासाहेब सरकारात मंत्री असतानासुद्धा बाबांची माहिती घेत. आजारी असताना गाडगेबाबांच्या भेटीस जात. एकदा मुंबईत दादरच्या डॉ. महाजनींच्या दवाखान्यात गाडगेबाबा उपचार घेत असल्याचे डॉ. बाबासाहेबांना कळले. डॉ. आंबेडकर तेव्हा स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात कायदा मंत्री होते. सायंकाळी त्यांना तातडीने दिल्लीला पोहोचायचे होते. म्हणून बॉम्बे सेंट्रल रेल्वे स्थानकावर पोहोचले होते. मात्र हा निरोप ऐकताच त्यांनी त्या दिवसाचे कार्यक्रम रद्द करून गाडगेबाबांना भेटण्यासाठी दोन घोंगड्या खरेदी केल्या आणि बाबांच्या भेटीसाठी ते दवाखान्यात गेले. ते गाडगेबाबांना म्हणाले '' आपण कोणाकडूनही काहीच स्वीकारत नाही. तरी मी या दोन घोंगड्या आपल्यासाठी आणल्या आहेत. एक अंथरण्यासाठी, एक पांघरण्यासाठी. याचा स्वीकार करावा. याच भेटीच्या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनक कर्मवीर भाऊराव पाटीलसुद्धा उपस्थित होते. या भेटीत संत गाडगेबाबांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, पंढरपूरची चोखामेळा धर्मशाळा पीपल्स एज्युकेशन संस्थेसाठी ताब्यात घ्या, असा प्रेमळ आग्रह धरला होता. आजारी असूनही बाबांनी त्यावेळी मोठ्या उत्साहाने पंढरपूर धर्मशाळेचे दानपत्र आणि धर्मशाळेच्या खात्यात जमा असलेली १५,०००/– रुपयांची रक्कम डॉ. बाबासाहेबांच्या स्वाधीन केली. ते बाबासाहेबांना म्हणाले, डाक्टर साहेब आपली लय आधीच भेट झाली असती तर म्या धर्मशाळा काढ्याच्या ऐवजी शिक्षण शाळाच काढल्या असत्या. पर आता हे काम तुम्हीच करा, सामाजाले अश्या लय स्कूलची, कालीजांची गरज हाये.'' बाबासाहेबांनी हे काम पुढे मोठ्या ताकदीने पुढे नेले. गाडगेबाबांचे स्वप्नही त्यांनी अशा प्रकारे पूर्ण केले.

आयुष्यात गाडगेबाबा कधीच रडले नाहीत. स्वत:चा मुलगा गोविंदा गेला. जन्मदात्री, आई... गेली तेव्हाही. पण ६ डिसेंबर १९५६ रोजी जेव्हा त्यांना बाबासाहेबांच्या निर्वाणाची माहिती मिळाली तेव्हा गाडगेबाबा धाय मोकलून रडू लागले. तिथल्या लोकांना समजेना बाबा असे का रडताहेत. तेव्हा बाबा आपल्या त्या सहकाऱ्यांना म्हणतात, ''अरे तुमचा आमचा बाप आज ह्या जगात नाही राहिला. अरे तुम्हीआम्ही पोरके झालो रे''. बाबा पहिल्यांदा इतके दु:खी झाले होते. या दु:खात समाजाची हानी झाल्याचे दु:ख होते. हे दु:ख मानवीय होते, 'असे गेले कोट्यानु कोटी काय रडू एकल्या साठी', असे म्हणणारे गाडगेबाबा का रडले असावेत, यातच त्यांच्यातल्या नात्याचे मर्म दडले आहे.

**(लेखक हे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा येथे सहयोगी प्राध्यापक आहेत.)**
**संपर्क : ०९३७२१५०१५८**

# पथिक नव्या वाटेचा

**बाबासाहेबांनी दलितांना आणि संपूर्ण भारताला एका नव्या रस्त्यावर आणून सोडले. भारतीय प्रतिभेला अनेक साखळ्यांमधून मुक्त केले, निर्मितीच्या आणि सृजनाच्या दिशा खुल्या केल्या, विद्रोहाला वैश्विक प्रमाण दिले आणि तरी भारतीय मातीशी, इतिहासाशी नाळ तोडली नाही. येणाऱ्या काळामध्ये सर्वांनाच बाबासाहेबांच्या या भव्य दृष्टीचा प्रत्यय येणार आहे. म्हणून जाणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक बाबासाहेबांचे मोठेपण खुलतच जाणार आहे.**

**अविनाश धर्माधिकारी**

आपण महान व्यक्ती आणि त्यांच्या विचारांची जातिपातींमध्ये विभागणी करतो. एवढी आपली बुद्धीसुद्धा चातुर्वर्ण्यामध्ये सडून गेलीय. याचा सर्वाधिक फटका बाबासाहेबांना बसला आहे. जातिव्यवस्थेने जन्मापासून आणि उभ्या जन्माची मुस्कटदाबी केलेली. गुणवत्ता असून 'अस्पृश्य' म्हणून पावलापावलावर ती खुडून काढण्याचीच व्यवस्था. गायकवाडांच्या दरबारात अधिकारी झाले तरी बडोद्यात कुणी राहायला जागा देईना, दरबारात पाणी देईना, दारावरचा उच्चवर्णीय शिपाईसुद्धा फाइल टेबलावर लांबून फेकायचा. ज्या पाणवठ्यावर घोड्या–गाढवा–कुत्र्या–मांजरांनी पाणी प्यायलेलं चालत होतं, त्याच्यावर माणूस म्हणून पाणी प्यायला गेला तर मारहाण होत होती आणि ज्या देवाधर्माच्या नावाने पायरीत गाडले होते ती पायरी ओलांडून गाभाऱ्यात जाऊ म्हटले तर आधी मान्य करून ऐनवेळी अरुंद गल्लीत गाठून रक्तबंबाळ होईपर्यंत मारले जात होते. याच्या एक शतांश जरी सोसण्याची कुणावर वेळ आली असती तर तो माणूस–विचार–संघटना 'खड्ड्यात गेला तुमचा देव आणि खड्ड्यात गेली तुमची संस्कृती' असे म्हणाला असता. आणि स्पष्टच सांगायचे तर असे म्हणाला असता तर काही चूक नव्हते. पण बाबासाहेब असे म्हणाले नाहीत, असे वागले नाहीत. एकदाच गांधीजींना म्हणाले, 'तुम्ही कोणत्या देशाबद्दल बोलता, मला देशच नाही. पण त्यामध्ये व्यथा होती, विध्वंस नव्हता. गोलमेज परिषदेत त्यांनी ब्रिटिश पंतप्रधानाला सुनावले होते, आमचे आपसातले भेद आहेत, त्याचे लढे आम्ही लढू, पण त्याचा तुम्ही फायदा घ्यायचा प्रयत्न करू नका. इथे मी जो आहे तो संपूर्ण भारताचा प्रतिनिधी म्हणून आहे, ही ती तलवारीच्या दोन पात्यांवरची वाटचाल. एकाच वेळी दलित समाजाच्या राजकीय–सामाजिक हक्कासाठी लढायचे, तरी त्याच वेळी भारताचे हित साधायचे.' बॅरिस्टर होते (अर्थशास्त्रज्ञही होते). जगभराचा तौलनिक कायदा कोळून प्यायलेले होते. आपल्यावर हल्ला झाला तर आत्मरक्षणासाठी हात उचलणे हा आपला हक्क आहे, त्याने कायदा मोडत नाही हे माहीत असून त्यांनी चवदार तळे आणि काळाराम मंदिर, दोन्ही सत्याग्रहांच्या वेळी आपल्या सहकाऱ्यांना उलट हात उचलण्यापासून, म्हणजेच सर्व समाजाला रक्तपातापासून रोखले. आपण कायद्याने लढाई लढू म्हटले – कायदा होताच बाजूचा, त्यासाठी देशावर इंग्रजांचे राज्य असावे लागत होते – याची प्रत्येक भारतीयाने शरमसुद्धा बाळगायला हवी.



लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास अभिवादन करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार रामदास आठवले.

अमेरिकेतून अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवून परतले. तिथल्या त्यांच्या गुरूनेही सलाम केला होता की हा माझा विद्यार्थी माझ्यापेक्षा हुशार आहे. परतल्यावर सयाजी महाराज, शाहू महाराजांच्या पाठिंब्यावर काम सुरू केले तरी घुसमट आणि मुस्कटदाबी संपत नव्हती. आपला शेवट जवळ आल्याचे दिसत असताना शाहू महाराजांनी माणगाव परिषदेत बाबासाहेबांकडे बोट दाखवून सांगितलं, की इथून पुढचं नेतृत्व हा तरुण

करेल – यात दोघांचेही क्रांतिकारकत्व उठून दिसते. दोन दशके प्रयत्न केल्यावर बाबासाहेबांनी जाहीर केले, 'हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' त्यानंतरही सुमारे दोन दशके कार्य केल्यावर, आता अंतकाळ समोर दिसत असताना अखेर मार्ग निवडला तो प्रज्ञा, शील आणि करुणा या तत्त्वांवर उभ्या असलेल्या बौद्ध धर्माचा.

### सखोल धर्मचिकित्सा

त्यापूर्वी बाबासाहेबांनी सखोल धर्मचिकित्सा केली. अनेक पुरोगामी, डावे वगैरे विचारवंत धर्मप्रेरणेची चिकित्सा करतच नाहीत, त्याची त्यांना ॲलर्जी असते. 'धर्म ही अफूची गोळी'पाशी त्यांची धर्मचिकित्सा संपते. मानवी जीवनातल्या अन्य आदिम प्रेरणेइतकी धर्म ही माणसाची आदिम प्रेरणा आहे हे जाणून बाबासाहेबांनी परखड धर्मचिकित्सा केली आणि निवड केली विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ बौद्ध धर्माची.

सर्व धर्मांचा सखोल तौलनिक अभ्यास, चिंतन केल्यानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करून बाबासाहेबांनी केवळ दलितांनाच नव्हे, तर सर्व भारताला, पुन्हा एकदा, सृजनशील रस्त्यावर आणून सोडले. जातिव्यवस्थेच्या अन्यायातून पेटलेली मने त्या प्रतिक्रियात्मक, नकारात्मक आगीतच जळून जाऊ शकतात. प्रज्ञा–शील–करुणेचा स्पर्श देऊन बाबासाहेबांनी विद्रोहाला विधायक आणि वैश्विक आशय प्राप्त करून दिला. जातिव्यवस्थेने घडलेल्या दलितपणाच्या जाणिवांच्या वर उठून बौद्ध विचाराचा विश्वव्यूह माणसाच्या प्रतिभेला जागे करतो. भारताला, जगाला समृद्ध करतो. भारतात जन्म घेऊन जगभर पसरलेला विचार म्हणजे बौद्ध धर्म.

### बाबासाहेबांची व्हिजन

**सर्व समाजाला कवेत घेऊन प्रतिभावंत दिशेकडे नेण्याचीही बाबासाहेबांची 'व्हिजन' राज्यघटना, हिंदू कोडबिल, समान नागरी कायदा अशा सर्व गुंतागुंतीच्या विषयांमध्येसुद्धा दिसते. राज्यघटनेचा मूलभूत ढाचा - Basic Structure Doctrine - ही बाबासाहेबांची देणगी आहे. नेहरूंचं मत होतं, घटनेत बदल करण्याचे सर्व अधिकार संसदेकडे असावेत. बाबासाहेबांनी दाखवून दिले की घटना संसद निर्माण करते, संसद घटना निर्माण करू शकत नाही - म्हणजेच घटनेचे चरित्रच ज्या बदलांनी पालटून जाईल असे बदल करण्याचे अधिकार संसदेला असता कामा नयेत - ही 'बाबासाहेबांची व्हिजन' आजच्या काळात खरी ठरली आहे. नाहीतर मतांच्या राजकारणात, संसदीय बहुमताच्या गदारोळात सापडून राज्यघटनेची कधीच धूळधाण उडाली असती.**



### जग जिंकण्याची संस्कृती

इतर संस्कृतींमध्ये तलवार–तराजूच्या जोरावर जग जिंकण्याची प्रेरणा पूजली जाते. भारत धम्मचक्र प्रवर्तन' करून जग जिंकण्याची संस्कृती घडवतो. भारतावर अनेक, सतत लष्करी आक्रमणे झाली. भारताने जगावर अशी आक्रमणे केली नाहीत. पण खऱ्या अर्थाने पहिला विश्वधर्म कोणता असेल तर तो बौद्ध धर्म. तोसुद्धा सक्ती, तलवार, कत्तली, राजकारण किंवा आर्थिक गुलामी याने पसरलेला नाही, तर करुणेच्या, हृदयपरिवर्तनाच्या मार्गाने पसरला. जिथे गेला तो देश त्याने समृद्ध केला. बाबासाहेबांनी दलित–विद्रोह तर या वैश्विक प्रेरणेकडे वळवलाच, पण संपूर्ण भारताला जाती–धर्मनिरपेक्षपणे भारताच्या समृद्ध वारशाची जाणीव करून दिली. म्हणून आधुनिक भारताच्या सेक्युलर लोकशाहीत संसदेमध्ये बुद्धाची ध्यानस्थ मूर्ती चालते. बौद्ध धर्माने इतिहासातही भारत समृद्ध केला, भविष्यातही करेल. जागतिकीकरणाच्या जमान्यात सर्व शोषित आणि भारतीय जाणिवांना सृजनशीलपणे जग जिंकण्याची दिशा दाखवली बाबासाहेबांनी. आपल्या या जाता न जाणाऱ्या चिवट जातिव्यवस्थेमध्ये प्रत्येक विद्रोहच स्वत: एक जात बनून विसावतो असा आजचा अनुभव आणि उद्याचा धोका असला तरी 'बौद्ध वारसा' भारताला नव्या जगात वैश्विक कर्तृत्वाकडे नेईल.

### सर्वात मोठे योगदान

बाबासाहेबांना समान नागरी कायदा तेव्हाच हवा होता. पण तो येऊ शकेल अशी अजून परिस्थिती नाही, असे दिसल्यावर त्यांनी अत्याधुनिक, प्रगत अशा 'हिंदू कोडबिल'चा आग्रह धरला. भारतीय समाजव्यवस्था कायदेशीररीत्या जातिव्यवस्थेतून मुक्त करून आधुनिक पायावर कायदा–न्यायव्यवस्था उभी करणारे, स्त्रीला समाजात समान स्थान प्राप्त करून देणारे हिंदू कोडबिल हे माझे भारताला सर्वात मोठे योगदान आहे, असे ते म्हणाले. प्रत्यक्षात त्यांच्या हयातीत, 'हिंदू कोडबिल' संमत झाले नाही, ते राजकारणाच्या कात्रीत सापडल्यामुळे, विरोध करणाऱ्या स्वतंत्र भारताच्या प्रथम राष्ट्रपती बाबू राजेंद्रप्रसाद यांच्यामुळे. पण बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर का होईना, भारतातला बहुसंख्याक समाज आधुनिक कायद्याच्या आधारावर उभा राहिला. हे आहेच त्यांचे सर्वात मोठे योगदान.

आज मार्टिन ल्यूथर किंगचा वारसा सांगत ओबामा ब्लॅकपणाच्या वर उठून जगातल्या सर्वात शक्तिमान राष्ट्राचे अध्यक्ष बनतात. बाबासाहेबांमध्ये असे सर्व मार्टिन ल्युथर किंग, मंडेला, बिशप टुटु सामावलेले आहेत. राज्यकर्ती जमात व्हा असे म्हणताना त्यांनाही असा 'भारतीय ओबामा' अभिप्रेत असेल.

**(लेखक हे माजी सनदी अधिकारी असून चाणक्य मंडळाचे संस्थापक आहेत.)**
**संपर्क : ०९८८१९६८२३४५**

# सोशिक क्रांतिकारक

वेगवेगळ्या पातळ्यांवर अविरत संघर्ष करणाऱ्या बाबासाहेबांचे जीवनकार्य अंतःकरणपूर्वक समजून घेतले जाणार नाही तोपर्यंत नव्या पिढीला बाबासाहेब समजणार नाहीत. बुद्धिमत्तेचे विलक्षण तेज तळपत असतानाही नम्रता, स्वाभिमान आणि प्रामाणिकतेचा त्रिवेणी संगम बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वात ठळकपणे दिसून येतो.

**देशहितास्तव इंग्रजांना धारेवर धरणारे बाबासाहेब, मजूरमंत्री असताना मजुरांच्या कामाचे तास कमी करणारे बाबासाहेब, प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांना आयुर्विमा सक्तीसाठी शासनाकडे आग्रह धरणारे बाबासाहेब, धर्म माणसासाठी आहे, माणूस धर्मासाठी नाही, असे ठासून सांगणारे बाबासाहेब, स्वतंत्र भारताच्या संरक्षणाची काळजी करणारे बाबासाहेब, थेट गव्हर्नरांशी पत्रव्यवहार करून वयाच्या अवघ्या २७व्या वर्षी साऊथब्युरो मताधिकार समितीपुढे साक्ष देणारे बाबासाहेब, शिक्षणासाठी मिळालेल्या मदतीची कृतज्ञता म्हणून बडोदे संस्थानात नोकरी करणारे बाबासाहेब, कायद्याच्या अगाध ज्ञानामुळे कोलंबो अमेरिकन युनिव्हर्सिटीकडून डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी मिळवणारे बाबासाहेब, माझ्या अस्पृश्य वर्गाचा मीच खरा प्रतिनिधी आहे, असे दुसऱ्या गोलमेज परिषदेत ठणकावून सांगणारे बाबासाहेब आणि इथल्या संस्कृतीला छेद जाऊ देणार नाही, असे नागपुरातील धर्मांतराच्या वेळी स्वतःहून अभिवचन देणारे बाबासाहेब असे कितीतरी पैलू डॉ. भीमराव रामजी आंबेडकर हे नाव घेताच डोळ्यापुढे तरळून जातात आणि मनात त्यांच्याविषयीचा आदर दाटून येतो.**



**श्रीपाद अपराजित**

आंदोलनांच्या चरमसीमेवरही त्यांच्यातील नम्रता ढळली नाही. संघर्षाच्या वाटेवरही त्यांनी आपल्या ऋजुतेचा परिचय दिला. निर्णय प्रक्रियेच्या महत्त्वाच्या टप्प्यांवरही त्यांच्यातील प्रामाणिकपणा तसूभरही विचलित झाला नाही, हे सत्य भारतीय इतिहासाने अनुभवले आहे. पददलितांच्या उत्थानासाठी लेखणी झिजविताना त्यांच्यातील आक्रमकता वेळोवेळी नोंदवली गेली आहे. पिचलेल्या समाजाचे सर्वोच्च नेतृत्व त्यांच्याकडे होते. दुराग्रह टाळून देशहितास्तव माघार घेण्याचा मोठेपणाही त्यांच्यात होता. इंग्रजीतील त्यांचे लिखाण सिद्धहस्त लेखकाला साजेसे होते. मराठीत लिहितानाही त्यांचे वाचनसंदर्भ थिटे पडलेले नाहीत. केवळ वाचनाचीच नव्हे तर ताठ जगण्याची उर्मी शोधण्याचा प्रयास जेथे होतो, तेथे उदाहरणांची रास उभी राहते. मेंढराच्या कळपासारखा हाकला जाणारा समाज पुढ्यात असताना जी कळकळ त्यांच्या मुखातून बाहेर यायची तेवढेच समर्थ दाखले विदेशातील ज्येष्ठश्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या समक्ष बोलतानाही प्रकर्षाने मांडले जायचे. या कणव–कारुण्यातच त्यांचे बलस्थान दडले होते. अशा शक्तिस्रोतांचा आजन्म आदर त्यांनी केला. प्रबोधन आणि संघटनेला सर्वोच्च प्राधान्य देतानाही डोळ्यापुढून माणूस हटणार नाही याची काळजी त्यांनी घेतली, त्यामुळेच त्यांच्या आयुष्याचा लढा अजरामर ठरला. खरोखरच कोण होते डॉ. बाबासाहेब आंबेडकर? हिंदुस्थानातील एका अस्पृश्याचे पोर पुढे राउंड टेबल परिषदेत बसेल आणि राष्ट्राची भवितव्यता निर्माण करणाऱ्या घटनेत प्रामुख्याने भाग घेईल हे कोणाला तरी शक्य वाटले असेल का?

...स्वतः बाबासाहेबांचेच हे वाक्य आहे. कल्पनेची भरारी लुळी पडावी, तिलाही आकलन करता येऊ नये इतकी ही घटना काव्यमय व चमत्कृतीपूर्ण आहे, असे बाबासाहेबांचेच मत आहे. ते पुढे म्हणतात, ज्याला काव्य उर्फ रोमान्स म्हणतात त्यात माझ्या आयुष्यक्रमापेक्षा अभूतपूर्व असे अधिकोत्तर तरी काय असू शकणार? इतरांना तर शक्यच नाही, पण बडोदा माहाराजांच्या औदार्याने प्रथम मी जेव्हा शिक्षणाकरिता न्यूयॉर्कला निघालो तेव्हासुद्धा पुढे असे काही घडेल, विद्यार्जन करून स्वतःचे हित साधण्याच्या उद्देशाने सुरू झालेला माझा जीवनक्रम इतक्या अल्पावधीत माझ्या मुक्या पददलित जनतेच्या आयुष्यक्रमाशी आणि सुखदुःखाशी एकजीव होण्याइतका तो सार्वत्रिक आणि महत्त्वपूर्ण बनेल याची खुद्द मला अंधूकदेखील कल्पना नव्हती... समाजाविषयीची करुणा आणि स्वतः विषयीच्या दुर्दम्य आशावादातून अद्‌भुत कार्य घडू शकते, हेच यावरून

सिद्ध होते. बाबासाहेबांनी याच तडफेतून अनन्यसाधारण कार्य करून दाखवले. बाबासाहेबांचे वर्णन वेगवेगळ्या शीर्षकांखाली केले जाऊ शकते. (१) हिंदू धर्म सोडण्याचा संकल्प जाहीर केल्यानंतरही स्वतःच्याच संकल्पपूर्तीतील अपयशाच्या आराधनेत तब्बल २१ वर्षे थांबणारा महामानव, (२) आपल्या समस्त बांधवांवर अनन्वित अत्याचार होत असतानाही अन्य समाज बदलेल, या अपेक्षांचे ओझे प्रदीर्घकाळ वाहणारा सोशिक क्रांतिकारक, (३) प्रचंड प्रतिभेचे अंगभूत सामर्थ्य लाभले असतानाही अवहेलना आणि अपमानांचे घोट पचविणारा कारुण्यसिंधू, (४) अनेक दुर्घटनांचे हलाहल भूतकाळाने दिले असतानाही नव्या भविष्यासाठी देशवासीयांच्या हाती भारतीय राज्यघटनेचा अमृतकुंभ देणारा कायदेतज्ज्ञ, (५) माणसांना उपाशी ठेवून मुंग्यांना साखर टाकणाऱ्या संस्कृतीला मोठ्या हिमतीने आणि हिकमतीने उभा काप देणारा कुशल समाजवैद्य.

### माणुसकीचा गहिवर जपण्याचे महानकार्य

जनमानसात रुजलेल्या देवत्वाच्या दाखल्यांची बखोटी धरून भिरकावतानाच माणुसकीचा गहिवर जपण्याचे महानकार्य या महामानवाने केले आहे. काहींना त्यांच्यातील युगायुगांच्या अत्याचारांविरोधात लढण्याचा कणखरपणा भावला असू शकतो. काहींना त्यांच्यातील बंडखोर सुधारकाने भुरळ घातली असू शकते. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेच्या पायावर आदर्श समाज घडवण्यासाठी आयुष्य खर्ची घालण्याच्या त्यांच्या दृढनिश्चयाने देशविदेशातील अभ्यासकांना आकृष्ट केले आहे. गुलामीविरोधात दंश करणारी त्यांची लढवय्या वृत्ती आजही आंतरराष्ट्रीय पातळीवरील अभ्यासकांसाठी उत्सुकतेचा विषय ठरली आहे.




### भारतीय अर्थशास्त्राचा दांडगा अभ्यास

**आर्थिक क्षेत्राव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांनी इंग्रजांचे ऋण मान्य केले होते. कायदा व सुव्यवस्था, पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख, विद्यापीठे, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्या आधुनिक संस्थांच्या उभारणीबद्दल त्यांनी इंग्रजांच्या पारड्यात गुण टाकले होते. मात्र दावणीला बांधलेल्या जनावरांच्या आयुष्यात स्थैर्य, संतुष्टता आणि शांतता असते. आर्थिक अधःपाताच्या बदल्यात पाशवी शांतता कशी स्वीकारणार? असा थेट प्रश्न उपस्थित करण्यास ते विसरले नव्हते. भारतीय अर्थशास्त्राचा त्यांचा किती दांडगा अभ्यास होता, हे रुपयाचा प्रश्न या प्रबंधातून समजते. विकासाच्या नावाखाली जमीन, जंगल, पाणी, पर्यावरणाचा ऱ्हास करण्याविषयीची चिंता त्यांनी त्या काळातच परखडपणे मांडली होती. भारतातील जलसंसाधने आणि विद्युत विकासाला चालना देण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती.**


पददलितांच्या उत्कर्षासाठी दहा पावले माघार घेणाऱ्या बाबासाहेबांची नम्रता एकीकडे दिसते. सहनशीलतेचा अंत बघणाऱ्या राज्यकर्त्यांविरोधातील त्यांचे फूत्कारही तेवढेच उसळून पुढे आलेले लक्षात येतात. पहिल्या गोलमेज परिषदेतील त्यांचे भाषण या दृष्टीने अत्यंत परिणामकारक आहे. काय म्हणाले होते बाबासाहेब?... ज्या लोकांची आज भारतात गुलामापेक्षाही वाईट स्थिती आहे, आणि ज्यांची लोकसंख्या फ्रान्स या देशाच्या लोकसंख्येएवढी आहे, अशा भारतातील एक पंचमांश अस्पृश्य जनतेची कैफियत मी आपल्यापुढे मांडत आहे. काय केले तुमच्या सरकारने आमच्यासाठी? ब्रिटिश राजवट येण्यापूर्वी अस्पृश्यांना पोलीस दलात प्रवेश होता. लष्करामध्ये आम्हाला नोकरी मिळायची. आता ते होते काय? मुळीच नाही. अस्पृश्यांना विहिरीवर पाणी भरण्यास मनाई होती. त्यात काही बदल झाला आहे काय? अस्पृश्यांना मंदिर प्रवेश नव्हता. आता तो सुरू झाला आहे काय? तेही नाही ...अस्पृश्य वर्गात स्थित्यंतर घडून न येण्यास ब्रिटिश राजवटीचे धोरणच कारणीभूत आहे. आमच्या जखमा त्याच आहेत. ब्रिटिश राजवट सुरू होऊन सव्वाशे वर्षे झालीत, आमची दुःखे दूर झालेली नाहीत..असले सरकार काय कामाचे?




लंडनमधील सेंट जेम्स पॅलेसमध्ये पहिली गोलमेज परिषद झाली होती. बाबासाहेबांच्या तडाखेबंद भाषणाने ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या वर्मावरच प्रहार केला. साहेबांच्या भूमीत त्यांचेच दात घशात घालण्याची ही कृती होती. या कृतीमागे सुडाग्नी नव्हता. अनेक वर्षांपासून अंतर्मनात दडलेल्या करुणेचा तो ज्वालाग्राही आविष्कार होता. काळोखात धडपडणाऱ्या बांधवांविषयी वाटणाऱ्या अपरिमित सहानुभूतीतून हे शब्द आले होते. या वाक्या-वाक्यांमधून व्यक्त होत होती फक्त कळकळ. केवळ शब्दांतून कळकळ येऊ नये, कळकळीतून शब्द यावेत असे म्हटले जाते. बाबासाहेबांच्या भाषणामागे तोच तादात्म्यभाव होता. त्यांनी ब्रिटिश भूमीत उपस्थित केलेले सर्वच सवाल तत्कालीन राज्यकर्त्यांना अंतर्मुख करणारे होते. या शब्दप्रहारांची दखल इंग्लंडचे प्रधानमंत्री रॅम्से मॅकडोनाल्ड यांनाही घ्यावी लागली. अस्पृश्यांच्या हक्कांचे संरक्षण होणे आवश्यक आहे, अशी नोंद त्यांनी आपल्या भाषणातून घेतली. बाबासाहेबांचे हे ऐतिहासिक भाषण म्हणजे पिचलेल्यांच्या व्यथांचे प्रभावी सादरीकरणच होते. भारतीय प्रतिनिधीने विदेशी भूमीवर शब्दठसा उमटवणाऱ्या महत्त्वाच्या घटनांमध्ये बाबासाहेबांच्या या भाषणाचा समावेश करावा लागेल. भारतीय समाजव्यवस्थेची काळी किनार राज्यकर्त्यांपुढे ठेवणे ही त्या काळाची गरज होती. पुढील अनेक घडामोडींची बीजे त्यात दडली होती. असे बोलणे ही बाबासाहेबांची जेवढी अपरिहार्यता होती तेवढीच असाहय्यताही होती, हे समजून घेतले पाहिजे. लाखो दुःखतप्त हृदयांची हाक बाबासाहेबांनी ब्रिटिश

## नागपूरसोबत जुने ऋणानुबंध

बाबासाहेब आणि नागपूर हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. अनेक वर्षांच्या विचारानंतर त्यांनी नागपूरचे नाव दीक्षा समारंभासाठी निश्चित केले. नागपूर परिसराशी बाबासाहेबांचे अनुबंध आधीपासून जुळले होते, हे इतिहासातील संदर्भांवरून प्रकर्षाने लक्षात येते. अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी नसल्याचा आक्षेप बाबासाहेबांवर दुसऱ्या गोलमेज परिषदेच्या वेळी घेण्यात आला होता, मात्र ज्या गावांची व शहरांची ओळखही नाही तेथून माझ्यासाठी लोकांनी तारा पाठवल्या आहेत, हे बाबासाहेबांनी लक्षात आणून दिले होते. त्यावेळी बाबासाहेब हेच अस्पृश्यांचे खरे प्रतिनिधी आहेत हे सांगणाऱ्या ५६ तारा नागपूर-विदर्भातून गेल्या होत्या हे विशेष. बाबू हरदास, एल एन, दौलतराव बारसे, रेवाराम कवाडे, गौरीशंकर गजभिये, तुलाराम साखरे आदी कार्यकर्त्यांनी ब्रिटिश प्रधानमंत्र्यांना या तारा केल्या होत्या. कामठीतील दुसऱ्या अखिल भारतीय दलित काँग्रेस परिषदेत बाबू हरदास यांनी बाबासाहेबांच्या समक्ष जयभीमचा नारा दिला होता. दलितांनो, तुमच्या श्वासातून निघालेल्या गरम हवेतून इंग्लंडसारख्या थंड हवेच्या देशात मला ऊर्जा मिळाली अशी कृतज्ञता बाबासाहेबांनी कामठीत व्यक्त केली होती. दीक्षादिनाचे ऐतिहासिक संदर्भ तर सर्वत्र उपलब्ध आहेतच. धम्मदीक्षेच्या दुसऱ्याच दिवशी नागपूर महापालिकेने बाबासाहेबांचा नागरी सत्कार केला होता. हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने स्त्रीहक्काचे समर्थन केल्याबद्दल सर्व भारतीय महिला आपल्या ऋणी राहतील, असा विशेष उल्लेख नागपूर महापालिकेने बाबासाहेबांना दिलेल्या मानपत्रात केला होता. निळा झेंडा व निळी टोपीच नव्हे तर दलितांचे हृदयसम्राट म्हणून बाबासाहेब ही पदवीदेखील नागपूर शहरानेच त्यांना दिली होती. डॉ. कृष्णकांत डोंगरे यांनी अशी अनेक तथ्ये प्रथमच उजेडात आणली आहेत. बाबासाहेबांच्या आयुष्यातील तसेच दलितांच्या परिवर्तनाच्या लढ्यातील नागपूरचे अभूतपूर्व योगदान त्यामुळे लक्षात येते.



राज्यकर्त्यांपुढे मांडली होती. या भाषणामागील त्वेष भारतीय समाजापर्यंत नव्याने पोहचविला पाहिजे. अस्पृश्यांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य बजावता आले नाही तर ब्रिटिश राज्यकर्त्यांना अस्पृश्यांचे शाप व तळतळाट भोवल्याशिवाय राहणार नाही, असा सज्जड दम बाबासाहेबांनी इंग्रजी भूमीत दिला होता. इंग्रजांच्या निलाजऱ्या वर्तणुकीबद्दलचा संताप व्यक्त करीत असतानाच चुकांचे परिमार्जन करण्याची संधीही त्यांनी ब्रिटिशांना दिली होती. बाबासाहेबांच्या विद्वत्तापूर्ण भाषणामुळे आनंदी झालेल्या बडोद्याच्या सयाजी महाराजांनी एक चहापार्टी दिली होती. बाबासाहेब बोटीने भारतात परतले तेव्हा बेलार्ड पीअरवर समता सैनिक दलाच्या हजारो जवानांनी त्यांचे स्वागत केले होते. भारतीय समाजमनावर बाबासाहेबांचे गारुड कसे होते, याची कल्पना यासारख्या घटनांवरून येते. बाबासाहेबांच्या टीकास्त्रातून भलेभले सुटले नव्हते. इंग्रज सरकारविरोधात तर त्यांनी वेळोवेळी ताठर भूमिका घेतली होती. भारताने इंग्लंडला अमाप दिले आहे, मात्र इंग्लंडकडून भारताला काहीही मिळाले नाही, असे ते म्हणत.

भारतीय समाजकारणात आणि राजकारणात अस्पृश्यांना सापत्न वागणूक दिली जाते, ही बाबासाहेबांची खंत होती. अस्पृश्यांची वास्तविकता नजरेआड करून भारतीय राजकारणाकडे बघता येणार नाही, हे मत त्यांनी मिळेल त्या व्यासपीठावरून व्यक्त केले होते. ज्या विदेशी माणसाला भारतीय समस्यांच्या सोडवणुकीत भाग घ्यायचा आहे, त्याला प्रथम राजकारणाची तत्त्वे व त्यात अस्तित्वात असलेल्या मूलभूत गोष्टींची जाणीव करून घेणे आवश्यक आहे, असे ते म्हणायचे. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या मतलबी संस्कृतीवर बाबासाहेब कडाडून टीका करीत.

हिंदूधर्मातील वर्णवाद, जातीयवाद, रूढिवाद, भाग्यवाद, अंधश्रद्धांवर त्यांचा आक्षेप होता. त्यांचे हे आरोप भारतीय समाजाच्या परिवर्तनाची प्रदीर्घ प्रतीक्षा केल्यानंतर आले होते, हे तथ्य सर्वांनी लक्षात घ्यायला हवे.

### संयमाचा महामेरू

बाबासाहेबांचा संयम अनेक घटनांमधून प्रदर्शित झाला आहे. महाड आंदोलनानंतर अस्पृश्य मंडळी विरेश्वर मंदिरातही जातील या भीतीने काही गुंडांनी बाबासाहेबांना गराडा घातला होता. यामुळे खवळलेल्या दलितांनी सवर्णांवर हल्ला चढवण्यासाठी बाबासाहेबांची परवानगी मागितली होती, मात्र त्यांनी अशा प्रकारे हिंसात्मक बदला घेण्यास कठोर विरोध केला होता. रायगड किल्ला बघत असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. नाशिक सत्याग्रहानंतर झालेल्या दंग्यातून ते भाऊसाहेब गायकवाडांमुळे बचावले होते. टोकाला पोहचलेल्या मतभेदानंतरही त्यांनी हिंसेचे मुळीच समर्थन केले नाही.

काळाराम मंदिरापासून महाड सत्याग्रहापर्यंतच्या अनेक घटनांचे संदर्भ तपासले तर बाबासाहेबांच्या आंदोलनांमधील सहृदयता लक्षात येते. भारतीय समाज बदलणार नाही याची प्रचिती आली असतानाही त्यांचा मतपरिवर्तनाचा लढा सुरूच होता. ज्या समाजाने त्यांची कुचेष्टा केली त्यांच्याच भल्यासाठी हा महामानव स्वतःच्या अंगावर ओरखडे काढून घेत

राहिला. अखेर सर्व उपाय थकल्यामुळे नागपुरात त्यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला. माणसाचे माणसाशी असलेले जगातले नाते हा बुद्धाच्या धम्माचा केंद्रबिंदू आहे आणि धम्माचे ते पहिले अधिष्ठानही आहे, या बुद्धवाणीचा स्वीकार त्यांनी केला.

अन्य समाजाला दिलेल्या एकवीस वर्षांच्या सुधारणासंधीनंतरचा हा अंगीकार होता. नागपुरातील दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांच्या साक्षीने जे धर्मपरिवर्तनाचे व्यासपीठ उभे झाले होते, त्यामागे युगायुगाच्या हालअपेष्टा मोडून काढण्याची प्रेरणा होती. अनेक अत्याचार सोसल्यानंतरही देशहिताला धक्का बसणार नाही याची काळजी बाबासाहेबांनी शेवटपर्यंत घेतली. एवढी प्रचंड सहनशीलता जगाच्या पाठीवर कुठे पाहायला मिळेल? छत्री नसल्याने बालपणी शाळेत भिजत जावे लागणाऱ्या भिमाने पुढच्या काळात नागपुरातील दीक्षाभूमीवर यच्चयावत दलितांना मायेचे छत्र देण्याची किमया करून दाखविली. १४ ऑक्टोबर १९५६ च्या ऐतिहासिक



**नागपूर येथील ऐतिहासिक बौद्धधम्म दीक्षा सोहळ्यानंतर घेतलेल्या छायाचित्रात बुद्धमूर्तीसह डॉ. आंबेडकर आणि माईसाहेब आंबेडकर.**

दीक्षादिनाने एका सामान्य वंचिताचा दिशादर्शकापर्यंत झालेला प्रवास जगापुढे ठेवला. बाबासाहेबांच्या या स्वाभिमानी आयुष्याचे मानसशास्त्रीय विश्लेषण नव्या पिढीला करून देण्याची खरी गरज आहे.

अगदी प्रारंभापासून बाबासाहेबांच्या आयुष्यातील काही छोट्यामोठ्या घटनांचे अवलोकन केले तर त्यांच्यातील जहाल स्वाभिमान आणि टोकाची कृतज्ञता एकाचवेळी जाणवते. पुत्रवत प्रेम करणाऱ्या आंबेडकर गुरुजींनाही दुपारच्या सुटीत भीमाच्या हातावर भाकरी टाकताना स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी वाटत होती, असे अनेक चरित्रकारांनी लिहून ठेवले आहे. त्याच आंबेडकर गुरुजींनी पाठवलेले पत्र आयुष्याचा ठेवा म्हणून भिमाने जपून ठेवले होते. पुढील आयुष्यात मुंबईत याच गुरुजींची भेट झाली तेव्हा डॉ. आंबेडकरांनी त्यांच्यापुढे साक्षात दंडवत घातला होता. नवा पोशाख शिवून त्यांचा गौरवही केला होता. स्वतःकडे सर्वोच्च नेतृत्व आल्यावरही समाज, देश आणि आप्तांविषयीची कृतज्ञता बाबासाहेबांनी अशा पद्धतीने जपली होती.

भारतीय चलनपद्धतीविषयी बाबासाहेबांनी रॉयल कमिशनला जे निवेदन दिले होते, त्यावरील त्यांची साक्ष अतिशय मुद्देसूद होती. या वेळी सर एडवर्ड लॉ यांच्या हेकेखोर प्रश्नांमुळे ते उद्विग्न झाले होते. त्या वेळी सर पुरुषोत्तम ठाकूरदास यांना त्यांनी निखळ दाद दिली होती. मला अपेक्षित असलेला मुद्दा तुम्ही माझ्यापेक्षा सरस पद्धतीने मांडला.. हे बाबासाहेबांचे शब्द होते. देशीविदेशी तज्ज्ञांच्यासमोर बोलतानाही त्यांच्या नसानसांत विनय कसा दडला होता, हे या प्रसंगावरून कळते. स्वतंत्र भारतातील बहुसंख्य समाजाला बाबासाहेबांच्या अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख व्हायला हवी.

भारताचे तत्कालीन राजकारण, बाबासाहेबांना झालेला त्रास, त्यांना झालेला विरोध, त्यांची कोंडी करण्यासाठी झालेले प्रयत्न, त्यांचा निकराचा संघर्ष, त्यांच्याविषयी चरित्रकारांच्या नोंदी, आंतरराष्ट्रीय राजकारणाने त्यांच्या लढ्याची घेतलेली दखल, घटनाकार म्हणून देशाला त्यांनी दिलेले योगदान, संसदपटू म्हणून त्यांची कामगिरी, उत्कृष्ट पत्रकार म्हणून त्यांनी केलेले अविस्मिरणीय कार्य, एक निष्णात जलतज्ज्ञ म्हणून त्यांची ओळख, रिडल्समधील त्यांचे घणाघाती आघात, धर्मनिश्चितीपूर्वीचे त्यांचे अथक अध्ययन, धम्मपरिवर्तनानंतर त्यांना अपेक्षित असलेल्या सुधारणा अशा विविध अंगाने बाबासाहेबांचे स्वतंत्र मूल्यांकन आवश्यक आहे. या सर्व घटनांचा आढावा घेतला तर भारतावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनंत उपकार आहेत हे वास्तव लख्खपणे पुढे येते.

एक सोशिक क्रांतिकारक आणि आक्रमक समाजसुधारक म्हणून बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा नव्या पिढीकडून सखोल, सकारात्मक अभ्यास होणे अभिप्रेत आहे. एक समाज त्यांना चौकटीत बांधू बघतोय. दुसरा त्यांच्याविषयीचे गैरसमज सोडायला तयार नाही. या महामानवाच्या सव्वाशेव्या जयंती वर्षात दोन पावले सर्वांनीच पुढे यावे. मानवतेवर श्रद्धा असणाऱ्या साऱ्यांनी एका सोशिक क्रांतिकारकासाठी एवढे करायलाच हवे.

**(लेखक हे महाराष्ट्र टाइम्स नागपूर आवृत्तीचे निवासी संपादक आहेत.)**
**संपर्क : ०९९२२२०८८२२**

# परिवर्तनाचा अग्रदूत

**स्त्रियांना शिक्षित करणे, त्यांना जागृत करणे व माणुसकीचे जीवन प्रदान करणे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय होते. ज्या हक्कापासून स्त्री वंचित होती ते सर्व अधिकार स्त्रियांना मिळावे ह्या ध्येयाने त्यांनी अथक प्रयत्न केले. स्त्रियांना मूलभूत हक्क प्रदान करून त्यांच्या उन्नतीचे सर्व मार्ग त्यांनी मोकळे केले. डॉ. आंबेडकरांनी केवळ अस्पृश्य स्त्रियांमध्ये बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला असे नाही तर भारतातील समस्त स्त्रियांमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांनी शेकडो वर्षांपासून होणारी स्त्रीची विटंबना थांबवून त्यांच्यात स्वाभिमान, स्वविश्वास जागृत केला. समाजात ताठ मानेने जगण्याचे सामर्थ्य बहाल केले. माणुसकीला पारख्या झालेल्या स्त्री वर्गाला माणूस म्हणून जगण्याची संधी मिळवून दिली. प्राचीन काळापासून ज्या स्त्री वर्गाच्या उत्थानाचा साधा विचारही कुणाला शिवला नाही ते कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.**



**प्रा.डॉ. सरोज डांगे**

स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांना वाचा फोडणारे डॉ. आंबेडकर हे पहिले सुधारक होते. १९३८ साली स्वतंत्र मजूरपक्षातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतीने पी. जे. रोहम यांनी मुंबई प्रांतविधिमंडळात संतती नियमनाबाबतचे जे अशासकीय विधेयक मांडले, त्या विधेयकातून आर्थिक विकासाला अवरुद्ध करणारी लोकसंख्या वाढ ही कशी आटोक्यात आणता येईल ह्यावर विचार करून त्यांनी संतती नियमनाबाबतचा महत्त्वाचा मुद्दा मांडला. संतती नियमनाबाबतच्या विधेयकात दुहेरी सूत्र होते. एक राष्ट्राच्या आर्थिक विकासातील अडथळा दूर करणे. तसेच स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेणे. कुटुंब नियोजन स्त्रियांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी या विधेयकाच्या अनुषंगाने पटवून दिले. अनेक मुलांना जन्म दिल्यामुळे स्त्रिया मृत्युमुखी पडतात. मूल नको असल्यास कृत्रिम गर्भपात करताना स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते आणि भरमसाठ मुलांचे संगोपन व्यवस्थित करता येत नाही. हा दृष्टिकोन पुढे ठेवून ते म्हणाले की,''कोणत्याही कारणासाठी का होईना ज्या वेळी एखाद्या स्त्रीची मूल होऊ देण्याची इच्छा नसेल त्या वेळी तिला गर्भधारणा टाळता येण्याची मुभा असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणे हे सर्वस्वी तिच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. त्याचबरोबर संतती नियमनाची साधने ही तिच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित असली पाहिजे.'' स्त्रियांच्या प्रती डॉ. आंबेडकरांची तळमळ, कारुण्य व ममत्व त्यांच्या या कृतीतून स्पष्ट होते.

### स्त्री कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक

डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना त्यांच्या कौटुंबिक किंवा व्यक्तिगत जीवनात सर्वांगाने स्वतंत्र केले. पण समाजपातळीवरील तिच्या प्रश्नांची सोडवणूक तितक्याच गांभीर्याने केली. स्त्री म्हणून कामाच्या ठिकाणी होणारे तिचे शोषण, तिला मिळणारी दुय्यम वागणूक त्यांच्या नजरेतून सुटली नाही. त्यांनी सार्वजनिक क्षेत्रातही त्यांना न्याय मिळवून दिला. खाणीतील स्त्री कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. त्याचबरोबर स्त्री–पुरुषांना समान मजुरी हे महान तत्त्व प्रथमच स्वीकारण्यात आले. ते फक्त आंबेडकरांमुळे शक्य झाले. त्याचबरोबर प्रसूतीपूर्व काळात स्त्रियांना ठराविक विश्रांती व सोयी मिळाल्या पाहिजे. ही गोष्ट राष्ट्राच्या हिताची मानली पाहिजे, असे स्पष्ट करून स्त्रियांच्या विश्रांतीच्या हक्काचा अधिकार प्रथमच डॉ. आंबेडकरांनी राष्ट्रीय पातळीवर मांडून त्यांना न्याय मिळवून दिला.

### स्त्री शोषणाचे मूळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री दास्य व तिच्या अवनतीचे मूळ शोधून काढले. स्त्री दास्याचे मूळ त्यांना भारतीय रूढी परंपरेत सापडले. जातीची जडणघडण आणि स्त्री शोषण हे एकमेकांना कसे पूरक आहेत, ह्याची सैद्धान्तिक मांडणी त्यांनी केली.

डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातींचा अभ्यास करताना जातीच्या निर्मितीत स्त्री जातीचा कसा बळी घेण्यात आला, सतीप्रथा, विधवा पुर्नविवाहावर बंदी घालून तिच्यावर वैधव्याची सक्ती करणे, बालविवाहसारख्या रूढींच्या माध्यमातून अल्पवयीन मुलींचा होणारा छळ यासारख्या रूढींच्या माध्यमातून अल्पवयीन मुलींचा होणारा छळ या सगळ्या धार्मिक रूढी–परंपरांचा त्यांनी भंडाफोड केला आणि स्त्री अत्याचाराला वाचा फोडली. डॉ. आंबेडकरांनी स्त्री शोषणाचे मूळ हे जाती व धर्मव्यवस्थेमध्ये असल्याचे सिद्ध केले. माणूस म्हणून जगण्याचा तिचा हक्क रूढी परंपरेच्या

नावावर कसा हिरावून घेण्यात आला हे विशद केले. रूढी परंपरेला जन्माला घालणाऱ्या, स्त्री म्हणून अस्तित्व नाकारणाऱ्या मनुस्मृतीचे दहन करून डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीची चळवळ उभी केली. जातिव्यवस्था ही स्त्रियांच्या बलिदानाचे फलित आहे व जातिव्यवस्था हीच स्त्रियांच्या शोषणाचे मूळ आहे हे उदाहरणासह डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

## संघर्षाचा प्रारंभ

अस्पृश्यांच्या हक्कासंबंधीची व स्त्रियांची सार्वजनिक क्षेत्रातील सुरुवात ही महाडच्या संघर्षाच्या रूपात सुरू झाली. या चळवळीच्या अनुषंगाने १९२७ साली बहिष्कृत परिषद भरवण्यात आली. या सभेला मोठ्या संख्येने अस्पृश्य महिला उपस्थित होत्या. या अस्पृश्य महिलांना रूढी-परंपरेच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी व त्यांच्या मनावर चढलेल्या जुन्या, खुळचट व अनिष्ट विचारांचा गंज काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी परिणामकारक असे भाषण दिले. ते या सभेतील महिलांना उद्देशून म्हणतात की,''तुम्ही आम्हा पुरुषांना जन्म दिला. इतर लोक आम्हाला जनावरापेक्षाही हीन वागणूक देतात.

आमच्या सावलीचासुद्धा त्यांना विटाळ होतो. इतर लोकांना मानसन्मनाच्या जागा मिळतात. पण तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलीस खात्यातील शिपायाचीही नोकरी मिळत नाही. इतका आमचा हीन दर्जा आहे. स्पृश्य बायकांच्या पोटी जन्मलेल्या मुलात व तुमच्या पोटी जन्मलेल्या मुलात काय अंतर आहे? स्पृश्य बायकात जेवढे शील आहे तेवढेच तुमच्यातही आहे, असे असतानासुद्धा स्पृश्य स्त्रियांच्या पोटी जन्मलेले बालक सर्वमान्य व्हावे व तुमच्यापोटी जन्मलेले बालक सर्व ठिकाणी अवमानिले जावे? त्याला साधा माणुसकीचा हक्क मिळू नये याचा विचार तुम्ही केला आहे काय? तुमच्या पोटी जन्म घेतला एवढेच पाप आमच्या हातून घडले आहे, त्यामुळे आम्हांस ही अस्पृश्यतेची शिक्षा भोगावी लागते आहे. तुमच्या पोटी जन्म घेणे हे पाप का ठरावे याचा विचार केला तर तुम्हाला प्रजा-उत्पत्ती बंद करावी लागेल किंवा तुमच्यामुळे लागत असलेले कलंक तरी तुम्हास धुऊन टाकावे लागेल.''

## समाजोन्नतीचा निश्चय

तुम्ही प्रतिज्ञा करा की, अशा कलंकित स्थितीत आम्ही पुढे जाणार नाही. समाजोन्नतीचा जसा पुरुषांनी निश्चय केला तसाच तुम्हीही करा. तुम्ही सर्व जुन्या गलिच्छ चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत. ज्या गोष्टींमुळे लोक आपल्याला अस्पृश्य असे ओळखतात, त्या साऱ्या गोष्टी तुम्ही बंद केल्या पाहिजेत. लुगडे नेसण्याची पद्धत, त्याचप्रमाणे गळ्यात भाराभर गळसऱ्या व हातात कोपरभर कथलाचे किंवा चांदीचे गोण-पाटल्या हीदेखील ओळखण्याची खूण आहे. आम्ही ते सोडून दिले पाहिजे. स्वच्छतेने वागण्याची खबरदारी घ्या. घरात कोणतीही अमंगळ गोष्ट होऊ न देणे याबद्दल तुम्ही काळजी घेतली पाहिजे. मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद केले पाहिजे. इतरांनीही ते खाऊ नये याची जबाबदारी तुम्ही तुमच्या अंगावर घेतली पाहिजे.

## जागृती व परिवर्तन

डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीसाठी प्रत्येक सभेत अत्यंत प्रभावी व हृदयाला भिडणारी मर्मस्पर्शी भाषणे केली. त्यांच्या या भाषणातून त्यांची स्त्री उद्धाराची तळमळ स्पष्ट होते. एखाद्या पित्याने आपल्या मुलीची काळजी व तिचे भविष्य उज्ज्वल कसे होईल, याचा ध्यास घ्यावा, तसा ध्यास बाबासाहेबांना दलित स्त्रियांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी लागला होता. त्यासाठी त्यांची जिद्द होती. हजारो वर्षांपासून त्यांच्या समाजातील स्त्रियांची विटंबना होत होती. ती थांबावी व त्यांनीही इतर स्त्री वर्गाप्रमाणे मान-सन्मानाने व प्रतिष्ठेने वागावे अशी त्यांची इच्छा होती.

**(लेखिका या डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे प्राध्यापिका आहेत.)**
**संपर्क : ०९४२३९७४२४०**

**अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद, नागपूर (१९४२)**



***१८, १९ व २० जुलै १९४२ रोजी नागपूरला अखिल भारतीय दलित महिला परिषदेचे तिसरे अधिवेशन भरविण्यात आले होते. या अधिवेशनाला २० ते २५ हजार स्त्रिया हजर होत्या. ''एखाद्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून त्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करता येते.'' हे मूलगामी विचार त्यांनी मांडले. महिलांनी कसे राहावे, कसे वागावे व काय करावे, काय करू नये याचे मार्गदर्शन डॉ. आंबेडकरांनी केले. महिलांच्या राहणीमानावर त्यांनी उपदेश दिला. स्वच्छ राहावे. सर्व दुर्गुणांपासून दूर राहावे. मुलांना शिकवून महत्त्वाकांक्षी बनवावे. मुलांच्या लग्नाची घाई करू नये. त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याइतपत लायक करा. पतीची सहचारी बना. माझा हा सल्ला ध्यानात ठेवून वागाल तर तुम्ही स्वतःचीही उन्नती कराल आणि अस्पृश्य समाजालाही प्रगतीच्या मार्गावर न्याल.''***

# कष्टकऱ्यांचा महानायक



भारतीय समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अतिशय महत्त्वाचे योगदान आहे. तथापि दलितोद्धाराचे त्यांचे कार्य आणि भारताच्या संविधान निर्मितीत त्यांनी बजावलेली अतुलनीय कामगिरी याचीच चर्चा मोठ्या प्रमाणात होते. ही दोन्ही कार्ये अतिशय मोलाची आहेत. परंतु गोरगरीब कष्टकऱ्यांशी निगडित कामगार चळवळीतील त्यांचे योगदान आणि त्याद्वारे भारताच्या आर्थिक प्रगतीला चालना देण्यासाठी केलेले कार्य हेसुद्धा फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या कामगारविषयक कार्याची दोन कालखंडात विभागणी करावी लागते. सार्वजनिक जीवनाच्या सुरुवातीचे कामगार कल्याणविषयक त्यांचे चिंतन व कार्याचा पहिल्या, तर महाराज्यपालाच्या (Governor General) कार्यकारी परिषदेवर मजूर मंत्री म्हणून कामगारविषयक धोरणाला दिलेले मूर्तरूप याचा दुसऱ्या कालखंडात समावेश होतो.

भि. म. कौसल

कामगारांच्या कल्याणाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतिशय कळकळ होती. मध्यवर्ती सरकारच्या श्रम विभागाचे मंत्री या नात्याने कामगार कल्याणविषयक धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना होते. या पार्श्वभूमीवर ७ ऑगस्ट १९४२ रोजी नवी दिल्ली येथे शासन, मालक आणि कामगारांच्या प्रतिनिधींची त्रिपक्षीय परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत कामगार संघटना (Trade Union), अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि सन्मानाने काम करण्याचा अधिकार असे सर्वसमावेशक धोरण असावे. कामगारांची दुखणी मांडण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असावा, मात्र संपाचा अतिरेक नको इत्यादी विषयांवर प्रामुख्याने चर्चा झाली. उद्योगाच्या आणि श्रमिकांच्या कल्याणविषयक समस्यांचे कायदेशीर आणि प्रशासकीय दृष्टिकोनातून विश्लेषण आणि समाधान करण्यासाठी, स्थायी आणि प्रातिनिधिक यंत्रणा निर्माण करण्याच्या हेतूने; श्रमसंमेलन आमसभा (Plenary Labour Conference) आणि स्थायी श्रम समिती (Standing Labour Committee) स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

## कामगारांना सामाजिक सुरक्षा

कामगारांच्या विविध प्रश्नांवर व्यापक चर्चा करण्यासाठी ६ सप्टेंबर १९४३ रोजी नवी दिल्ली येथे श्रम संमेलनाच्या आमसभेची बैठक आयोजित करण्यात आली. आमसभेच्या पहिल्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूर मंत्री म्हणून मार्गदर्शन करताना म्हणाले, 'श्रमिकांकरिता उचित श्रममूल्य आणि योग्य सेवाशर्ती निर्धारित करण्याचे कर्तव्य आणि उत्तरदायित्व सरकारने स्वत: स्वीकारले आहे.'

## कामगार संघटनांना मान्यता बंधनकारक

कामगार संघटनांना बळकटी देऊन कामगारांना आपली दुखणी प्रभावीपणे मांडता यावी या हेतूने १९२६ च्या भारतीय कामगार संघटना कायद्यात (Trade Union Act, १९२६) सुधारणा सुचवणारे विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १३ नोव्हेंबर १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात मांडले. १) मालकाने कामगार संघटनेला मान्यता देणे बंधनकारक करणे २) कामगार संघटनेला मान्यता मिळण्यासाठी संघटनेने विशिष्ट अटी व शर्तींची पूर्तता करणे आणि ३) ज्या संघटनेने मान्यतेबाबतच्या अटी व शर्तींची पूर्तता केली आहे त्या संघटनेला मालकाने मान्यता न दिल्यास तो दंडनीय आपराध ठरविणे ह्या महत्त्वाच्या तरतुदींचा या सुधारणा विधेयकात समावेश होता.

## स्त्री पुरुषांना समान मजुरी

पूर्वी कोळसा खाणीत काम करायला स्त्री कामगारांना बंदी होती. परंतु दुसऱ्या महायुद्धामुळे उत्पन्न परिस्थिती आणि कोळसा उत्पादनात होत चाललेली घट विचारात घेता कोळसा उत्पादनात वाढ व्हावी या हेतूने स्त्री

कामगारांना खाणीत काम करण्यावरील प्रतिबंध काढून टाकण्यासाठी दिनांक ८ फेब्रुवारी १९४४ रोजी केंद्रीय विधिमंडळात उपस्थित झालेल्या तहकुबी सूचनेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उत्तर दिले.

ते म्हणाले, 'स्त्री कामगारांना खाणीत काम करण्यास केलेली मनाई उठवणे म्हणजे काही दृष्कृत्य नव्हे, उलट हे कृत्य अत्यंत समर्थनीय आहे. पुरुष कामगारांना मजुरीचा जो दर दिला जातो तोच दर स्त्री कामगारांना दिला जाईल. स्त्री पुरुषांना समान मजुरी हे महान तत्त्व पहिल्यांदाच स्वीकारण्यात आले आहे.' महिलांना प्रसूती काळात रजा उपभोगतांना पूर्ण पगार मिळावा यासंबंधीचे विधेयक डॉ. आंबेडकरांनी २९ जुलै १९४३ रोजी केंद्रीय विधिमंडळात सादर केले.

### कामगारांना पगारी सुटी

कामगारांची प्रकृती चांगली राहावी व त्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून कायद्याने दिलेल्या सुट्या कामगारांना मंजूर करण्यात येतात. तथापि सुटीची भरपाई करण्याची तरतूद त्यावेळी कायद्यात नव्हती. एखाद्या कामगाराने सुटीच्या दिवशी काम केल्यास त्याची भरपाई करण्याची तरतूद करण्यासाठी १ नोव्हेंबर १९४४ रोजी फॅक्टरीज ॲक्ट (दुसरी सुधारणा) विधेयकावर केंद्रीय विधिमंडळात झालेल्या चर्चेला मजूर मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेबांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिले.

या विधेयकातील दुसरी तरतूद पगारी रजेबद्दल होती. याशिवाय बारमाही चालणाऱ्या कारखान्यासाठी आठवड्यात कामांच्या तासांची कमाल मर्यादा ४८ आणि हंगामी कारखान्यासाठी ५४ तासांची मर्यादा निश्चित करणे आवश्यक होते. त्या वेळच्या फॅक्टरीज कायद्यात 'ओव्हर टाइमच्या' वेतनाबाबत सर्वत्र सारखा नियम नव्हता म्हणून कोणत्याही प्रकारचा कारखाना असो 'ओव्हर टाइमच्या' वेतनाबाबत सर्वत्र सारखा नियम असावा यासाठी वेतनाचा दर दीडपट असावा या दोन प्रमुख सुधारणा सुचवणारा फॅक्टरीज ॲक्ट १९३४ (सुधारणा) विधेयक २१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केंद्रीय विधिमंडळात सादर केला.

ट्रेड युनियन ॲक्टमुळे कामगरांना संप करण्याचा अधिकार मिळाला. कामगारांना आपल्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी संपाचे हत्यार उपसणे हा मूलभूत अधिकार असला तरी या अधिकाराचा अनाठायी वापर करण्याचा प्रयत्न झाल्यास कामगारांचे नुकसान होईल ही बाब त्यांनी आवर्जून सांगितली. दुसऱ्या महायुद्धाच्या धामधूमीत इंग्लंडच्या बादशाहाने ९ जुलै १९४२ च्या आदेशान्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची महाराज्यपालाच्या कार्यकारी परिषदेवरील नेमणुकीस मंजुरी दिल्याची गव्हर्नर जनरल यांनी घोषणा केली. त्यानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २७ जुलै १९४२ रोजी पदभार स्वीकारला. त्यांच्याकडे श्रम, सिंचन, वीज, सार्वजनिक बांधकाम आणि खाणकाम ही खाती सोपविण्यात आली. कामगार मंत्री या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगार चळवळीला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला. संविधान सभेमध्ये काम करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या हिताचे रक्षण होण्याच्या दृष्टीने श्रम हा विषय संविधानाच्या समवर्ती सूचित समाविष्ट केला.

## स्वतंत्र मजूर पक्ष

भारत सरकार कायदा १९३५ नुसार भारतात १९३७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार हे स्पष्ट होते. या कायद्यामुळे जे राजकीय हक्क प्राप्त झाले आहेत त्याचा फायदा घेऊन अस्पृश्यांमध्ये राजकीय जागृती निर्माण करावी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठरवले. त्यासाठी राजकीय पक्षाची स्थापना करण्याचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. तथापि प्रस्तावित राजकीय पक्ष जातीय आधारावर न उभारता या पक्षाला राष्ट्रीय स्वरुप देण्याच्या हेतूने शेतकरी व कामगारांच्या लढ्याशी जोडण्याचा त्यांनी निश्चय केला.

गोलमेज परिषदेसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनेकदा लंडनला जावे लागले. त्यावेळी मजूर पक्षाचे महत्त्वाचे नेते, पदाधिकारी यांच्याशी त्यांचा परिचय झाला व त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली. मजूर पक्षाचा आदर्श समोर ठेवून त्यांनी आपल्या पक्षाची घटना, कार्यक्रम, ध्येय व उद्दिष्टे ठरवली. अशाप्रकारे १५ ऑगस्ट १९३६ रोजी त्यांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' या नावाने नवीन पक्ष स्थापन केला. शेतकरी व मजूर यांची संघटना बांधून त्यांचे राहणीमान सुधारण्याचा प्रयत्न करणे, विद्यमान जमीनधारा पद्धत अनिष्ट असल्यामुळे ती बदलणे, सामाजिक सुधारणा घडवणे, ग्राम संघटना, कृषी सुधारणा, शिक्षण आदी मुद्द्यांवर या पक्षाच्या जाहीरनाम्यात भर देण्यात आला, या पक्षाची दारे सर्व समाजासाठी मोकळी ठेवण्यात आली. अशा या महामानवास १२५व्या जयंतीनिमित्त मन:पूर्वक अभिवादन!

**(लेखक हे आंबेडकरी विचारांचे अभ्यासक व माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त संचालक आहेत.) संपर्क : ०८४४६९९३५६६**

## समानता नको समभाग पाहिजे



**कामगारांना संपाचा हक्क नाकारणारे 'ट्रेड डिस्प्युट बिल' मुंबई प्रांत सरकारने विधिमंडळात सादर केले होते. या विधेयकास कडाडून विरोध करणारे अतिशय अभ्यासपूर्ण, कामगारांप्रती तळमळीने ओतप्रोत विलक्षण दूरदृष्टी असलेले डॉ. आंबेडकरांचे प्रदीर्घ भाषण झाले. विधेयकातील 'संप करणे हा कामगारांचा हक्क असू शकत नाही' या तरतुदीचा त्यांनी खरपूस समाचार घेतला. या भाषणाच्या शेवटी डॉ. आंबेडकरांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला. कोणत्याही उद्योगात मिळणारा नफा हा फक्त भांडवलावर नव्हे तर कामगारांच्या घामावर सुद्धा मिळतो असा मुद्दा उपस्थित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उद्योगात कामगारांच्या समान भागीदारीची मागणी केली.**

# मन्वंतर घडवणारी पत्रकारिता



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर थोर समाजचिंतक आणि संस्कृतीपुरुष होते. त्यांना आमूलाग्र समाजपरिवर्तन हवे होते. महाराष्ट्रातील अनेक समाजकारणी व राजकारण्याप्रमाणे वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजोन्नती होईल, यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी एक निष्ठावान संपादक आणि सव्यसाची लेखक म्हणून वृत्तपत्रसृष्टीत पाऊल ठेवले. पत्रकार म्हणून कोणी संबोधिले काय किंवा संबोधिले नाही, यात त्यांना स्वारस्य नव्हते. अस्पृश्यांबरोबरच स्पृश्यांतही विचार जागृत करून आत्मपरीक्षण करण्यासाठी वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी पराकाष्ठा केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या 'मूकनायका' ने (१९२०), 'बहिष्कृत भारता'तील (१९२७), 'जनते'ला (१९३०), 'प्रबुद्ध भारता'ची (१९५६) दीक्षा दिली. एक मन्वंतर घडले. आंदोलने आणि विचार या दोन्ही साधनांचा अत्यंत समृद्ध आणि संपन्न असा उपयोग त्यांनी केला. वृत्तपत्र हे त्यांचे समर्थ माध्यम होते. त्यांच्या वृत्तपत्रातून साकारते ती बाबासाहेबांची नैष्ठिक, ध्येयवादी आणि निर्भीड पत्रकार ही प्रतिमा.**

**डॉ. गंगाधर पानतावणे**

आधुनिक महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधनाच्या आंदोलनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय जीवनाला समृद्ध करणाऱ्या अनेक महान विभूती, एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत कार्यरत राहिल्या. स्थितीप्रवणता आणि साचलेपणाविरुद्ध नव्या जाणिवा पेरण्याचे दुष्कर कार्य त्यांनी केले. प्रस्थापित विचारव्यवस्थेविरुद्ध उभे राहून नवी प्रबोधनात्मक विचारधारा रुजवणे अवघड असते. अनेक आव्हाने स्वीकारावी लागतात. अप्रिय पण पथ्यकर क्रांतदर्शी विचार मांडावेच लागतात. सत्य निर्भयपणे आणि प्रखरपणे सांगावेच लागते. जननिंदा, उपहास यांची पर्वा न करता समाजपरिवर्तनाचा त्यांचा ध्यास चिरंतन असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे असे एक थोर समाजचिंतक आणि संस्कृतिपुरुष होते ज्यांना आमूलाग्र समाजपरिवर्तन हवे होते. त्यासाठी महाराष्ट्रातील अनेक समाजकारणी व राजकारण्याप्रमाणे वृत्तपत्राच्या माध्यमातून समाजोन्नती होईल, यावर त्यांचा विश्वास होता. 'मूकनायक'च्या पहिल्या अग्रलेखात त्यांनी म्हटले होते,

आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचवण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमी नाही.

*(मूकनायक : ३१ जानेवारी १९२०)*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशस्थितीचा विचार वेळोवेळी केला आहे. देशाच्या भूगोलापेक्षाही देशाचा इतिहास त्यांच्या चिंतनाचा विषय होता. एखादे राष्ट्र हजारो वर्षे जगते हा अधिक चिंत्य विषय आहे असे ते म्हणत. आम्ही शास्त्राप्रमाणे वागलो म्हणून जगलो असे नाही तर शत्रूंनी आम्हाला ठार मारले नाही, म्हणून आम्ही जिवंत राहिलो, ह्या सत्यावर मार्मिकपणे बोट ठेवताना डॉ. बाबासाहेबांनी पुराण इतिहासाचा व्यर्थ व कृतक गौरव करणाऱ्या प्रवृत्तीचा निषेध केला आहे. इतिहासातील घटनांना पूर्वनिश्चित भूमिकेतून न स्वीकारता घटनांचा अर्थ आणि अन्वयार्थ लावणे, प्राप्त साधनांच्या माध्यमातून वस्तुनिष्ठ चिकित्सा करणे आणि मांडणी करणे, तसेच इतिहासाची कारणमीमांसा बुद्धिप्रामाण्यवादातून करणे ही त्यांच्या विचार करण्याची आणि लेखनाची शिस्त होती. इतिहासाची कल्पनारम्यता त्यांना मान्य नव्हती. समाज व धर्म या संकल्पना त्यांनी भिन्न भिन्न मानल्या ते इतिहासाचा, समाजशास्त्राचा आणि धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास करूनच.

**स्वराज्य कोणाचे व ते कशासाठी हे कळल्याखेरीज या तत्त्वाची री आम्ही तरी ओढू शकत नाही. मग कोण ओढील तर ओढो बिचारा (स्वराज्याची सर सुराज्याला नाही : मूकनायक १४ फेब्रुवारी १९२०)**
**स्वराज्य हे मूठभरांचे, पीडकांचे, शोषकांचे सत्ताधीशांचे असेल तर ते एककेंद्री असेल. ते व्यापक असणार नाही, याची खात्री बाबासाहेबांना वाटत होती. पीडित, उपेक्षित,बहिष्कृतांसह स्वराज्य त्यांना अभिप्रेत होते. ते कधीही स्वराज्यविरोधी नव्हते.**

खावे काय, न्यावे काय, उठावे कसे, बसावे कसे, निजावे कसे असल्या गोष्टीत धर्माचे नियम आहेत. ईश्वर व मनुष्य यांच्यामधील संबंध आणि ठोकळ नीतिनियम इतक्यापुरतेच इतर धर्माप्रमाणे हिंदू धर्माने आपले




कार्यक्षेत्र मर्यादित केले नाही. हिंदू धर्माप्रमाणे दुसऱ्या कोणत्याही धर्मात इतके सामाजिक निर्बंध नाहीत.

(हिंदु धर्माला नोटीस: बहिष्कृत भारत १५ मार्च १९२९)

धर्म आणि समाज ह्यांची फारकत असल्याशिवाय कोणताही समाज व्यक्तिस्वातंत्र्याची आणि व्यक्तिविकासाची हमी देऊ शकत नाही. धर्म आणि समाज यांचे पृथकत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत आहे.

## सुधारणावादी

प्रस्थापितांमधील मूलतत्त्ववादी नेहमीच आत्मदोषावर जाणीवपूर्वक बोट न ठेवता जातिभेद, विषमता, दास्य, शोषण, आर्थिक दुरवस्था यास इंग्रजी राजवट कारण आहे, असा प्रचार करीत असत. या प्रवृत्तीचा समाचार घेतांना डॉ. बाबासाहेबांनी विशद केले की हिंदू समाजात सुधारणा होऊ शकली नाही. त्याचे कारण धर्म प्रभाव आहे. ते पुढे असे म्हणतात की, जे धर्मशास्त्रांचा, स्मृतिग्रथांचा आधार घेऊन अस्पृश्यतेसारख्या प्रश्नांचे समर्थन करतात ते धर्मशास्त्रातील त्यांना गैरसोईचे असलेले नियम पाळत नाहीत. मात्र बहिष्कृतांना शास्त्रार्थाचा बाऊ दाखवतात. ही विसंगती स्वच्छपणे दर्शवून बाबासाहेबांनी देशाच्या व धर्माच्या दृष्टीने जातीविहित समाजाची आवश्यकता प्रतिपादिली आहे. हिंदू धर्म आणि हिंदू समाजास नवे जीवन प्राप्त व्हायचे असेल तर मूर्तिभंजकाची भूमिका घेणे आवश्यक आहे असे ते म्हणत. कारण मानवी स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा ही धर्मविषयक कल्पनांशी निगडित असण्याचा त्यांचा आग्रह होता. धर्म व समाज यांच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या अभावामुळे हिंदूंचे फार मोठे नुकसान झाले आहे असे ते परखडपणे प्रतिपादित. निर्णायक मत विशद करताना ते म्हणतात, 'हिंदू समाजात धार्मिक सुधारणेखेरीज सामाजिक सुधारणा होणे शक्य नाही.' (बहिष्कृत भारत १५ मार्च १९२९)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धार्मिक व सामाजिक विचारांइतकेच राजकीय विचारांनाही महत्त्व आहे. त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला तेव्हा 'स्वराज्या' ची चळवळ प्रभावी होती. टिळकांनी कोलकत्यात २ जानेवारी १९०७ रोजी स्वराज्य हे आमचे साध्य आहे. आमच्या राज्यकारभारावरचा ताबा आम्हास हवा आहे, असे म्हटले होते. (आधुनिक भारत: शं.द. जावडेकर ,तृ.आ.पृ. ३०९) डॉ. बाबासाहेबांनी स्वराज्याचा विचार केला आहे. स्वराज्याचा विचार केवळ राजकीय स्वायत्तता प्राप्त होणे एवढ्यापुरताच मर्यादित नाही तर त्यापलीकडे जाऊन सुराज्य कसे निर्माण होईल हाही आहे. त्यांना स्वराज्याविषयी आस्था नाही, अशी कोल्हेकुई तत्कालीन काही सनातन्यांनी केली होती. त्यांना परखडपणे उत्तर देताना




बाबासाहेब म्हणाले होते, आपल्या देशाला स्वातंत्र्य असू नये, आपला देश कायमचा पारतंत्र्यात राहावा, असे इच्छिणारा एकही स्वदेशाभिमानी माणूस सापडणार नाही. स्वातंत्र्याच्या ध्येयासंबंधाने सर्वांना सहानुभूती वाटणे स्वाभाविक आहे. (नेहरू कमिटीची योजना व हिंदुस्थानचे भवितव्य : बहिष्कृत भारत १८जानेवारी १९२९)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाच्या निदर्शनास आणून दिले की, या प्रचंड देशात राजकीय प्रश्नांबरोबरच इतरही अनेक ज्वलंत प्रश्न आहेत. सामाजिक गुलामगिरी नष्ट होणे हा तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात लोकमान्य टिळकांच्या भूमिकेचे विश्लेषण करताना ते म्हणतात,

कै. टिळकांसारखी एखादी व्यक्ति बहिष्कृत वर्गात जन्माला आली असती आणि ब्रिटिश अमलाखाली झालेल्या मन्वंतराचा फायदा मिळून तशा गृहस्थाला तसेच उच्च शिक्षण मिळाले असते तर त्या गृहस्थाने 'स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध हक्क आहे' अशी गर्जना करण्याच्या भरीस न पडता अस्पृस्यता नष्टमूल करणे हे माझे कर्तव्य आहे, असेच खात्रीने म्हटले असते.

**(आमचे टीकाकार : बहिष्कृत भारत २९ जुलै १९२७)**

पुढे तर 'दि टाइम्स ऑफ इंडिया'च्या दि. २१ मार्च १९४० च्या

अंकातील लेखात म्हणतात,

It is suicidal to imagine that political independance necessarily means all sided freedom

**परखड आणि विचारप्रवर्तक**

त्या वेळच्या हिंदुस्थानातील राजकाणाच्या विविध अंगावर चर्चा करणारा 'नेहरू कमिटीची योजना व हिंदुस्थानचे भवितव्य' हा बाबासाहेबांचा लेख, बहिष्कृत भारताच्या १८ जानेवारी १९२९च्या अंकात प्रकाशित झाला आहे. हा लेख परखड तर आहेच पण विचारप्रवर्तक आहे.



पं. मोतिलाल नेहरू कमिटीने आपल्या अहवालात स्वराज्यात राज्यघटनेचे स्वरूप कसे असेल, मतदारसंघाची विभागणी कशी असेल, यावर भाष्य केले होते.त्यावर बाबासाहेबांनी टीका केली की, नेहरू अहवालात स्वयंसत्तेचे सर्वव्यापी अस्तित्व राज्यघटनेत नाही. त्यात सुधारणा हवी. राष्ट्रहिताला अग्रक्रम हवा. नेहरू कमिटीने हिंदूंसाठी असलेला व व्यापारी वर्गासाठी असलेला मतदारसंघ काढून टाकून, त्याऐवजी सर्वत्र स्थलवाचक मतदारसंघाची स्थापना करण्याचे ठरवले होते आणि मुस्लिमांच्या संदर्भात जातिवाचकसंघाची शिफारस करण्यात आली होती. बाबासाहेबांनी या नव्या शिफारशीवर कडाडून विरोध नोंदवला. हिंदूंसाठी स्थलवाचक संघ निर्माण करीत असताना, मुसलमानांसाठीही तीच पद्धती का अवलंबली नाही, असा सवाल केला. अस्पृश्य वर्गाकडे नेहरू कमिटीने पूर्णत: दुर्लक्षिल्याचा आरोप केला. नेहरू कमिटीने सुचवलेली प्रांतयोजनासुद्धा समुचित नाही कारण– सिंध, बलुचिस्थान व वायव्य सरहद्दीवरील प्रांत हे वेगळे व स्वतंत्र करण्यात आले म्हणजे हिंदुस्थानात जे एकंदर नऊ–दहा प्रांत आहेत. त्यापैकी पाच प्रांतात मुसलमानांचे प्राबल्य होईल.

(ने.क.ची. योजना व हिंदुस्थानचे भावितव्य :बहिष्कृत भारत पृ.१८ जानेवारी १९२९)

प्रांतिक व मध्यवर्ती सरकार यांच्या परस्पर संबंधाचा विचार करताना बाबासाहेबांनी मध्यवर्ती सरकारवर, प्रांतिक सरकारवर अंकुश हवा असे रोखठोकपणे सांगितले. कारण नेहरू कमिटीने, मुसलमानांच्या रेट्यामुळे अंकुश नको अशी भूमिका घेतली होती. बाबासाहेबांनी इशारा दिला की, मध्यवर्ती सरकारचा अंकुश नसेल तर प्रांतिक सरकार अनियंत्रित होतील आणि त्याचा परिणाम हिंदूंवर तर होईलच पण देशावरही होईल. बाबासाहेबांचे द्रष्टेपण येथे प्रतीत होते.

लोकशाही, संविधानात्मक नीतिमत्ता, राजकीय नीतिमत्ता, अल्पसंख्याकाचे संरक्षण, प्रभावी विरोधी पक्ष, राजकीय शिक्षण या सारख्या अनेक प्रश्नांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली भूमिका स्पष्ट, सडेतोड, प्रभावी आणि देशहिताचा विचार करूनच मांडली आहे.

**अर्थ, शेती, शिक्षण आणि वाङ्:मय या विषयांवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रीय लेखन अल्प असले तरी ते चिरंतन स्वरूपाचे आहे. राष्ट्रउभारणीत अर्थव्यवहाराला मूर्धन्यस्थान असल्याने आर्थिक स्वातंत्र्यावर त्यांनी भर दिला होता. हिंदुस्थानात संपत्तीची वाटणी विषम स्वरूपात असल्याने ती राष्ट्रीय आपत्ती आहे असे ते म्हणत. संपत्तीची समान वाटणी आणि जनकल्याण अभिन्न असावे असे त्यांचे मत होते. शेतीला उद्योग समजून आधुनिक पद्धतीने शेती करण्यावर भर देताना, शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या 'खोती शाही'सारख्या शोषणयंत्रणेवर बाबासाहेबांनी खरपूस टीका केली होती. मात्र अद्ययावत शेती सुधारणेचा संबंध त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेशी जोडला होता.**

**शैक्षणिक विचारमंथन**

शिक्षण ही स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे असे बाबासाहेब मानत.

व्यक्तिस्वातंत्र्याची कल्पना जर मान्य असेल तर दरेक व्यक्तीच्या ठायी आपले स्वातंत्र्यरक्षण करण्याची शक्ती उत्पन्न होणे अत्यंत जरूर आहे व ती शिक्षणाशिवाय उत्पन्न होऊ शकत नाही. (आप घरी बाटा, बाप घरीही बाटा :बहिष्कृत भारत १५ जुलै १९२७) अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाच्या संदर्भात तर उच्च शिक्षणाबाबतही ते आग्रही होते. आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच सर्वोत्तम औषध आहे असे ते म्हणत.

प्राथमिक शिक्षणाचा सर्वाधिक प्रसार हा राष्ट्राच्या प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे म्हणून ते सक्तीचे असावे, अशी बाबासाहेबांची धारणा होती. पारंपरिक शिक्षणापेक्षा आधुनिक शिक्षण त्यांना अपरिहार्य वाटत होते. 'शिक्षक' हा सारथी असताना प्राध्यापक, परिश्रम, संशोधन आणि चिंतन

करणारा असावा. उत्तम प्रोफेसर नुसता विद्वान असून चालत नाही तर तो सर्वश्रुत, त्याची वाणी शुद्ध असायला हवी तसेच तो विद्यार्थ्यात उत्साह निर्माण करणारा असावा हे गुण अभ्यासाने आणि अनुभवाने आत्मसात करता येतात, असे बाबासाहेबांचे प्रतिपादन आहे. सहशिक्षणाचा तर त्यांनी आग्रहच केला होता. स्त्रियांचे शिक्षण पुरुषांबरोबर एकत्र असले पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता.

### विचारप्रवर्तक आणि मार्मिक

संतसाहित्य, लोकसाहित्य, आधुनिक वाङ्‌मय पंथोपंथ यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भाष्य विचारप्रवर्तक आणि मार्मिक आहे. त्यातून त्यांची चिकित्सक दृष्टी प्रतीत होते. संतांनी चातुर्वर्ण्याला किंचितही धक्का लावला नाही. (समतेसाठीच ही विषमता :बहिष्कृत भारत १ फेब्रुवारी १९२९) मात्र संत वाङ्‌मयातील नैतिक शिकवणुकीचा भाग सामाजिक सौहार्दाला उपयुक्त आहे, असे बाबासाहेब म्हणत. पण कर्मविपाक, अंधश्रद्धा आणि वर्णाश्रमधर्माचा संतांनी केलेला पुरस्कार त्यांनी नाकारला. महाराष्ट्रातील विविध संप्रदायांच्या कार्यावर प्रकाश टाकताना दत्त संप्रदायाविषयी मत प्रतिपादन करताना ते म्हणतात.

दत्त संप्रदाय हा सोवळ्या-ओवळ्याचे व जातिभेदविषयक निर्बंध बाकी बऱ्याचशा संप्रदायापेक्षा विशेष कडकपणाने पाळतात. (दत्त दरबाराचे उदाहरण : ६ सप्टेंबर १९२९) मोक्षप्राप्तीसाठी सगुणोपासना आणि योग मार्ग यांचे आचरण आवश्यक मानणारा दत्त संप्रदाय आहे. तर महानुभव पंथात दत्तोपासना असली तरी तेथे सोवळ्या-ओवळ्याचे बंड नाही. सर्वात जुने मराठी वाङ:मय महानुभाव पंथाचे आहे असा निर्वाळाही बाबासाहेबांनी दिला.

लोकसाहित्य हा सांस्कृतिक आविष्कार आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. यामुळे हे साहित्य जतन केले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी स्वत: 'जुन्या वाङ्‌मयाचा जीर्णोद्धार' या नावाचा लेख (जनता: २ ऑगस्ट १९५२) प्रकाशित केला होता. आधुनिक वाङ्‌मयात 'नाटक' हा प्रकार त्यांना विशेष आवडत होता असे दिसते. प्रबोधनकार ठाकरे यांच्या 'खरा ब्राह्मण' या नाटकावर त्यांनी समीक्षा लिहून साधकबाधक चर्चाही जनता पाक्षिकातून केली होती.

मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासात वृत्तपत्रीय कर्तृत्वाला महत्त्वाचे स्थान आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्फुटलेखन विविध विषयांवर आहे. त्यातील अनेक लेख प्रासंगिक असले तरी ते विश्लेषक, तर्कनिष्ठ आणि चिंतनशील आहेत. काही स्फुटांचा निर्देश करता येईल. कम्युनिस्टांच्या क्रांतीला त्यांनी 'झटपट क्रांती' असे संबोधिले आहे. 'देव पुजाऱ्यांचा की भक्तांचा', 'अफगणिस्तनातील भिक्षुकशाही', 'हिंदुचे समाजशास्त्र', 'हिंदी राजकारणाचा विचका', 'क्रांतीची उपासना की, ध्येयाचे रक्षण', 'मेलियांच्या रांडा इच्छिती लेकरु', 'समाजसमतेचे विरोधक' आणि 'अस्पृश्यता व सत्याग्रहाची सिद्धी' अशा अनेकविध चपखल शीर्षकांच्या लेखनातून बाबसाहेबांचे मूलगामी चिंतन आढळते. अमोघ युक्तिवाद, उपरोधगर्भता, बुद्धिनिष्ठा, अकृत्रिमता, साधार प्रतिपादन या गुणांमुळे त्यांचे स्फुटलेखन मर्मभेदी व विचारप्रयोजक आहे. एकोणिसाव्या शतकातील टिळक, आगरकर, लोकहितवादी आणि फुले यांच्या वैचारिक लेखनाने मराठी चिंतनविश्वाला नवा आशय दिला. विसाव्या शतकात हाच आशय आणि सौष्ठव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्राप्त करून दिला.**

डॉ. बाबासाहेबांची पत्रकारिता त्या दृष्टीने विचारात घ्यावी लागते. त्यांची पत्रे ही 'प्रयोजनपत्रे' होती. ती धूमकेतुसारखी होती. ते विख्यात अर्थशास्त्रज्ञ होते, परंतु त्यांना आपल्या वृत्तपत्रांचे अर्थशास्त्र कधीच जुळवता आले नाही. वृत्तपत्र जगवण्यासाठी त्यांच्याकडे अर्थओघ नव्हता आणि अद्ययावत व पुरेशी यंत्रणाही नव्हती. मात्र आपल्या पत्रातून चोवीस चोवीस रकाने लिहिणारे बाबासाहेबांचे हात, दलितांच्या नवसृष्टीचे रचनाकार होते.

बाबासाहेबांचे मराठी वृत्तपत्रीय लेखन आत्मप्रत्ययी होते. लेखनक्रीडा हा त्यांच्या लेखणीचा धर्म नव्हता. त्यांच्या लेखनात टिळकांप्रमाणेच जोश व आवेश आहे. परंतु आक्रमकता आणि तीव्रता टिळकांपेक्षा काकणभर अधिकच. कदाचित परकीयांशी आणि स्वकीयांशी लढण्यातील फरकाचा हा भाग असावा. बाबासाहेबांची लेखणी स्वयंभू आणि स्वयंसिद्ध होती. वक्तृत्व आणि प्रवाहित्व ही त्यांची लेखनशैलीची वैशिष्ट्ये आहेत. अमोघ युक्तिवाद हा तर त्यांचा ठळक लेखन विषय होय. हा युक्तिवाद भावनेपेक्षा बुद्धीला आणि कल्पनाविलासापेक्षा तर्कशक्तीला आवाहन करतो. बाबासाहेबांनी तत्कालीन विरोधी व जातिवादी पत्रांच्या व पत्रकारांच्या वृत्तीचा व अहंकाराचा दंभस्फोट वेगवेगळ्या उदाहरणांनी योग्य त्या वेळी केला आहे. वर वर प्रतिपक्षाचे बिनतोड वाटणार मुद्दे कुशलतेने खोडून काढताना मार्मिक युक्तिवाद आणि मर्मभेदी इतिहास, यांचे दर्शन घडवले आहे.

### लोकभाषेचे माध्यम

लोकजागृतीच्या चळवळीला लोकभाषेचे माध्यम स्वीकारावे लागते. बाबासाहेबांनी इंग्रजी भाषेत विपुल ग्रंथरचना व वृत्तपत्रीय लेखन केले असले तरी, मराठी वृत्तपत्रे स्थापून व मराठी भाषेचाच जनसामान्यांना प्रबोधित करण्यासाठी अवलंब केला.

आपल्या मराठी भाषेला व लेखनाला इंग्रजी वळण लागू दिले नाही. इंग्रजीत विचार करून मग मराठीत अनुवाद करण्याची खोटी 'इंग्रजी भक्ती' त्यांनी दर्शवली नाही. मराठी मन, मराठी भाषा आणि मराठी संस्कृती जगणाऱ्या माणसाला उसनेपण आणि उपरेपणाची गरज नसते. त्यांना आपली भाषा अकारण शब्दजड वा ग्रांथिक बनविण्याची आवश्यकता वाटली नाही. स्वप्नाळू जगात किंवा भावविवशतेच्या अरण्यात स्वत:ला हरवू न देता, प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्यायमूल्यांची जाणीव सतत जागती ठेवली. त्यांची मराठी वृत्तपत्रकारिताही याचीच साक्ष देते.

**(लेखक हे ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत साहित्यिक असून विश्व मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आहेत.)**
**संपर्क : ०९४२२२०५१८७**

# सुरक्षेचा प्रहरी

डॉ. विजय खरे

**भारताच्या बर्हिगत सुरक्षा व्यवस्थापनासाठी लष्करी साधनसामग्री व मानवी बळाद्वारे बर्हिगत संघर्ष निवारण आणि त्याचे व्यवस्थापन भारत करू शकेल. परंतु भारताला सध्या भेडसावणारे अंतर्गत सुरक्षेचे प्रश्न व त्याचे व्यवस्थापन कसे करता येईल व सध्याच्या अंतर्गत सुरक्षेच्या प्रश्नाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कसे महत्त्वाचे आहेत याबाबत त्यांच्या १२५ व्या जयंती निमित्ताने विचार होणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हटले की, केवळ दलितांचे नेते किंवा भारतीय घटनेचे शिल्पकार याबाबतचा त्यांचा विचार होतो परंतु या महामानवाने भारताची अंतर्गत व बाह्यसुरक्षा याविषयी मूलभूत चिंतन केले होते.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीयांच्या सर्वांगीण विकासाला चालना दिली. गेल्या सहा दशकापासून जास्त हा देश एकसंध राहण्यासाठी त्यांनी भारतीय राज्यघटनेत ज्या महत्त्वाच्या तरतुदी केलेल्या आहेत त्या पाहणे गरजेचे आहे. आज जगाच्या पाठीवर भारत एकमेव असा देश आहे की, त्याच्या सभोवताली दोन आण्विकधारी राष्ट्रे आहेत ती म्हणजे चीन व पाकिस्तान. या दोन्ही देशांपासून भारताच्या सुरक्षेला व एकतेला कसा धोका निर्माण होऊ शकतो त्याबाबत बाबासाहेबांनी अतिशय



महत्त्वाचे विचार मांडले आहेत. शिवाय अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत आज देशात नक्षलवाद, दहशतवाद, प्रांतीय व भाषेचे प्रश्न, जातीय व्यवस्थेवर असलेली विषमता, काश्मीर व उत्तर-पूर्व राज्यातील प्रश्ने, उत्तर-पूर्व भारतातील मणीपूर, मिझोराम-नागालँड, महाराष्ट्र -कर्नाटक सीमाप्रश्न, कर्नाटक-तामिळनाडू पाणी प्रश्न, विदर्भ, तेलंगणा व इतर ठिकाणी छोटी राज्यांची मागणी असे विविध अंतर्गत प्रश्न आहेत.
त्यामुळे भारताच्या सुरक्षेला बाहेरून नाहीतर अंतर्गत मोठी आव्हाने आहेत व या आव्हानांना तोंड देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे विचार मांडले आहेत ते सध्याचे संघर्ष व त्याचे निवारण व व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

**महत्त्वाची कलमे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची एकता आणि अखंडता टिकवण्यासाठी भारतीय राज्यघटनेत ३५२, ३५६, ३६० अशी तीन कलमे समाविष्ट केली आहेत. वरील तीनही कलमे आणीबाणीविषयक असून ३५२ कलम म्हणजे परकीय राष्ट्रांपासून जेव्हा भारताच्या सार्वभौमत्वाला धोका निर्माण होतो तेव्हा राष्ट्रपतींनी त्याचा वापर करून राष्ट्रीय आणीबाणी जाहीर करायचा अधिकार दिलेला आहे. ३५६ म्हणजे एखादा समूह किंवा एखाद्या राज्यात राजकीय अस्थिरता निर्माण झाली किंवा कोणतेही राज्ये फुटीरतावादी भूमिका घेत असेल त्या वेळेस केंद्र सरकारने ३५६ कलमाचा वापर करून त्या ठिकाणी त्या राज्यात आणीबाणी जाहीर करून तो प्रांत भारतापासून वेगळा होऊ नये किंवा राजकीय अस्थिरता निर्माण होऊ नये यासाठी या कलमाचा वापर केला जातो. जेव्हा राष्ट्रीय आर्थिक संकट निर्माण होते तेव्हा ते संकट दूर करण्यासाठी राष्ट्रपती ३६० कलमाचा वापर करतात. वरील तीनही कलमापैकी ३५६ कलम हे राष्ट्रीय एकता आणि अखंडतेसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. गेल्या सहा दशकांपासून भारत एकसंध जो आपल्यास दिसतो तो केवळ ३५६ कलमामुळे. जम्मू-काश्मीर, पंजाब, उत्तर-पूर्व राज्ये जी आज भारतात आहेत त्याचे महत्वाचे कारण ३५६ कलम हे होय. या कलमांबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत अतिशय महत्त्वाची भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर या कलमांबाबत धोकाही त्यांनी सांगितला आहे.भारतासारख्या बहुजातीय, बहुधर्मीय लोकसंख्या असलेल्या देशाची जर एकता आणि अखंडता टिकवायची असेल तर केंद्र सरकार हे प्रबळ असले पाहिजे.

वेगवेगळ्या वादामुळे अंतर्गत सुरक्षा व्यवस्थापन करणे कठीण होत आहे व दहशतवाद, नक्षलवाद हे प्रश्न अधिक कठीण होत आहेत. त्यामुळे पुन्हा आपल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांकडे जाणे गरजेचे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते एक भाषा अनेक राज्ये निर्माण झाली पाहिजेत व राज्यांची लोकसंख्या ही दोन कोटी एवढी असावी अशी भूमिका त्यांनी भाषावार प्रांतरचनेबाबत मांडली. ती भूमिका मांडताना त्यांनी सांगितले की, फजल अली आयोगाने दक्षिणेकडील राज्ये छोटी केली तर उत्तरेकडील राज्ये मोठी केली. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोकशाहीचे विकेंद्रीकरण होणार नाही, कारण दक्षिणविरुद्ध

उत्तर हा वांशिक प्रश्न आहे. शिवाय यामुळे प्रत्येक राज्यात मोठ्या जातीचे लोक हे त्या–त्या राज्यात अल्पसंख्याक व दलित समूहाला सत्तेमध्ये सामावून घेतील की नाही, याबाबत त्यांच्या मनात सांशकता होती म्हणून त्यांनी लहान राज्याच्या निर्मितीसाठी पाठिंबा दिला.

### राष्ट्रीय एकात्मता

डॉ. बाबासाहेबांच्या मतानुसार जोपर्यंत भारतात जातीय व्यवस्थेमुळे असलेली सामाजिक विषमता, आर्थिक विषमता दूर होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने भारताची एकता, एकात्मता व अखंडता अबाधित राहणार नाही. बाबासाहेबांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयी सर्व विचार आपल्याला भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये आपल्याला पाहावयास मिळतात. या सरनाम्यामध्ये भारत हे धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र असेल, (धर्मनिरपेक्ष शब्दाचा वापर नंतर करण्यात आलेला आहे) तसेच सामाजिक समता, सामाजिक न्याय, बंधुता या उद्दिष्टांसाठी त्यांचा कारभार चालेल. यामधील प्रत्येक शब्द हा राष्ट्रीय एकात्मता व अखंडतेसाठी जाहीर केला आहे. केवळ सुंदर अलंकार म्हणून नव्हे तर समता, बंधुता, सामाजिक न्याय हे मूल्य कामगार, शेतकरी, दलित, स्त्रिया यांच्या विकासाबरोबरच त्यांना राष्ट्राच्या विकासात केंद्र स्थानावर आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. आज भारत २०२० मध्ये महासत्ता होण्याची जी स्वप्ने पाहत आहे, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गेल्या सहा दशकात भारतीय राज्यघटनेमुळेच येथील दलित बहुजन समाज हा राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी आल्यामुळेच भारताचा काही प्रमाणात विकास व आर्थिक सुबत्ता आलेली आहे हे सत्य नाकारता येत नाही.

### एक नागरिकत्व

बाबासाहेबांच्या मते – एक नागरिकत्व व एक न्यायप्रक्रियेमुळे राष्ट्राची सुरक्षा ही चांगल्या प्रकारे टिकवता येते. एक नागरिकत्वामुळे व एक न्यायालयीन व्यवस्थेमुळे लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण होते, काश्मीर ते अंदमान निकोबारपर्यंत एक नागरिकत्व व एक न्यायव्यवस्थेमुळे

## सुरक्षाविषयक मूलभूत संकल्पना

आजच्या बदलत्या भूराजकीय व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आंतरराष्ट्रीय घडामोडीत जे बदल होत आहेत त्या बदलाच्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेबांनी संरक्षण, परराष्ट्र व सुरक्षाविषयक धोरणाबाबत ज्या काही मूलभूत संकल्पना मांडल्या होत्या त्या संकल्पना आजही कशा महत्त्वाच्या आहेत हे बघणे गरजेचे आहे. मुळातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आईवडलांकडील बहुतेक नातेवाइकांना सैनिकी नोकरीची पार्श्वभूमी असल्याकारणाने बाबासाहेबांना भारताचे संरक्षण आणि सुरक्षततेबाबत अतिशय प्रेम होते.

जुलै १९४१ मध्ये ब्रिटिश सरकारने कार्यकारी मंडळाची पुनर्रचना व सदस्यांची वाढ करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कार्यकारी मंडळात संरक्षण सल्लागार समितीत निवड केली. त्यामुळे बाबासाहेबांनी दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी या समितीची जबाबदारी स्वीकारून, त्यांनी भारताच्या संरक्षण सिद्धतेबाबत व लष्करी शिक्षणासोबतच इतर महत्त्वाच्या बाबतींमध्ये आपले विचार राष्ट्रीय सुरक्षेच्या मंडळात मांडले.

दुसऱ्या महायुद्धाला ३ सप्टेंबर १९३९ रोजी नाझी जर्मनीने पोलंडवर कब्जा केल्यानंतर सुरुवात झाली. त्याच वेळेस डॉ. बाबासाहेबांनी भारताने आपल्या सुरक्षिततेसाठी व जागतिक सुरक्षेतेबाबत नाझी जर्मनीचा विरोध करावा व त्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करावेत अशी भूमिका घेतली. त्याचबरोबर ब्रिटिश सरकारने गोलमेज परिषदामध्ये जी आश्वासने दिली होती त्या आश्वासनांची पूर्तता करावी त्यात प्रामुख्याने भारताच्या सुरक्षेततेची हमी होती. शिवाय गोलमेज परिषदांमध्ये बाबासाहेबांनी भारतीय युवकांना ठरावीक वयानंतर लष्करी शिक्षण सक्तीचे करावे व जेणेकरून त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होईल. शिवाय चांगले सुदृढ प्रशासकीय





अधिकारी निर्माण व्हावे त्यासाठी लष्करी शिक्षण हे सक्तीचे करावे ही मागणी केली. लष्करात भरती करताना सर्वांना ती खुली करण्यात यावी सर्व जातिधर्माच्या लोकांना लष्करात सामावून घ्यावे अशी बाजू बाबासाहेबांनी राष्ट्रीय सुरक्षा मंडळाचे सदस्य असतांना घेतली. त्याच बरोबर दुसऱ्या महायुद्धाचे वर्णन करताना युद्ध हे केवळ कोणत्या प्रदेशाचेच विभाजन करत नाही तर मानवामानवांत एक मूलभूत बदल घडवून आणते. त्यात राष्ट्राराष्ट्रांत बदल होतो. त्यामुळे आपली संस्कृती आणि मूल्ये यात बदल होतो. म्हणून युद्ध थांबवणे व नाझी वादावर विजय मिळविणे हे सर्वांच्या हिताचे आहे.

नाझीवादाद्वारे झालेल्या युद्धामुळे स्वातंत्र्य, बंधुता, समानता निर्माण होणार नाही. त्यामुळे अशा सर्व प्रवृत्तींवर विजय मिळवणे गरजेचे आहे म्हणून त्यांनी नाझीवादाच्या विरोधात भूमिका घेऊन युद्धाचे समर्थन करून नवीन समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय, प्रस्थापित व्हावा, नाझीवादामुळे निर्माण झालेले वांशिक प्रश्न, दोन भिन्न संस्कृतीचे प्रश्न हे केवळ युद्ध केल्यावर संपणार नाहीत तर त्यासाठी युद्ध जिंकून शांतता निर्माण करणे गरजेचे आहे व शांतता टिकविण्यासाठी सर्वांची गरज आहे, असे प्रतिपादन केले.

राज्यघटनेतच राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षेची संकल्पना मांडली आहे. आज जरी भारत जातीय, धर्माच्या नावावर विखुरलेला असला तरी भारतीय राज्यघटनेच्या तरतुदींशी भारतीय लोक काही प्रमाणात प्रामाणिक आहेत. एक नागरिकत्व व एक न्यायव्यवस्थेमुळे भारताच्या इतिहासात प्रथमच भारतीय लोक एकत्र आलेले आहेत. त्याचबरोबर एक नागरिकत्वामुळे सर्व जनतेला समान कायदे लागू होतात व राज्यसरकार चांगल्या पद्धतीने चालवता येतो. म्हणून एक नागरिकत्व व एक न्यायव्यवस्थेमुळे भारताची राष्ट्रीय सुरक्षा, भारताची एकात्मता आणि अखंडता भक्कम होण्यास मदत होत आहे.

## विभागीय एकात्मता

भारताच्या सुरक्षा आणि एकात्मतेसाठी दक्षिण आणि उत्तरेत झालेल्या विभागणीला विरोध होता. त्यांच्या मतानुसार भारताची एकता आणि अखंडता अधिक प्रभावी करण्यासाठी जोपर्यंत प्रत्येक भारतीयांनी प्रांतीय व विभागीय ज्या भावनात्मक गोष्टी आहेत त्या दूर करून भारताच्या सर्वांगीण विकासाठी राज्यांची पुर्नरचना करणे गरजेचे आहे. एकच भाषा जास्त बोलणाऱ्या लोकसंख्येसाठी एक स्वतंत्र राज्याची संकल्पना बाबासाहेबांना मान्य नव्हती. त्यामुळे एकभाषीय लोकसंख्येमुळे वांशिक, भाषिक असे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करतील. त्यामुळे विभागीय असमतोल व भाषीय, प्रांतीयवाद निर्माण होईल. त्यामुळे भारताच्या विकासावर परिणाम होईल. शिवाय भारताच्या अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीतही विविध प्रश्न निर्माण होतील. बाबासाहेबांच्या मते एकच भाषा बोलणारे जर विविध प्रांतात विभागले गेले तर त्यांच्यात प्रांतीय व भाषीय अशी भावना निर्माण होणार नाही.

लहान राज्यांमुळे राष्ट्राचा विकास चांगला होऊ शकतो. शिवाय जी मोठी राज्ये पुनर्रचना आयोगाद्वारे निर्माण केली आहेत त्या मोठ्या राज्यांचीही लहान राज्यात निर्मिती करावी म्हणजे प्रशासकीय कामे व राष्ट्राच्या एकात्मतेची भावना अधिक बळावते. शिवाय लहान राज्ये ही केंद्र सरकारला आव्हान देऊ शकत नाही म्हणून बाबासाहेबांनी लहान राज्य व्हावीत, अशी सूचना राज्य पुनर्रचना आयोगास केली.

## दुसऱ्या राजधानीची मागणी

बाबासाहेबांनी भारताच्या सुरक्षिततेचा विचार मांडताना, भारताचा सर्वांगीण विकास व सर्वसमावेशक ध्येयधोरणांद्वारे प्रत्येक बाबतीत विश्लेषण केले आहे. संरक्षण आणि परराष्ट्र धोरणास पूरक असणाऱ्या महत्त्वाच्या मुद्यावर आपले विवेचन केले आहे. त्यात सर्वात म्हणजे लष्करीदृष्ट्या व सामरिकदृष्ट्या भारताच्या भौगोलिक बाबतीचा विचार करून त्यांनी दुसऱ्या राजधानीची मागणी केली आहे. मोगल आणि ब्रिटिश कालखंडात भारताच्या दोन राजधानी होत्या. मोगल कालखंडात दिल्ली एक राजधानी, तर श्रीनगर ही दुसरी राजधानी होती. जेव्हा ब्रिटिश भारतात आले तेव्हा कोलकता आणि सिमला त्यानंतर कोलकतावरून दिल्ली येथे आल्यानंतरही सिमला येथे दुसऱ्या राजधानीचे अस्तित्व ठेवले. याबाबत ऐतिहासिक दाखले देऊन बाबासाहेब दुसऱ्या राजधानीची मागणी करतात त्याची प्रामुख्याने दोन कारणे देतात. एक तर उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यातील जो क्षेत्रीय व वांशिक वाद आहे तो कमी होईल. शिवाय दिल्ली हे चीन आणि पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्यासमोरचे सर्वात जवळचे शहर आहे म्हणून बाबासाहेब दक्षिणेकडील हैदराबाद व सिकंदराबाद व शेजारील प्रांताचे एकत्रीकरण करून, त्याचे प्रमुख प्रशासकीय विभाग निर्माण करून; त्या ठिकाणी दुसऱ्या राजधानीची स्थापना करावी जेणेकरून, भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून व प्रशासकीय कामे लवकर होण्यासाठी व उत्तर व दक्षिण भारतातील दरी कमी होऊन देशात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण होईल. त्यासाठी हैदराबाद येथे दुसऱ्या राजधानीची मागणी करताना बाबासाहेब दिसतात. त्याचबरोबर हैदराबाद हे शहर भारताच्या सर्व शहरांपासून थोड्याफार प्रमाणात मध्यवर्ती भागात असल्याकारणाने त्याचे सामरिक व सुरक्षाविषयक महत्त्व बाबासाहेबांनी विषद केले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या संपूर्ण चळवळीत व लिखाणात एकच ध्यास होता, तो म्हणजे भारतात जातीविरहित व वर्णविरहित समाज निर्माण करण्याचा व त्यासाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांच्या सामरिक विचारांची मुळे भारतीय राज्यघटनेत परिवर्तित होतात. त्यामुळे भारताची राज्यघटना जगात सर्वात श्रेष्ठ राज्यघटना आहे.

**बाबासाहेबांच्या मते भारत एक सशक्त राष्ट्र म्हणून उदयास यायचे असेल तर त्यासाठी सर्व भारतीयांचे व्हर्टिकल व हॉरिझॉन्टल एकत्रीकरण करणे आवश्यक आहे. प्रादेशिक लोकशाही, केंद्र-राज्य संबंध, नैसर्गिक साधनसामग्रीचा योग्य वापर व वाटप, सामरिक साधनसामग्रीचा वापर व त्याचे व्यवस्थापन हे राष्ट्र-राज्याच्या चौकटीत करणे व त्यासाठी विभागीय व प्रादेशिक वाद बाजूला सारून भारताच्या राष्ट्रहिताला महत्त्व देणे गरजेचे आहे.**



**(लेखक हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील संरक्षण आणि सामरिक शास्त्र या विभागात प्राध्यापक आहेत.)**
**संपर्क : ०९४२३२१०३१४**

# काठी दीक्षाभूमीवरची

**नागपूर येथील दीक्षा समारंभाच्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या काठीचा आधार घेतला ती ऐतिहासिक काठी दिवंगत प्रल्हाद मेंढे गुरुजी त्यांच्या कुटुंबीयांकडे सुरक्षित आहे. ती त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी आजवर जिवापाड जपली आहे. या साडेपाच फूट उंच काठीला आठ गाठी असून वरच्या भागात काळ्या रंगाची मूठ आहे. या आठ गाठ्यांना अनेक लोक आर्य अष्टांगिक मार्गाचे प्रतीक म्हणून ओळखतात.**



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्पर्शाने दलितांना आपला चेहरा गवसला. त्यांच्या ओंजळीतून समतेचे वारे ओसंडून वाहायला लागले. करुणेचे आभाळ गावभर झाले. बाबासाहेबांच्या परिश्रमातून भारताचे संविधान आकाराला



**दीक्षाभूमीवर बाबासाहेबांनी वापरलेली ऐतिहासिक काठी.**

आले. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर त्यांनी भारतात बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन केले. लाखो दलितांनी बौद्ध धम्मात प्रवेश केला. ज्यांना ज्यांना बाबासाहेबांचा सहवास लाभला. त्यांनी स्वतःला धन्य मानले. बाबासाहेबांच्या आठवणी अजूनही त्या लोकांच्या डोळ्यात पाणी आणतात.

या ऐतिहासिक अशा दीक्षा समारंभ प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या काठीचा आधार घेतला ती ऐतिहासिक काठी दिवंगत प्रल्हाद मेंढे गुरुजी यांच्याकडे सुरक्षित आहे.

११ ऑक्टोबर १९५६ ला विमानाने बाबासाहेबांचे नागपुरात आगमन झाले होते. बाबासाहेब श्याम हॉटेलमध्ये थांबले होते. त्या खोलीवर दिवंगत मेंढे गुरूजी यांच्या नेतृत्वात कर्नलबागेतील दहा स्वयंसेवक होते. त्याकाळी कर्नलबागचे सर्वात प्रभावी संघटन 'समता सैनिक दल' होते. बाबासाहेबांना आधारासाठी एक काठी हवी होती. त्यासाठी काही निवडक काठ्या (एक डझन) पोहोचवण्यात आल्या. यातून बाबासाहेबांनी एक काठी निवडली. तेव्हाची ती काठी बाबासाहेबांच्या स्पर्शाने ऐतिहासिक ठरली असून बौद्ध जनतेच्या भावना या काठीशी एकरूप झाल्या आहेत. ही काठी म्हणजे बौद्ध बांधवांसाठी एक भूषण आहे.

फक्त दीक्षा समारंभापुरतीच ही काठी बाबासाहेबांच्या जवळ राहिली नव्हती तर १५ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर महानगरपालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र दिले, त्या वेळीदेखील हीच काठी त्यांच्याजवळ होती. चंद्रपूरच्या दीक्षा समारंभासाठी देखील हीच काठी त्यांच्याजवळ होती.

**प्रा. विजेंद्र मेंढे**

१५ ऑक्टोबर १९५६ च्या दीक्षाभूमीवरील ऐतिहासिक भाषणाप्रसंगी मंचाच्या ठिकाणी बाबासाहेबांच्या संरक्षणाची जबाबदारी मेंढे गुरूजींवर सोपवण्यात आली. त्यांनी ठरवलेल्या लोकांशिवाय कुणालाही मंचावर चढू दिले नाही. अगदी साध्या वेशात सर्व स्वयंसेवकांनी गुरूजींच्या नेतृत्वात चोख व्यवस्था सांभाळली व शिस्तीचे दर्शन घडविले. त्यावेळी स्वयंसेवक प्रमुख के.व्ही. उमरे होते. दीक्षाभूमीचे संपूर्ण मैदान एका रात्रीतून या स्वयंसेवकांनी झाडून काढले.

चंद्रपूरच्या दीक्षा समारंभात बाबासाहेबांनी भाषण दिले नाही. ते अस्वस्थ होते. तेथून रेल्वेने बाबासाहेब नागपूरला आले व सरळ सोनेगाव विमानतळावर गेले. मेंढे गुरुजींसोबत असणारे स्वयंसेवक एका टॅक्सीने बाबासाहेबांच्या जिवाला धोका होऊ नये म्हणून कारसोबत विमानतळापर्यंत गेले. त्या वेळीसुद्धा ती काठी बाबासाहेबांसोबतच होती. परंतु विमानात प्रवेश केल्यानंतर ती काठी बाबासाहेबांनी विमानतळ अधिकाऱ्यांकडे सोपविली. विमानतळ अधिकाऱ्यांनी मेंढे गुरुजींकडे ती काठी दिली. तेव्हापासून आजपर्यंत ती काठी मेंढे कुटुंबीयांकडे आहे. आजपर्यंत अनेक मान्यवरांनी या ऐतिहासिक काठीचे दर्शन घेतले आहे.

**(लेखक हे आंबेडकरी विचारवंत आहेत.)**

# देणगी सुशासनाची

**भारतातील प्रस्थापित व्यवस्था ही एकाधिकारशाहीचे समर्थन करणारी, समाजातील सामाजिक-आर्थिक विषमता जास्त घट्ट करणारी, बहुजनांना राजकीय अधिकारापासून वंचित ठेवणारी, शिक्षण नाकारणारी अन्यायी व्यवस्था होती. ही अमानवीय व्यवस्था पूर्णपणे नाकारून समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि व्यक्तीची प्रतिष्ठा ह्या तत्त्वांवर आधारलेली समाजव्यवस्था स्थापन करणे हेच डॉ. आंबेडकरांचे जीवनध्येय होते. समाजवादी व्यवस्था स्वीकारून सर्व प्रकारचे शोषण आणि गुलामगिरी राज्यघटनेच्या कायद्याद्वारे नष्ट करून, सामूहिक हिताची मानवी व्यवस्था रुजवणे हेच त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते. सुशासन हा लोकशाही, समताधिष्ठित, न्यायाधारित कल्याणकारी राज्याच्या स्थापनेकरिता अत्यावश्यक घटक आहे. लोकशाही व्यवस्था जरी स्वीकारली तरी सुशासनाशिवाय ती सामाजिक, आर्थिक लोकशाहीमध्ये परिवर्तित होणे शक्य नाही. त्याचकरिता मार्गदर्शक तत्त्वांच्या स्वरूपात राज्यघटना, सत्ताधाऱ्यांना शासन कोणत्या उद्देशाने आणि कशा प्रकारे चालवले पाहिजे याचा दिशानिर्देश देते.**



**भारतीय घटना परिषदेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात भारतीय राज्यघटनेचा अंतिम मसुदा सादर करताना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर.**

**डॉ. रमेश शंभरकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रखर राष्ट्रवादी नेते होते. त्यांना भारत एक सशक्त राष्ट्र म्हणून घडवायचे होते. एक असा राष्ट्रीय समाज जो फक्त समतेवर आणि न्यायावर आधारलेला, व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि पर्यायाने राष्ट्राचा विकास हेच ध्येय असलेला, निकोप मानसिकतेचा समाज हेच त्यांचे एकमेव उद्दिष्ट होते. व्यक्ती हीच समाजाच्या आणि राष्ट्राच्या केंद्रस्थानी असल्यामुळे त्याच्या अधिकाराची सनद राज्यघटनेत असावी असे त्यांचे ठाम मत होते.

भारताच्या राज्यघटनेवर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव आपल्याला स्पष्ट दिसतो. ते व्यक्तिस्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते होते. राज्यघटनेबद्दलची त्यांची अपेक्षा म्हणजे राज्यघटना एक राजकीय दस्तऐवज न राहता तो सामाजिक पुनर्रचना करणारा दस्तऐवज झाला पाहिजे अशी होती. शोषित व पीडित घटकांना दुर्लक्षून राष्ट्र घडणे शक्य नाही, असे त्यांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांना प्रकर्षाने वाटत होते की, ह्या देशामधून जोपर्यंत जातिव्यवस्था आणि आर्थिक शोषणाची व्यवस्था नष्ट होत नाही, स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने दर्जा मिळत नाही, श्रमिक–कामगारांना श्रमाचा योग्य मोबदला मिळत नाही, मुलांना शिक्षणाच्या संधी पुरेशा आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध नाहीत तोपर्यंत राजकीय लोकशाही खऱ्या अर्थाने परिपक्व होत नाही व कायद्याचे आणि न्यायाचे राज्य निर्माण होणे शक्य नाही.

डॉ. आंबेडकरांना असे वाटत होते की, या देशातील दलित–शोषित–वंचितांना फक्त संविधानाच्या माध्यमातून न्याय मिळू शकतो आणि त्याकरिता संविधान सभेमध्ये जाण्याची त्यांची धडपड होती.

## घटनेतील प्रस्तावना, मूलभूत अधिकार


भारतीय राज्यघटनेतील प्रस्तावना, मूलभूत अधिकार राज्याच्या धोरणाची तत्त्वे आणि निश्चित वर्गाकरिता विशेष तरतुदी हे भाग शोषित, वंचित समूहाच्या अस्तित्वाशी संबंधित भाग आहेत, त्यांना मुख्य सामाजिक आणि राजकीय प्रवाहात सामील करून घेणारे आहेत. डॉ. आंबेडकरांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे पहिले प्रतिबिंब प्रस्तावनेमध्येच दिसते. त्यात व्यक्तीची प्रतिष्ठा (Dignity of Individual) हा शब्दप्रयोग अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण त्याशिवाय लोकशाहीची इतर मूल्ये केवळ निरर्थक

ठरतात. त्यांचा संघर्ष हा माणसाच्या प्रतिष्ठेचाच होता. जी प्रस्थापित व्यवस्थेत दिसत नव्हती.

धार्मिक परंपरा आणि वहिवाटी ह्याच भारतीय समाजात अमानुषता आणि विषमता रुजविण्यास कारणीभूत ठरल्या आहेत. धार्मिक परंपरा आणि वहिवाट असंविधानिक ठरवून संविधानाने लोकशाहीचा मार्ग प्रशस्त केला. डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाची पूर्णपणे छाप असलेला भाग म्हणजे राज्यघटनेतील भाग ४ – राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे. ह्यांना मार्गदर्शक तत्त्वेच का म्हणावे ? राज्य म्हणजे काय ? प्रयत्न (Strive) हाच शब्द का वापरला गेला ? याचा खुलासा त्यांनी ज्या भक्कमपणे केला यावरून घटनेचा हा भाग त्यांना अत्यंत महत्त्वाचा वाटत होता हे स्पष्ट होते. त्यांची राज्ये आणि अल्पसंख्याकांमधील समाजवादी विचारसरणी, राष्ट्रहित, एकजीव असा भारतीय समाज निर्माण करण्याची तळमळ, स्त्री समता, शोषणरहित सामाजिक आणि आर्थिक व्यवस्था घडवण्याचे उद्दिष्ट्य या भागातील अनुच्छेदांमध्ये प्रतिबिंबित होते. या भागातील तरतुदींना न्यायसंस्थेचे पाठबळ नसले तरी त्यांचे महत्त्व कमी लेखता येत नाही हे त्यांनी घटना समितीसमोर सांगितले.

डॉ. आंबेडकरांनी मार्गदर्शक तत्त्वांना सुशासनाची पूर्वअट म्हणून मान्यता दिली आहे. शासन कोणत्याही पक्षाचे असो ते सुशासन (Good Governance) देणारेच असले पाहिजे हा त्यांचा आग्रह का होता हे तपासणे आज गरजेचे आहे. अनुच्छेद ३८ राज्याला कल्याणकारी समाजव्यवस्था साध्य करण्याचा निर्देश देते. ज्यामध्ये लोकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्राप्त राहील. अनुच्छेद ३९ मध्ये निर्देश आहे की, स्त्री–पुरुषांना उपजीविकेची पुरेशी साधने, जनसामान्यांच्या सर्वोत्तम हिताकरिता भौतिक साधन संपत्तीची मालकी, नियंत्रण आणि वाटप, धनसंपत्ती आणि उत्पादनाच्या साधनाचा सामान्यांच्या हिताविरुद्ध संचय होणार नाही असे आर्थिक धोरण, स्त्री–पुरुषांना सारख्या कामाकरिता सारखे वेतन, स्त्री–पुरुषांचे आरोग्य, शारीरिक क्षमता आणि मुलांचा दुरुपयोग होणार नाही. तसेच आर्थिक गरजेपोटी कोणालाही त्यांच्या वयाच्या आणि क्षमतेच्या प्रतिकूल व्यवसाय करावा लागणार नाही, मुलांना मुक्त आणि प्रतिष्ठापूर्ण वातावरणात निरोगी पद्धतीने विकसित होण्याच्या संधी व सुविधा मिळाव्यात तसेच मुले, युवकांचे शोषण आणि नैतिक व भौतिक गरजांच्या उपेक्षेपासून संरक्षण होईल असे विशेष प्रयत्न राज्य करेल.''

अनुच्छेद ४१ चा निर्देश आहे की, राज्य आपल्या आर्थिक क्षमता आणि विकासाच्या मर्यादेमध्ये बेरोजगार, वृद्ध, आजारी आणि अपंग यांच्या कामाचा, शिक्षणाचा आणि शासकीय मदतीचा अधिकार सुनिश्चित करेल. तसेच हलाखीचे जीवन जगणाऱ्या इतरांच्या बाबतीत परिणामकारक तरतूद करेल. अनुच्छेद ४० मध्ये ग्रामपंचायतीच्या रचनेविषयीचे निर्देश आहेत. डॉ. आंबेडकरांना संपूर्ण ग्रामीण पुनर्रचना अभिप्रेत होती. जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समाजातील खालच्या थरातील माणसाला स्थान मिळत नाही. तोपर्यंत त्याला सत्तेतील खरा वाटा मिळत नाही असे त्यांचे मत होते.



**भारतीय राज्य घटनेची मार्गदर्शक तत्त्वे ही डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचे सुस्पष्ट असे प्रतिबिंब आहे. मार्गदर्शक तत्त्वांबद्दल डॉ. आंबेडकर किती आग्रही होते हे त्यांनी 'Strive' शब्दाच्या प्रयोजनाबद्दल जे स्पष्टीकरण दिले त्यावरून दिसून येते. मार्गदर्शक तत्त्वांमध्ये 'The State Stall Strive' ही शब्दयोजना केलेली आहे. काही सदस्यांनी तो शब्द काढून टाकण्याची केलेली सूचना फेटाळून लावताना ते म्हणतात,''राज्य घटनेतील हा शब्द माझ्या मते अत्यंत महत्त्वाचा आहे. हा शब्द वापरण्यामागे आमचा उद्देश आहे की, मार्गदर्शक तत्त्वांना मूर्त रूप देण्याकरिता शासनाच्या मार्गात कितीही अडचणी आल्यात किंवा प्रतिबंधित करणारी परिस्थिती जरी निर्माण झाली तरी; कोणत्याही कठीण आणि प्रतिकूल परिस्थितीमध्येसुद्धा मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करण्याचे राज्य प्रयत्न करेल.''**

भारतातील श्रमिक हा दुहेरी शोषणाचा बळी आहे. एका भांडवलदाराकडून होणारे आणि दुसरे जातिव्यवस्थेमुळे होणारे शोषण प्रस्थापित व्यवस्थेमध्ये श्रमाला व श्रमिकाला दोघांनाही प्रतिष्ठा नाही. अनुच्छेद ४२ व ४३ मध्ये ही व्यवस्थाच पालथी करण्याचा निर्देश आहे. अनुच्छेद ४३ हा बहिष्कृत माणसाला मुख्य सामाजिक प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी राज्यावर सोपवते. अनुच्छेद ४४ भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देण्याची क्षमता असलेला आहे.

भारताच्या राज्यक्षेत्रात सर्व नागरिकांसाठी समान नागरी संहिता सुनिश्चित करण्याचा राज्य प्रयत्न करेल. ही तरतूदच नावीन्यपूर्ण आणि सामाजिक समता निर्माण करणारी आहे. अनुच्छेद ४५ मधील १४ वर्षापर्यंतच्या मुलांना सक्तीचे आणि मोफत शिक्षण देण्याचे प्रयत्न करण्याचा राज्याला दिलेला निर्देश डॉ. आंबेडकरांच्या शिक्षणाप्रती आग्रहाची साक्ष आहे.

दलित–शोषित–वंचित समाजाचे काळजीपूर्वक शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धन करून त्यांचे सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करून त्यांना सामाजिक न्याय मिळवून देण्याचे प्रयत्न ही सरकारची जबाबदारी आहे. डॉ. आंबेडकरांचा विचार होता, त्याचप्रमाणे ह्या समूहात स्वाभिमान निर्माण व्हावा, त्यांच्या मानसिक आरोग्याकरिता त्यांचे शारीरिक आरोग्य सुधारणे गरजेचे आहे. याकडे योग्य लक्ष देऊन शासनाने तसे धोरण राबवण्याचे निर्देश अनुच्छेद ४६ व ४७ मध्ये दिलेले आहेत. स्वघटनेतील अशा विविध तरतुदींमधून डॉ. बाबासाहेबांनी आधुनिक भारताच्या सर्वांगीण विकासाचा पाया घातला आहे.

**(लेखक हे डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे प्राध्यापक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२७२६४५४**

# अर्थक्रांतीची शाश्वत सूत्रे

**डॉ. अनिल सूर्या**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक कार्य आणि संशोधन ग्रंथसंपदेचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यातील ज्ञान सर्वांना समजावून सांगण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाची समताधिष्ठ आर्थिक प्रगती व विकास साधण्यासाठी डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांना स्वीकारले पाहिजे. त्यांचे अर्थविषयक विचार हे अतिशय दूरदृष्टीचे व मूलभूत स्वरूपाचे आहेत. देशाच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी आवश्यक अशा उपाययोजना प्रभावीपणे कशा अमलात आणता येतील, यासाठी सुद्धा त्यांनी सांगितलेली सूत्रे आजही उपयुक्त ठरू शकतात.**



**लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पॉलिटिकल सायन्स येथील प्राध्यापक आणि सहाध्यायी यांच्यासोबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिभेतून निघालेली आर्थिक क्रांतिसूत्रे राष्ट्र आणि मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी लाभलेला सूर्यप्रकाश आहे. ही आर्थिक क्रांतिसूत्रे आजच्या काळाजी गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर अष्टपैलू हे व्यक्तिमत्त्व लाभलेले प्रज्ञापुरुष होते. अर्थशास्त्रावर त्यांनी लिहिलेल्या तीन महाग्रंथावरून डॉ.आंबेडकरांनी 'अर्थशास्त्र' या नावास मोठे केले आहे.

त्यांच्या या तीन शोधग्रंथातून त्यांनी आर्थिक विषयाच्या प्रत्येक पैलूवर खोल आणि विस्तारपूर्वक अभ्यास केला हे जाणवते. या ग्रंथात अर्थकारणाचे डॉ. आंबेडकरांनी केलेले विवेचन हे त्यांच्या प्रज्ञेची साक्ष आहे, अर्थशास्त्राच्या परिपूर्ण ज्ञानाची साक्ष आहे.

अ) Administration and Finance of the East India Company (ईस्ट इंडिया कंपनी : प्रशासन आणि अर्थसूत्र)

डॉ. आंबेडकरांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात एम.ए. च्या पदवीसाठी अवघ्या २४ व्या वर्षी वरील शोधनिबंध लिहिला. या ग्रंथाच्या माध्यमातून अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांनी पहिले पाऊल रोवले. हे १९१५ चे पहिले पाऊल अर्थक्रांतीतील महत्त्वाचे पाऊल होते. ४२ पृष्ठाच्या शोधनिबंधातून सर्वांगास स्पर्श करुन न्यायबुद्धीने इस्ट इंडिया कंपनीवर डॉ.आंबेडकर चिडतात. ही त्यांची चीड त्यांचे भारतभूमीवर असलेल्या प्रेमाची आणि मायभूमीच्या स्वाभिमानाची साक्ष होय.

व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. या व्यापारी ते राज्यकर्ते पर्यंतच्या प्रवासात इंग्रजांनी भारतीयांचे केलेले शोषण आणि अल्पसे फायदे या दोन्ही मुद्द्यांची सांगोपांग चिकित्सा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे. १८५८ मध्ये ईस्ट इंडिया कंपनी बरखास्त होऊन ब्रिटिश सरकारची भारतावर अंमलबजावणी होण्यास सुरुवात झाली. सामान्य शेतकरी शेतसाऱ्याच्या वसुलीमुळे त्रस्त झाला. इतर भारतीयांवरही वेगवेगळे कर लावल्याने ब्रिटिशांची अर्थनीती भारतीयांवर अन्याय करणारी होती हे आणि ब्रिटिशांचा गैरवाजवी फायदा करणारी होती, अशी मते बाबासाहेब निर्भीडपणे मांडतात.

विद्यापीठे, पाश्चिमात्य शिक्षणाची ओळख, न्यायालयीन व प्रशासकीय स्वरूपाच्या आधुनिक संस्थांची उभारणी आणि इतर सुधारणेबद्दल डॉ.आंबेडकर ब्रिटिशांचे आभारही मानतात. पण आर्थिक नीतीच्या बाबतीत ते स्पष्ट आणि निर्भीड बोलतात– भारताने इंग्लंडला अमाप दिले आहे आणि इंग्लंडकडून भारताला अक्षरश: काहीही मिळालेले नाही ही दोन्ही विधाने आश्चर्यकारक वाटतील पण आर्थिक दृष्टिकोनातून पाहिले तर त्यातील सत्यता निर्विवाद आहे.

ब) The Evolution of Provincial Finance in

British India (ब्रिटिश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती)

इ.स.१८३३ ते १९२१ या कालखंडातील ब्रिटिश भारतातील केंद्र शासन व घटक राज्ये यांच्यातील पद्धतशीर संशोधन म्हणजे डॉ. आंबेडकरांचा 'भारताचा राष्ट्रीय नफा : एक ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक अभ्यास' हा शोधप्रबंध होय. हा शोधप्रबंध प्रा.सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. साठी कोलंबिया विद्यापीठास डॉ. आंबेडकरांनी १९१६ मध्ये सादर केला. हा शोधप्रबंध १९२५ मध्ये 'ब्रिटिश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या नावाने प्रकाशित करण्यात आला. या ग्रंथाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पीएच.डी. तर मिळवून दिलीच पण सार्वजनिक वित्ताच्या क्षेत्रात त्यांना प्रथमांक मिळवून दिला. अशा प्रकारचा एका भारतीयाने लिहिलेला आगळावेगळा पण वास्तव सांगणारा हा पहिलाच वित्तग्रंथ होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अभ्यासपूर्वक या शोधप्रबंधातून काढलेले काही रोखठोक आणि खरे निष्कर्षात्मक मुद्दे पुढीलप्रमाणे:

■ अ) भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात. ब) भारतातील प्रादेशिक वित्ताची वाढ आणि क) भारतातील प्रादेशिक वित्ताची सुरुवात आणि वाढीवरील यंत्रणा. वरील मुद्द्याचा जगात पहिल्यांदाच डॉ. आंबेडकरांनी घेतलेला परामर्श म्हणजे हा शोधप्रबंध होय. ■ डॉ. आंबेडकरांच्या मते पैसा उभारणे आणि खर्च करणे या तत्कालिक गोष्टींच्या पलीकडे आर्थिक जबाबदारी स्वीकारणाऱ्यांनी पाहायला शिकले पाहिजे. ■ भारतात शेतसाऱ्याचे प्रमाण शेतकऱ्यांना न पेलणारे होते. त्यांच्यावर सक्ती होत असे त्यामुळे शेतीचा विकास खुंटला. ■ जकात दोन्ही प्रकारे वसूल केली जाई. देशांतर्गत तसेच परदेशी व्यापार व्यवहारातून त्यामुळे एका बाजूस व्यापाराचा कोंडमारा झाला तर दुसऱ्या बाजूस उद्योगांची मुस्कटदाबी झाली. हा अनिष्ट परिणाम जकातीमुळे झाला. ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात – कर पद्धती ही एक क्रूर चेष्टा होती. कारण समाजरूपी शरीराच्या ज्या भागात दाट रक्त असते तेथे सुरी चालवली जात नव्हती, तर जो भाग गरिबी आणि दुर्बलतेच्या यातना सोसत होता. नेमका तेथेच घाव बसत होता. ■ इ.स.१८०९ ते १८५७ या वर्षामधील खर्चाचे पृथ:करण करून या गरीब देशाच्या उत्पन्नापैकी ५२ ते ८० टक्के खर्च युद्धसेवांवर पण शिक्षणासाठी, लोकोपयोगी कामासाठी, रेल्वे, जलवाह–तूक, सिंचनासाठी, कालवे इत्यादी बाबींवर खर्च करण्यासाठी तरतूद नाही. ■ प्रांतांना दिलासा देण्यासाठी आयकर चालू ठेवणे न्याय्य झाले असते. परंतु भारत सरकारच्या वित्त मंत्रालयातून न्याय यापूर्वीच हद्दपार झाला होता.




The problem of the Rupee,
Its origin and its Solution

**(रुपयाचा प्रश्न, त्यांचे मूळ आणि समाधान)**

**डॉ. आंबेडकरांचा आर्थिक क्षेत्रातील हा तिसरा महाग्रंथ आहे. अशा प्रकारचा जगातला पहिलाच ग्रंथ म्हणून जगविख्यात विद्वानांनी ग्वाही दिली आहे. या शोधग्रंथाचे मार्गदर्शक एडविन कॅन्स हे स्वत: ख्यातनाम अर्थतज्ज्ञ होते. पण डॉ. आंबेडकर गुरूपेक्षा जास्त दूरदृष्टीचे आणि व्यापक दृष्टीचे अर्थतज्ज्ञ होते. प्रा.एडविन कॅन्सची थेअरी खोटी ठरली आहे. प्रा.कॅन्सचे प्रतिपादन भारताच्या बाबतीत चुकीचे ठरले आहे, त्याउलट डॉ. आंबेडकरांचा इशारा भविष्यवाणीसारखा ठरला आहे. यावरून गुरूपेक्षा शिष्य मोठा याचे दर्शन होते. प्रा.एडविन कॅन्स म्हणतात, भारतीय रुपयाचा प्रश्न या शोधप्रबंधातील आंबेडकरांचे काही मुद्दे थेट प्रश्नाला स्पर्श करणारे आहेत, त्यांचे या विषयावरील विचार मला जरी मान्य नसतील तरी त्या विचारांमध्ये उल्लेखनीय टवटवीतपणा आहे. आज एडविन कॅन्स जिवंत असते तर डॉ. आंबेडकरांशी निश्चितच सहमत झाले असते कारण त्यांची थिअरी खोटी ठरली आहे, डॉ. आंबेडकरांची थिअरी दीपस्तंभासारखी आजही सत्याचा प्रकाश देत आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'ब्रिटिश भारतामधील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती' या जगप्रसिद्ध ग्रंथातून वरीलप्रमाणे अनेक मुद्दे काढता येतील. हा ग्रंथ म्हणजे १८३३ ते १९२१ या प्रदीर्घ काळातील ब्रिटिशांच्या आर्थिक, राजकीय आणि काही प्रमाणात सामाजिकही बारीकसारीक सर्व गोष्टींचा परामर्श आहे. रुपयाचा प्रश्न त्याचे मूळ आणि समाधान हा प्रबंध लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स या पदवीसाठी लिहिला गेला होता. १९२१ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संशोधनाचे कार्य हातावेगळे केले आणि १९२३ साली प्रथम प्रसिद्ध झाले. नंतर १९४७ साली पुन्हा दुसरी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली. चलनपद्धती, ग्रामअर्थव्यवस्था, वस्तूची अदलाबदल करून व्यवहार चालविण्यापासून ते सोने–चांदी या धातूंचे चलन आणि आजचे कागदी चलन खात्यापर्यंत सांगोपांग, जिज्ञासू प्रवृत्तीने अभ्यास करून या शोधग्रंथात अचूक व विस्तृत मांडणी डॉ. आंबेडकरांनी केली आहे. डॉ. आंबेडकर सांगतात, ब्रिटिश राजवटीपूर्वी मोगल साम्राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. त्या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणून सोने, चांदी किंवा धातूचा वापर होत असे तसेच ब्रिटिशपूर्व राजवटीत नोकरांना आणि सैनिकांनाही वस्तुस्वरूपाने पगार मिळत असे. ब्रिटिशांनी त्याऐवजी रोख पैसे देण्यात सुरुवात केली. त्यामुळे लोकांकडून कर असो वा इतर रोख पैशाच्या स्वरूपातच स्वीकारावे लागत असे. डॉ. आंबेडकरांचे तर्कनिष्ठ आणि दृढ मत होते की, जोपर्यंत रुपयाच्या सामान्य क्रयशक्तीमध्ये स्थिरता येत नाही तोपर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही आणि प्रामुख्याने हीच बाब विनिमय प्रमापामुळे शक्य होत नव्हती. या व्यवस्थेमुळे रोगाच्या मूळ कारणांचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणेच विचारात घेऊन उपाय केला जात होता. डॉ. आंबेडकरांनी हे सुचवलेले विचार मूलगामी आहेत.


**(लेखक हे आंबेडकरी विचारांचे अभ्यासक असून नवी दिल्ली येथे भारत सरकारमध्ये वरिष्ठ अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)**

**संपर्क : ०९८९१३५८३४४**


■■

# परिवर्तनाचा महामेरू

**प्रा. अविनाश डोळस**


बाबासाहेबांच्या प्रभावाच्या दोन बाजू आहेत. त्यांच्या विचारांचा प्रभाव हा आज भारताबरोबरच भारताबाहेरही दृष्टिपथास येतो. भारताबाहेरील प्रभाव हा दोन घटकांमुळे दिसून येतो. एक त्यांनी लिहिलेल्या ग्रंथातून त्यांनी मांडलेले सिद्धान्त. विशेषत: विषमतेविरोधातील तत्त्वज्ञानाने प्रभावित झालेला जगभरातील अभ्यासक, समतेवर निष्ठा असलेला कार्यरत कार्यकर्ता. या दोन्ही घटकांवर बाबासाहेबांच्या विचाराचा प्रभाव अधिक दिस-तो. त्यातून अस्पृश्यता, मानवमुक्ती, धर्मांतर, लोकशाही यासंबंधी बाबासाहेबांनी केलेली मांडणी व त्यातून भारतात निर्माण होऊ घातलेल्या नवसमाज निर्मितीची प्रक्रिया ही मंडळी समजून घेताना दिसतात. त्याचबरोबर युरोपातील जनतेला ती ओळख करून देतात. बाबासाहेबांची मानवमुक्ती संकल्पना तर अनेकांना प्रेरणा देणारी ठरते आहे. एकविसाव्या शतकात भेदाभेदाच्या विरोधात लढणाऱ्या आशियातील व युरोपातील बाधित लोकांना बाबासाहेब व त्यांचे कार्य व विचार एक प्रेरणास्रोत वाटतो आहे.

**विसाव्या शतकात जगावर कार्ल मार्क्स, बर्ट्रांड रसेल, महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो. लोकशाही देशात परिवर्तन घडवण्याचे सामर्थ्य हे प्रत्येक पाच वर्षांनी जनतेच्या मतदानात असल्याचे मत, रसेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांचेही होते. परिवर्तनासाठी समाजाची मानसिकता घडवण्याचे कार्य मोठे आहे, असे मानण्यात त्यांनी विश्वास दाखवला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दाखविलेल्या मार्गाने जाण्याकडे लोकांचा कल अधिक असल्याचा अनुभव गेल्या व आजच्या शतकात येतो.**

दुसऱ्या बाजूला भारतीय समाजावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचा विचार आणि कार्य याचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत चाललेला आपल्याला दिसतो. त्याचा सर्वात जास्त प्रत्यय आला तो आणीबाणीच्या काळात. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार करताना नागरिकांच्या मदतीला आले ते म्हणजे संविधान आणि संविधानाने दिलेला मूलभूत व्यक्तिस्वातंत्र्याचा अधिकार. यावेळी संविधानाचा संदर्भ घेतला गेला आणि त्याचबरोबर संविधानकर्त्यांचा म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा! स्वातंत्र्योत्तर काळात आंबेडकर अनुयायांपलीकडच्या भारतीयांनी घेतलेला हा संदर्भ, त्यांच्या हक्कासाठी बाबासाहेब व त्यांनी मांडलेले व्यक्तिस्वातंत्र्यासंबंधीचे विचार याचा त्यांना आधार वाटला. पुढे पूर्ण आणीबाणी विरोधात लढणाऱ्या व्यक्तीला बाबासाहेब जवळचे वाटले. नंतरच्या पिढीसाठी आपल्या हक्कासाठी झगडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे त्यांच्या जगण्याचे आधार बनले. १९७० नंतरच्या पिढीची परिभाषा ही संविधानात्मक बनली व पुढचे सर्व संघर्ष हे समतेच्या मूल्याचा आधार धरून झाले.

## संविधान स्वत:ला अर्पित

१९५० मध्ये आपण संविधान स्वत:ला अर्पित केले. जनतेने जनतेचे संविधान जनतेला (लोकार्पण) अर्पण केले ही सर्वात मोठी विसाव्या शतकातील घटना म्हणता येईल. ईश्वर, धर्म, राष्ट्रपिता, धर्मसंस्थापक यापैकी कोणाचा विचार मान्य न होता लोकांचा लोकार्पणाचा विचार पुढे आला. त्याचवेळी लोकशाहीमध्ये सार्वभौम जनता ही संकल्पना अधोरेखित झाली. त्याचबरोबर संविधानाची दिशा ठरवण्यात आली. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव व न्याय या मूलभूत तत्त्वांशी नैतिक व कायदेशीर नाते बांधले गेले. उद्दिष्टांमध्ये ही तत्त्वे समाविष्ट करून त्याचा जागर केला गेला. समताधिष्ठित समाजरचनेचे बाबासाहेबांचे स्वप्न ही पहिली पायरी म्हणून



**१४ एप्रिल १९५० रोजी जन्मदिवसानिमित्त दिल्ली येथील २६,अलिपूर रोडवरील निवासस्थानातील ग्रंथालयात काढलेले डॉ. आंबेडकर यांचे छायाचित्र.**

राजकीय लोकशाहीतून व्यक्त झाले. सामाजिक, आर्थिक लोकशाहीकडे वाटचाल करण्याचा प्रारंभ म्हणून या राजकीय व्यवस्थेकडे बघितले गेले. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक धोरणाची वाटचाल सुरू झाली. सामाजिक लोकशाही समता प्रस्थापित करण्यासाठी प्रबोधन व त्याला आधार असणारी घटना (Constitution) कारणीभूत ठरली. पुढे १९९३ मध्ये बाजारावर आधारित आर्थिक धोरणातून त्याला एकप्रकारची बाधा आणली गेली, तरी त्यातून आर्थिक समतेसाठी करावयाच्या तरतुदीसाठी जनता कार्यरत राहिलेली दिसते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी दोन पद्धतींचे अवलंबन केले. एक लोकलढे उभे करून मानव हा समान

आहे व त्याचा दर्जादेखील समान असल्याची भूमिका त्यांनी मांडली. यातून महाड चवदार तळ्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह, पुण्याचा पर्वती सत्याग्रह, अमरावतीचा अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह यासारखे सत्याग्रह करून जनतेमध्ये चर्चेचे मोहोळ (Debate) उठवले. प्रश्न सोडवण्यासाठी हीच एकमेव योग्य पद्धती मानली जाते. बाबासाहेबांनी ती १९५२ पर्यंतच्या हिंदू कोड बिलापर्यंत पद्धत विकसित केली. त्याचा परिणाम म्हणून रूढ अर्थाने 'विचार करण्यावर बंदी' असलेला समाज अस्पृश्यांच्या प्रश्नावर, महिलांच्या प्रश्नांवर विचार करू लागला. प्रश्न न विचारणे व ग्रंथ-धर्मप्रामाण्य स्वीकार व अंतिम सत्य त्यातच आहे, या बंदिस्त मानसिकतेत अडकलेल्या भारतीय समाजाला त्यांनी मोकळे केले.

## धर्मांतर

दुसरी महत्त्वाची घटना म्हणजे १४ ऑक्टोबर १९५६ ला बाबासाहेबांनी केलेले धर्मांतर होय. १९३५ मध्ये त्यांनी येवला मुक्कामी परिषदेत धर्मांतराची घोषणा केली. समता हे जीवनमूल्य न मानणाऱ्या धर्मात समता प्रस्थापित करण्यासाठी १९२० ते १९३५ पर्यंत केलेल्या त्यांच्या प्रयत्नांना यश मिळू शकले. नव्या मूल्यांवर निष्ठा असलेला, हीच जीवनमूल्ये मानणारा व त्यासाठी जागृत व आग्रही असणारा समाज त्यांनी धम्मदीक्षेतून या देशात उभा केला. नवबौद्ध समाज बुद्ध अनुयायी बनून समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या तत्त्वाचे अनुसरण करणारा उभा राहिला व त्यासाठी तो भारतात आग्रही राहिला. पुढे राजकीय पक्षाच्या रूपाने जातीय समाजात पक्षाकडेसुद्धा जातीचा पक्ष म्हणून बघितले जाते. हे वास्तव माहीत असूनही पराभव निश्चित असूनही, निवडणुकीत राजकीय पक्ष म्हणून सहभागी होऊन देशात एक स्वतंत्र विरोधी पक्ष उभा करून, राजकीय लोकशाही प्रस्थापित करण्याचा मोठा प्रयत्न केला. त्यातून लोकशाही प्रक्रियेची शिकवण भारतीयांना दिली.



स्त्रीच्या गुलामीची कारणमीमांसा बाबासाहेबांनी 'Down-fall of Hindu Women' या त्यांच्या विश्लेषणात केली आहे. तिला हिंदू कोड बिलांद्वारे वारसहक्क, दत्तकहक्क, व्यक्तिस्वातंत्र्य बहाल केले आहे तरी समाजाचे पुराणमत बदललेले नाही. अस्पृश्यांना त्यांचा समानतेचा हक्क गाजवण्यासाठी मंदिरप्रवेश सत्याग्रह करावा लागला. तोच कित्ता आज शनिमंदिर प्रवेश, त्र्यंबकेश्वर मंदिर प्रवेश, दक्षिणेकडील देवालयात प्रवेश यासाठी महिला संघर्ष करीत आहेत. त्यांना आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशिवाय दुसरा कुठला आधार नाही.

डॉ. बाबासाहेबांनी धर्मांतर केल्यानंतर भारतात विशेषत: महाराष्ट्रात त्याचा प्रभाव त्वरित जाणवला. देव, आत्मा, पुर्नजन्म, स्वर्ग या साऱ्या संकल्पातून तो मुक्त झाला. वैज्ञानिक दृष्टिकोन हा त्याचा बघण्याचा दृष्टिकोन बनला. खेड्यातील लहान मुलगादेखील विज्ञान व धम्माचा आधार घेऊन गावातील पारंपरिक कल्पनेचे नव्याने विश्लेषण करू लागला. त्याचा परिणाम गावातील लोकांना एका नव्या विचाराचा परिचय झाला. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्याचा उपयोग झाला.

बाबासाहेबांचे अनुयायी बौद्ध झाले. याचा परिणाम लगेच खेडेगावांत तत्कालीन महाराष्ट्रात दिसला. प्रथम विवाहपद्धतीत आमूलाग्र बदल झाला. प्रतिष्ठेसाठी व सत्तेसाठी प्रतीक असलेली खुर्ची प्रथम बौद्ध वर-वधूसाठी आणण्यात आली. पुष्पहार आले, बुद्धप्रतिमा व बाबासाहेबांचा फोटो मांडला गेला. बुद्धसरणेच्या पंचशील वंदनाने विवाह संपन्न झाला. तांदुळाऐवजी फुले आली. हा बदल ग्रामीण महाराष्ट्रात लक्षणीय होता.

'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा', हा बाबासाहेबांचा नारा होता.




उपाशीपोटी राहूनही आईबाप पोरा-पोरींना शाळेत पाठवू लागले. शिक्षणातून समाजाचा कायापालट झाला. प्रचंड मेहनतीने मुले-मुली शिकल्या. शेतीप्रधान समाजात घरची शेती हाच मुख्य प्रतिष्ठेने जगण्याचा मार्ग. नोकरी दुय्यम स्थानी. बाबासाहेबांनी दिलेल्या आदेशानुसार गावातील तत्कालीन अस्पृश्य समाजाने मुलांबरोबर मुलींना शिकवले. त्या शिक्षिका म्हणून सरकारी, खाजगी शाळेत नोकरदार म्हणून दिसू लागल्या. खांद्यावर पदर जो केवळ शहरी बाईचा पेहराव होता तो ग्रामीण महाराष्ट्रात या नवशिक्षित बौद्ध मुलीचा झाला. खालच्या जातीच्या मुलींमध्ये शिक्षणामुळे झालेला हा बदल गावाला चीड आणणारा होता. आपली मुलगी अडाणी आणि या बौद्धाची मुलगी शिक्षित,

**समता प्रस्थापित करण्यासाठी विषमताप्रणीत समाजात एक विशिष्ट व्यवस्था निर्माण करणे आवश्यक असते. यासाठी बाबासाहेबांनी घटनेत शेड्यूल कास्ट, शेड्यूल ट्राईब्ज व ओ.बी.सी. या मागासलेल्या समाजघटकास 'सुरक्षित' करण्यासाठी आरक्षण व्यवस्था निर्माण केली. ही व्यवस्था संबंधित मागास समूहाच्या विकासासाठी कारणीभूत ठरल्याचा साक्षात्कार भारतीय समाजाला होऊ लागला. १९९० नंतर आरक्षण हा विकास, प्रगती आणि उन्नतीचा मार्ग असल्याचा विश्वास लोकांमध्ये आला व पुढारलेल्या जातीसमूहालाही त्याचे आकर्षण अधिक वाटले व तेही आम्हांला आरक्षण हवे म्हणून मागणी करू लागले. एवढेच नव्हे तर महिला आरक्षणापर्यंत आरक्षणाची व्याप्ती वाढत गेली. आम्ही समान आहोत. परंतु धर्मांच्या, जातींच्या, वर्णाच्या व्यवस्थेत आम्हाला वंचित ठेवले. त्यासाठी आमच्या हक्काचे आम्हाला आरक्षण हवे ही मागणी महिलांमधून पुढे आली. हा सारा भाग बाबासाहेबांच्या विचाराचा व त्यांनी उभ्या केलेल्या खास व्यवस्थेचा होय.**

हा त्याला अपमान वाटला. याची प्रतिक्रिया म्हणून त्यांनीही मुलींना शिक्षण देण्यास सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब व त्यांच्या चळवळीचा हा प्रभाव होता. साहित्य क्षेत्रातही बाबासाहेब व त्यांच्या चळवळीचा मोठा प्रभाव राहिला. मराठी साहित्यात बाबासाहेबांच्या उदयानंतर एकदम कर्णाला चांगले दिवस आल्याचे दिसते. आंबेडकर अनुयायांनी तर दलित साहित्य-आंबेडकरी साहित्य म्हणून एक सांस्कृतिक चळवळच उभी केली. त्यातून आदिवासी साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य यांचा जन्म झाला. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा विसाव्या व एकविसाव्या शतकाचा नायक झाला. हा प्रभाव इतिहासात नोंद करण्याइतका महत्त्वाचा आहे.

**(लेखक हे राज्य शासनाच्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव आहेत.) संपर्क : ०९४२२२११६२०**

# पंचतीर्थे : वारसा अभिमानाचा

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र व राज्य सरकारांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या गौरवार्थ अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. बाबासाहेबांच्या जीवनाशी अनेक महत्त्वपूर्ण घटनांचा आणि स्थळांचा संबंध आहे, या घटना, ही स्थळे अनेकांसाठी प्रेरणादायी आहेत. यापैकी काही स्थळांचा विकास करण्याचे केंद्र व राज्य सरकारने ठरवले आहे. त्या स्थळांना 'पंचतीर्थे' म्हणून संबोधण्यात येणार आहे.**



**बबन जोगदंड**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या प्रज्ञावंताची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती देशभर साजरी होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबडेकर हे सर्वांसाठीच एक प्रेरणास्त्रोत, उर्जास्त्रोत असल्यानं दिवसेंदिवस त्यांच्या अनुयायांमध्ये वाढ होत चालली आहे. त्यांची जयंती केवळ भारतापुरतीच मर्यादित न राहता अनेक देशांत या महापुरुषाच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. प्रज्ञेचा सागर, ज्ञानाचा महासूर्य, समतेचा पुरस्कर्ता आणि दीन-दलितांचा उद्धारकर्ता अशी कितीतरी विशेषणे लावली तरी त्यांच्या कीर्तीपुढे फिकी पडतील. एवढी महानता डॉ. आंबेडकरांची होती. त्यांनी आपले संबंध आयुष्य विद्येसाठी खर्ची केल्याने कोलंबिया विद्यापीठाने त्यांचा पुतळा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारामध्ये बसवला. त्यांनी जिथे जिथे प्रवेश केला, त्यांचा जिथे जिथे स्पर्श झाला. त्या सर्व वास्तू पावन झाल्या आहेत.

महाराष्ट्रात डॉ. बाबासाहेब आंबडेकरांची अनेक स्मरणस्थळ आहेत. बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंगाच्या काही वास्तू साक्षीदार आहेत. त्यात त्यांचे जन्मगाव आंबडवे, ता. मंडणगड जि. रत्नागिरी, त्यांनी जिथं बौद्ध धम्माची दीक्षा घेतली ती नागपूरची दीक्षाभूमी, माणगाव ता. कोल्हापूर येथे घेतलेली माणगाव परिषद, महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, येवला जि. नाशिक येथे केलेली धर्मातरांची घोषणा, नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश, सातारा शाळेतील पहिलीचा प्रवेश त्यांनी सुरू केलेले औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालय, मुंबई येथील त्यांचे निवासस्थान राजगृह, पुण्यातील तळेगाव येथील त्यांचा बंगला, देहूरोड येथे स्थापन केलेली बुद्धमूर्ती. अशा कितीतरी स्थळांचा उल्लेख करता येईल. या स्थळांना अनेक जण आज श्रद्धेने भेट देऊन डॉ. आंबडकरांच्या स्मृती जाग्या करतात, त्यातून प्रेरणा घेऊन तिथे नतमस्तक होतात.

महाराष्ट्रातील या महत्त्वपूर्ण स्थळांव्यतिरिक्त आणखी काही विदेशातील स्थळेही डॉ. आंबेडकरांच्या सहवासाने पुनीत झाली आहेत, त्यामध्ये लंडन येथे शिकण्यासाठी डॉ. आंबेडकर ज्या बंगल्यात वास्तव्यास होते तो बंगला, कोलंबिया विद्यापीठ (न्यूयार्क) ग्रेज इन विद्यापीठ (जर्मनी) तर मध्यप्रदेशातील त्यांचे जन्मगाव महू, दिल्ली येथील २६ अलीपूर रोड येथील निवासस्थान आणि त्यांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर त्यांच्यावर अत्यंसस्कार करण्यात आलेले ठिकाण म्हणजे चैत्यभूमीही सर्व स्थळे बाबासाहेबांच्या अनुयायांसाठी अत्यंत महत्त्वाची ठिकाणे आहेत. महाराष्ट्रातल्या नागपूर येथील दीक्षाभूमी, येवला येथील मुक्तिभूमी, त्यांचे जन्मगाव आंबडवे 'स्फूर्तिभूमी' आणि मुंबई येथील चैत्यभूमीला दरवर्षी लाखोंचा जनसागर जमतो. या स्थळांचा विकास महाराष्ट्र सरकारने केला आहे. नुकताच नागपूर येथील दीक्षाभूमीला 'अ' वर्ग पर्यटनाचा दर्जा शासनाने दिला आहे. या सर्वच पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी देश-विदेशातून अनेकजण येत असतात.

जसजसे डॉ. आंबेडकरांचे विविध पैलू लोकांना समजत आहेत, तसतशी त्यांची कीर्ती चहुमुखी गाजत आहे. म्हणून अनेक देशातील लोक म्हणतात, आमच्या देशात डॉ. आंबेडकर जन्मायला हवे होते, एवढी मोठी इतर देशांनी दखल घ्यावी अशी क्रांती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात केली आहे.




**बाबासाहेबांनी सामान्यातल्या सामान्य माणसाला न्याय दिला. बाबासाहेब हे फक्त दलितांचे नव्हे तर जगातील सर्व शोषितांचे प्रेरणास्थान आहेत. त्यांनी देशाला संविधान दिले. त्यामुळे त्यांच्या या कार्याची प्रेरणा आणि त्याबाबतची माहिती नव्या पिढीला व्हावी, यासाठी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या पंचस्थळांचा विकास करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे.**

**- नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री**

या देशाचे संविधान सर्वश्रेष्ठ संविधान आहे. त्याचाही अनेक देश गौरवाने उल्लेख करतात आणि आपसूकच संविधानाचे निर्माते म्हणून डॉ. आंबेडकरांचे नाव पुढे येते. संबंध देश या महापुरुषाच्या जन्माला १२५ वर्ष पूर्ण झाल्यामुळे त्यांची शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती साजरी करीत असताना केंद्र सरकारने वर्षाआधीच डॉ. आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. केंद्र व राज्य सरकारने यासाठी समित्या नियुक्त केल्या आहेत. केंद्र सरकारच्या समितीचे अध्यक्ष खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आहेत. त्यांनी पाच महत्त्वपूर्ण स्थळांचा विकास करण्याचे ठरवले आहे. ती 'पंचतीर्थे' म्हणून नावारूपाला येणार आहेत. या माध्यमातून डॉ. आंबेडकरांचे कार्य, त्यांचे विचार नव्या पिढीसाठी एक अमूल्य ठेवा

ठरणार आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ एका विशिष्ट समूहासाठी काम केले नाही तर त्यांनी सर्व शोषित, पीडित, वंचित उपेक्षित या वर्गांबरोबरच या देशातील सर्व लोकांकरिता काम केले आहे. म्हणून ते सर्वांचे प्रेरणास्थान आहेत. शासनाने जी 'पंचतीर्थ' म्हणून विकसित करण्यासाठी स्थळे घेतली आहेत. त्यात १) महू मधील स्मारक, २) आंबडवे गाव, ३) दिल्ली येथील निवासस्थान, ४) इंदू मिल, ५) लंडन येथील घर यांचा समावेश आहे.



## इंग्लंडमधील घर # १

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उच्च शिक्षणासाठी काही देशात जावे लागले. ते ५ जुलै १९२० रोजी लंडनला ते उच्च शिक्षणाकरिता रवाना झाले. लंडनच्या स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पॉलिटिकल सायन्समध्ये त्यांनी एम.एस्सी.साठी प्रवेश मिळवला. त्या काळात अस्पृश्य समाजातील जन्म घेतलेला एकमेव विद्यार्थी या देशात शिक्षणाकरिता गेला होता. त्यांनी या संस्थेत एम. एस्सी. साठी प्रवेश मिळवला. तसेच ग्रेज इन या संस्थेतून बॅरिस्टरीचा अभ्यासही सुरू केला. लंडन विद्यापीठाने १९२१ मध्ये म्हणजे १ वर्षांनी त्यांना एम. एस्सी ही पदवी प्रदान केली. त्यानंतर त्यांनी पी.एच.डी.साठी 'द प्राब्लेम ऑफ रूपी' हा प्रबंध लंडन विद्यापीठात सादर केला. त्यानंतर त्यांना १९२२ मध्ये या विद्यापीठाने 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल केली.

डॉ. आंबेडकर १९२१ ते १९२२ अशी दोन वर्ष लंडनमध्ये किंग हेन्री या मार्गावर एका घरात राहत होते. याच घरात त्यांनी रात्र-रात्र जागून अभ्यास केला. प्रसंगी उपाशी, अर्धपोटी राहून आपला उदरनिर्वाह केला. हे घर आज एक ऐतिहासिक स्मारक झाले आहे. नुकतेच हे घर राज्य शासनाने ३५ कोटी रुपयाला खरेदी केले आहे. या घराला भेट देण्यासाठी अनेक जण इंग्लंडला जातात. या घराचे स्मारक करून इथेही डॉ. आंबेडकरांचा विचार सरकारला तेवत ठेवायचा आहे. आपल्या देशाव्यतिरिक्त परदेशातही डॉ. आंबेडकर यांच्या स्मृती प्रेरणास्थळ ठरल्या

## इंदू मिल # २

इंदू मिल ही मुंबईच्या दादरमध्ये आहे. याच भागात डॉ. आंबेडकरांचे 'राजगृह' हे निवासस्थान होते. त्यांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचे पार्थिव शरीर इथेच अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले. ७ डिसेंबर रोजी त्यांच्यावर दादर येथे अत्यंसंस्कार करण्यात आले. बाबासाहेबांचे निवासस्थान राजगृह आणि त्यांच्यावर अंत्यसंस्कार केलेले ठिकाण म्हणजे चैत्यभूमी हे दादर परिसरातच असल्याने ६ डिसेंबर रोजी त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी येथे मोठी गर्दी होते. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य असे स्मारक दादर येथील इंदू मिलच्या जागेवर व्हावे, अशी लाखो लोकांची अपेक्षा होती. म्हणून शासनाने या महापुरुषाच्या कर्तृत्वाची दखल घेऊन इंदू मिलची १२ एकर जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडरांच्या स्मारकासाठी दिली. नुकताच या स्मारकाचा पायाभरणी सभारंभ देशाचे प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. यावेळी मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होणार असून या स्मारकात स्मृती स्तूप, सभागृह, प्रेक्षकगृह, वास्तू संग्रहालय, ग्रंथालय, शोभिवंत बगिचा, वाहनतळ असणार आहे.



**इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे संकल्प चित्र.**

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत हे स्मारक होत असल्याने या स्मारकाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होणार आहे. बाबासाहेबांच्या कार्यकर्तृत्त्वाचा इतिहास पुढील पिढीला समजण्यासाठी हे स्मारक महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकेल. या नियोजित स्मारकाला भेट देण्यासाठी परेल या लोकल रेल्वे स्टेशनवरून जाता येईल.





**नवी दिल्ली येथे २१ मार्च २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकाच्या नियोजित प्रकल्पाची पाहणी करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी. सोबत केंद्रीय सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्री थावरचंद गेहलोत, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री विजय सांपला**

आहेत. कोलंबिया विद्यापीठाने 'द सिम्बॉल ऑफ' नॉलेज असे त्यांच्या पुतळ्याखाली लिहून ठेवले तर इंग्लंडच्या घरावर 'सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (१८९१–१९५६) यांनी १९२१–१९२२ या घरात वास्तव्य केले अशी अक्षरे कोरली आहेत.

## दिल्लीतील २६ अलिपूर रोड येथील निवासस्थान # ३

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बरेच काळ देशाची राजधानी दिल्ली इथे वास्तव्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा देशाचे कायदामंत्री बनले तेव्हा दिल्लीमधील २६ अलिपूर रोड येथील निवासस्थान त्यांना देण्यात आले. इथेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध विषयांवर लेखन केले. त्यामध्ये जो प्रसिद्ध ग्रंथ आहे तो 'बुद्धा अँड हिज धम्मा' बुद्ध और कार्ल मार्क्स,' यांचा समावेश आहे. तसेच अनेक सामाजिक, राजकीय चळवळीच्या संदर्भात बैठकाही याच निवास्थानी बाबासाहेबांनी बोलविलेल्या होत्या. बाबासाहेबांनी जीवनभर खूप परिश्रम घेतले अभ्यास, चिंतन, दौरे लेखन याला त्यांनी खूप वाहून घेतल्याने ते आजारी असायचे. त्यांना 'शुगर'ही होती. अचानकपणे वयाच्या ६५व्या म्हणजेच ६ डिसेंबर १९५६ रोजी रात्री झोपेतच डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. त्यांच्या निधनाची वार्ता दुपारी आकाशवाणीवरून संबध देशभर पसरली. त्यांच्या निधनाने भारतीय समाजाचे ह्रदय हेलावले. अनेकांना खूप दु:ख झाले. दलित समाज तर पुरता शोकसागरात बुडाला. दीनदलितांच्या उद्धाकर्त्याचा अस्त झाल्याने अनेकांनी २६ अलिपूर रोड गाठून त्यांचे अत्यंदर्शन घेण्यासाठी रीघ लावली. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू त्यांच्या निवासस्थानाकडे गेले. पंडित नेहरू हे बाबासाहेबांना मत्रिमंडळातील सर्वांत हुशार, ज्ञानी मंत्री म्हणून संबोधत असत. डॉ. आंबेडकरांनी महाराष्ट्रात विशेषत: मुंबईत अधिक वास्तव्य केल्याने व महाराष्ट्राचे ते मूळ रहिवासी असल्याने त्यांच्यावर मुंबईत अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला. अत्यंदर्शनासाठी त्यांचे शव खास विमानाने मुंबईला नेण्यात आले. त्यांच्यावर दादर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या अत्यंसंस्काराला महाराष्ट्र व देशातील त्यांचे लाखो चाहते उपस्थित होते. मुंबईने पहिल्यांदाच एवढी विशाल अत्यंयात्रा अनुभवली. आज जिथे डॉ. आंबेडकरांवर अत्यंसंस्कार झाले ती जागा 'चैत्यभूमी' म्हणून प्रसिद्ध आहे. ६ डिसेंबर रोजी त्यांच्या महापरिनिर्वाणदिनी लाखो चाहते त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी येथे येतात.

दिल्ली येथील २६ अलिपूर रोड या स्थळाला डॉ. आंबेडकरांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याने हा त्यांचा बंगला एक ऐतिहासिक स्मारक ठरला आहे. या स्थळांचा केंद्र सरकारने आणखी विकास करण्याचे ठरविले आहे. इथे जाण्यासाठी दिल्ली मेट्रो आहे. दररोज सकाळी ९ ते रात्री ६ वाजेपर्यंत विधानसभा मेट्रो स्टेशनपर्यंत ट्रेनने जाऊन या ऐतिहासिक स्थळाला भेट देता येईल.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जन्मभूमी असलेल्या महू येथे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे.**

## महू – (डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जन्मस्थळ) # ४

डॉ. बाबासाहेबांचे वडील रामजी सपकाळ यांनी पुण्यात आपले शिक्षण पूर्ण केले. पंतोजी शाळेमध्ये ते होते. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लष्करामध्ये शिक्षक म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. नंतर शाळेत ते प्रधान शिक्षक झाले. त्यानंतर त्यांना मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळाली. १४ वर्षे मुख्याध्यापकाचे काम सांभाळल्याने त्यांना सैन्यात मेजर (सुभेदार) म्हणून बढती मिळाली. नंतर ते महू इथे नोकरी निमित्त वास्तव्यास होते. कारण महूला (चहु) मिलीटरी हेडक्वार्टर्स ऑफ वॉर म्हणून ओळखले जाई. तेथेच डॉ. बाबासाहेबांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये झाला.

भीमाबाई यांच्या पोटी जन्म घेणारे डॉ. बाबासाहेब हे १४ वे अपत्य होते. भीमाबाई यांचे पुढे बाबासाहेबांच्या बालपणीच निधन झाले. (भीमाबाईची समाधी सातारा इथे आहे.) बाबासाहेबांचे नाव 'भीम' असे ठेवण्यात आले. नंतर 'भीम' यांचे भीमराव आणि भीमराव यांना नंतर लोक आपले 'बाबा' संबोधू लागले आणि नंतर ते सर्वांचे बाबासाहेब झाले. या भिमाचा सांभाळ डॉ. आंबेडकरांची आत्या मिराबाई हिने केला. हा भीम बुद्धिवान व्हावा, त्यांने दीनदलित समाजाचा उद्धार करावा अशी पिता रामजी सुभेदार यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी लहाणपणीच बाळ 'भीम' यांच्यावर पाच मूल्यसंस्कार रुजवले होते. त्यामध्ये १) शिक्षण, २) शिस्त, ३) स्वावलंबन, ४) स्वाभिमान, ५) कठोर परिश्रम. या मूल्यांचा बाबासाहेबांनी आपल्या जीवनात अंगीकार केला आणि त्यानुसार वाटचाल केली आणि पुढे हा 'भीम' या देशातील दीनदलितांचा उद्धारकर्ता, भारतीय राज्यघटनेचा निर्माता ठरला.

म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मस्थळाला म्हणजे 'महू'ला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. महू इथे लाखो पर्यटक दरवर्षी भेट देऊन बाबासाहेबांच्या जन्स्थळाला वंदन करीत असतात. महू इथे बाबासाहेबांच्या जन्मस्थळावर शासनाने यथोचित स्मारक उभे केले आहे. हे स्मारक एक चैतन्याचा झरा आहे.



**महू येथे कसे जाल?**

मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ येथून दोन ते तीन तासांच्या अंतरावर व इंदौर येथून २० किलोमीटरच्या अंतरावर महू आहे.

## आंबडवे # ५

प्रत्येकालाच आपल्या गावाचा अभिमान वाटतो. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील संस्मरणीय स्थळ म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबडवे हे गाव होय. अतिशय कमी लोकवस्ती असलेले हे बाबासाहेबांच्या पूर्वजांचे गाव. इथे सपकाळ कुटुंबीय वास्तव्य करून राहते. या सपकाळ घराण्यातीलच डॉ. आंबेडकर. खरे तर त्यांच्या आडनावाची कहाणी मोठी रंजक आहे. बाबासाहेबांचे आडनाव सपकाळ. नंतर त्यांच्या वडलांनी बाबासाहेबांचे आडनाव सातारा येथील प्रतापसिंह शाळेत आंबाडवेकर असे ७ नोव्हेंबर १९०० रोजी नोंदवले. आजही ७ नोव्हेंबर हा शाळा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा 'शाळा प्रवेश दिन' म्हणून साजरा होतो. कारण आजही शाळेत बाबासाहेबांचे नाव नोंदवलेले रजिस्टर आणि त्यांची स्वाक्षरी पाहावयास मिळते. या शाळेत त्यांना शिकवण्यासाठी आंबेडकर नावाचे शिक्षक होते. त्यांचे बालभीमावर खूप प्रेम होते. कारण बाबासाहेब लहाणपणापासून खूप चाणाक्ष, अभ्यासू आणि संस्कारक्षम विद्यार्थी होते म्हणून ते सातत्याने भीमाला जीव लावत असत. प्रसंगी त्यांना खाण्यासाठी घरून भाजी भाकरी आणत. शाळेच्या दप्तरात नोंदवलेले आंबडवेकर हे आडनाव उच्चारताना त्यांना ते आडनीड वाटत असे म्हणून माझे आंबेडकर हे नाव तू धारण कर, त्यांनी असे भीमाला सुचविले. त्याला बाळ भीमाने लगेच होकार दिला आणि बाबासाहेबांचे आडनाव आंबडवेकराचे आंबेडकर झाले. तशी नोंद शाळेत झाली. तेव्हापासून बाळ भीमाचे नाव आंबेडकर झाले. इथे पुण्याच्या अशोक सर्वांगीण विकास संस्थेने अशोक स्तंभ आणि शीलालेख उभारून त्याला स्फूर्तिभूमी असे नावे दिले आहे. असे आंबाडवे हे डॉ. बाबासाहेबाचे गाव त्यांच्या आडनावामुळे आणि त्यांच्या मूळगावामुळे जगाच्या नकाशावर प्रसिद्ध आहे. आता हे गाव खा. अमर साबळे यांनी दत्तक घेऊन या त्यांच्या मूळ गावाचा विकास हाती घेतला आहे. आंबडवे रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड या तालुक्याच्या ठिकाणापासून १७ किलोमीटर अंतरावर आहे.



रत्नागिरी जिल्ह्यातील आंबडवे

डॉ. आंबेडकरांशी संबंधित या पाचही स्थळांना 'पंचतीर्थे' म्हणून घोषित करून या स्थळांचा विकास करण्याचा सरकारने जो संकल्प केला आहे. तो अत्यंत अभिनंदनीय स्वरूपाचा आहे. डॉ. आंबेडकरांच्या स्मृती, त्यांच्या आठवणी भावी पिढीच्या हृदयात कोरवयाच्या असतील तर ही 'पंचतीर्थे' मोलाची भूमिका पार पाडू शकतील, यात शंकाच नाही!

**(लेखक हे यशदा संस्थेत संशोधन अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)**
**संपर्क : ०९८२३३३८२६६**

# अलौकिक आणि दुर्मीळ

समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्याय या नीतिमूल्यांच्या आधारे भारतीय संविधानाची निर्मिती करून देशाच्या सर्वांगीण विकासात सिंहाचा वाटा असल्यामुळे आणि भारताला अखंड, सार्वभौम प्रजासत्ताक लोकशाही राष्ट्र अशी ओळख करून दिल्यामुळे डॉ. बाबासाहेब जगाचे आकर्षण बनले आहेत. विषमतेचा ज्वालाग्नी शांत करणाऱ्या दयासागराने क्रांतीची मशाल हातात घेऊन मानवतेवरील कलंक पुसून टाकला. जातिवादी वर्णभेदामुळे शाळेच्या बाहेर बसणाऱ्या महामानवाने या देशाचे संविधान लिहिले हे एक आश्चर्यच म्हणावे लागेल.

**अपार कष्ट**

कोलंबिया विद्यापीठात असताना डबल एमए व पी.एच.डी.चे शिक्षण पूर्ण करण्यास साडे आठ वर्षे लागत होती ते शिक्षण पूर्ण करत असताना कधी अर्धपोटी, कधी उपाशी राहून १८-१८ तास अभ्यास करून फक्त अडीच वर्षात ते शिक्षण डॉ. बाबासाहेबांनी पूर्ण केले. कोलंबिया, लंडन, उस्मानिया या विश्वविख्यात विद्यापीठांमध्ये अतिमहत्त्वाच्या विषयावर विद्वत्ताप्रचुर संशोधन करून जागतिक स्तरावर आपल्यातील सर्वोच्च गुणवत्ता सिद्ध केली. अथक परिश्रमामुळे मिळवलेल्या पदव्यांपैकी डी.एस.सी. ही पदवी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथून प्राप्त करणारे आजपर्यंतचे एकमेव भारतीय विद्यार्थी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. हा विक्रम अद्याप कोणीही मोडलेला नाही. लंडनमधील या संस्थेने डॉ. बाबासाहेबांच्या स्मरणार्थ त्यांचा पुतळा उभारून त्यांच्या नावे अभ्यासकेंद्रही सुरू केले आहे. संविधान निर्मिती या अतुलनीय कार्याची पावती म्हणून कोलंबिया विद्यापीठाने द्विशतक सांवत्सरिक या उत्सवाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एल.एल.डी.ही बहुमानाची पदवी ५ जून १९५२ रोजी प्रदान केली. भारतीय घटनेचे शिल्पकार, मंत्रिमंडळाचे सदस्य आणि राज्यसभेचे सदस्य, भारतीय नागरिकांपैकी एक प्रमुख नागरिक, एक महान सुधारक आणि मानवी हक्कांचा आधारस्तंभ असणारा पराक्रमी पुरुष असे कोलंबिया विद्यापीठाने त्यांना दिलेल्या मानपत्रात गौरवले आहे. शिवाय कोलंबिया विद्यापीठ स्थापनेच्या दोनशे पन्नास वर्षातील सर्वोच्च हुशार विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये नंबर एकवर डॉ.बाबासाहेबांचे नाव असून विद्यापीठाने त्यांच्या सन्मानार्थ त्यांचा पुतळा उभारून त्यावर 'सिम्बॉल ऑफ नॉलेज' असे सुवर्णाक्षरात लिहिले आहे. कोलंबिया विद्यापीठात शिक्षण घेताना एकदा पंजाब केसरी लाला लजपतराय यांनी कुतूहलाने`प्रा. सेलिग्मन यांना विचारले की, ग्रंथालयात सर्वात प्रथम येणारा आणि सर्वात शेवटी बाहेर पडणारा हा पुस्तकवेडा विद्यार्थी कोण आहे? त्यावर उत्तरादाखल बोलतांना प्रा.सेलिग्मन लाला लजपतराय यांना मोठ्या अभिमानाने सांगतात की, केवळ हिंदी विद्यार्थ्यांमध्येच नव्हे तर संपूर्ण अमेरीकन विद्यार्थ्यांमध्ये देखील भीमराव आंबेडकर हा सर्वोच्च हुशार विद्यार्थी आहे.



**एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतात नवा इतिहास निर्माण करणारे बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त भारत सरकारसह महाराष्ट्र शासन आणि विविध संघटनांच्या माध्यमातून सगळीकडे कार्यक्रमांची रेलचेल चाललेली आहे. तथागत बुद्ध आणि चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्यानंतर भारत देश व जगासमोर न भूतो न भविष्यती अशा कार्यकर्तृत्वामुळे परिवर्तनाचे दिशादर्शक म्हणून डॉ.बाबासाहेबांकडे पाहिले जात आहे. भारतातील तत्कालीन विषमतावादी व्यवस्थेने डॉ.बाबासाहेबांना पदोपदी अपमान करून खूप छळले ; परंतु जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हिम्मत न हरता इथल्या व्यवस्थेला बदलवून केवळ अस्पृश्य समाजावरच नव्हे तर, त्यांनी देशावरसुद्धा अनंत उपकार केले आहेत.**

**नागसेन कांबळे**

**चतुरस्र**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविधांगी प्रचंड कार्यामुळे जगातील लोक त्यांना बोधिसत्त्व, कायदेपंडित, घटनाकार, इतिहासकार, अर्थतज्ज्ञ,

शिक्षणतज्ज्ञ, राजकीय मुत्सद्दी, पत्रकार, महान समाजसुधारक, उत्कृष्ट संसदपटू अशा चतुरस्र भूमिकांमधून पाहतात. उच्च शिक्षण आणि शैक्षणिक क्षेत्रातील त्यांचे योगदान आजही भारतीयांसह विदेशी लोकांनासुद्धा प्रेरणा देते. भारतातील ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात आपल्यातील परखड व बुद्धिवादी वक्तृत्वामुळे त्यांनी अनेकदा ब्रिटिशांनादेखील हादरून सोडले होते. मी प्रथम भारतीय आणि अंतिमही भारतीय असे सांगणारे डॉ.बाबासाहेब इथल्या जाचक अन्यायाविरुद्ध लढताना वैतागून म्हणतात, मला मातृभूमीच नाही. खरं तर असे म्हणण्यास त्यांना भाग पाडणारी येथील प्रस्थापित व्यवस्था म्हणजे भारताला लागलेली जातीयतेची कीड आहे.

## अनंत उपकार

सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या डॉ.बाबासाहेबांनी इथल्या समाजरचनेत आमूलाग्र बदल घडवून भारतावर सर्वार्थाने अनंत उपकार केले आहेत. त्यांची धर्मांतराची भूमिका पाहिली तर त्यांनी १९३५ पर्यंत हिंदू धर्मातील मानवनिर्मित्त अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा, जातिभेद संपवण्यासाठी परिवर्तनाची लढाई लढली. परंतु त्यात त्यांना अपयश आल्यामुळे त्यांनी येवला येथे धर्मपरिवर्तनाचे रणशिंग फुंकले. परंतु धर्मपरिवर्तनाच्या भूमिकेमुळे देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला धक्का लागणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेऊन, इथल्याच मातीतला विश्वशांती आणि बंधुत्वाची शिकवण देणारा बुद्ध धम्म स्वीकारून; भारताला त्यांनी सम्राट अशोकांची दूरदृष्टी प्रदान केली आहे.

चातुर्वर्ण्य व्यवस्थेमुळे जरी त्यांना इथे दुर्लक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला गेला असता तरीही सुडाची किंवा बदलाची भावना त्यांनी मनाला शिवू दिली नाही. आचार्य अत्रेंशी बोलताना एकावेळी ते म्हणतात, जर मला हिंदू धर्माचा सूड घ्यावयाचा असता तर मी या देशाचे पाच वर्षात वाटोळे करू शकतो, परंतु देशाच्या इतिहासात मला विध्वंसक म्हणून माझे नाव नोंदवायचे नाही. भारतीय स्त्रियांना 'चूल आणि मूल' यातून मुक्त करण्यासाठी 'हिंदू कोडबिल' तयार करणारे डॉ. बाबासाहेब आहेत हे वाचून त्यांचे अंत:करण किती मोठे होते याची जाणीव होते.

## दीनदुबळ्या लोकांची भीमाई

ज्या मनुस्मृती ग्रंथाच्या आधारे छत्रपती शिवाजी महाराजांना शूद्र घोषित करून त्यांच्या राज्याभिषेकाला विरोध करून महाराजांचा अपमान केला त्याच अपमानाचा बदला म्हणून की काय डॉ. बाबासाहेबांनी रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या महाड येथे २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती जाळली. नैसर्गिक पाणी पिण्याचा अधिकार केवळ अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे ज्यांच्या वाट्याला आला नव्हता, मुक्त संचार हा ज्यांना अधिकार नव्हता, पशुप्राण्यांपेक्षाही हीन दर्जाचे जीवन ज्यांना बळजबरीने जगावे लागत होते अशा दीनदुबळ्या लोकांची भीमाई बनून आंधळ्यांना डोळे, लुळ्या-पांगळ्यांना हातपाय, बहिऱ्यांना कान अन् मुक्यांना वाचा फोडणारे दुसरे तिसरे इथे कुणीही नसून ते फक्त आणि फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरच आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि न्याय या नीतितत्त्वांना संविधानात अंतर्भूत करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण देशावरच उपकार केले आहेत. ब्रिटिश भारतातील प्रांतिक अर्थव्यवस्थेची उत्क्रांती हा ग्रंथ १९२५ ला लंडनच्या प्रकाशकांनी प्रकाशित केला. या ग्रंथामध्ये ब्रिटिशांवर प्रखर टीका करून आपण खरे देशभक्त असल्याचे डॉ. बाबासाहेबांनी सिद्ध केले आहे.

**अलौकिक व्यक्तिमत्त्वाचे धनी असणाऱ्या डॉ.बाबासाहेबांचा जगभरात गौरव होत आहे. CNN, IBN7, HISTORY TV18 या वृत्त वाहिन्यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमात वीस कोटी लोकांनी GREATEST INDIAN म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची निवड करून त्यांचा सन्मान केला. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने जग घडवणाऱ्या शंभर अलौकिक महापुरुषांची जी यादी तयार केली त्यातही जागतिक महापुरुषांमध्ये एक नंबरवर तथागत बुद्ध, दोन नंबरवर वर्धमान महावीर, तीन नंबरवर चक्रवर्ती सम्राट अशोक तर चार नंबरवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन त्यांचा मोठा गौरव केला आहे.**







**(लेखक हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस आहेत.)**
**संपर्क : ०९८१९४९०८६८**

# शेतकऱ्यांसाठी २५ हजार कोटी



विधिमंडळामध्ये अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी राज्याचे वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार व वित्त राज्यमंत्री दीपक केसरकर यांना शुभेच्छा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी उपाययोजना होतील आणि भविष्यात त्यातून स्वयंपूर्ण कृषिव्यवस्थेला चालना मिळेल, अशा प्रकारचा शेतकऱ्यांना केंद्रबिंदू ठरवलेला महत्त्वाकांक्षी अर्थसंकल्प वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सादर केला. केंद्रीय अर्थसंकल्पाप्रमाणेच या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राथमिकता देण्यात आली असून २५ हजार कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या सर्वंकष विकासाला चालना देणारा अलीकडच्या काळातील उत्तम नियोजनाचा अर्थसंकल्प म्हणून अर्थतज्ज्ञांनी याचे कौतुक केले आहे.**

**डॉ. सुरेखा म. मुळे**

**एकच आशा उरात माझ्या, एकच आहे ध्यास**
**लाखांचा पोशिंदा त्याला घडू नये उपवास**
**शर्थ करेन मी, जीवास माझ्या पडो कितीही त्रास**
**देईल माझ्या बळीराजाला, मी स्वाभिमानाचा घास**

वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत या ध्येयातून राज्य अर्थसंकल्पाची मांडणी सुरू केली आणि जल्लोषातच त्याचं स्वागत झालं. त्यांच्या प्रत्येक शब्दातून व्यक्त होत असलेली भावना त्यांच्या ध्येयाची दिशाच स्पष्ट करत होती..

वित्तमंत्र्यांनी सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. या अर्थसंकल्पातून त्यांनी दीन, दुर्बल, शोषित,पीडित, अंध, अपंग, निराधार, विधवा, परित्यक्ता, दलित, आदिवासी या सर्व घटकांच्या विकासाचा निर्धार व्यक्त केला..

## ठळक वैशिष्ट्ये : दुष्काळ निवारण

- पीक विमा योजनेसाठी १,८५५ कोटी रुपये
- शेततळी,विहिरी, विद्युत पंप जोडणी यासाठी २००० कोटी रुपये
- १ लाख शेततळी, ३७,५०० विहिरी आणि ९० हजार विद्युत पंपाच्या जोडणी उपलब्ध करून देणार
- ६,८६२ मालगुजारी तलावाचे नूतनीकरण
- पालकमंत्री पांधण रस्ते योजना. पांधण रस्ता दुरुस्तीची कामे ग्रामीण युवकांना

## कृषी

- शेतकऱ्यांना अल्प व्याजदराने पीक कर्जासाठी ११० कोटी रुपयांचा नियतव्यय
- तेलबिया आणि कडधान्याच्या उत्पादकतेत वाढीसाठी राष्ट्रीय कृषी विकासातून ८० कोटी रु.
- कृषी प्रक्रिया उद्योगासाठी प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के किंवा ५० लाख रुपयांपर्यंत अनुदान
- पंडित दीनदयाळ उपाध्याय कृषी मार्गदर्शक योजनेसाठी नव्याने ६० कोटी रुपये प्रस्तावित
- बुलडाणा-अहमदनगर जिल्ह्यात शासकीय कृषी महाविद्यालये. जळगाव जिल्ह्यात शासकीय उद्यान विद्या महाविद्यालय
- जळगाव आणि अकोला येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय
- शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणारी नवीन कृषी गुरुकुल योजना
- प्रत्येक जिल्ह्यात कृषी महोत्सव








## राज्याच्या विकासदराची ८ टक्क्यांवर झेप

**राज्यावरील आर्थिक संकट आणि आव्हाने नजरेसमोर ठेवून त्यावर प्रभावी उपाय ठरू शकणारा अतिशय प्रगतिशील असा अर्थसंकल्प अर्थमंत्र्यांनी सादर केला आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे राज्याच्या कृषी व ग्रामविकासाला नवी दिशा असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. 'राज्याच्या विकासदराने ५.८ टक्क्यांवरून ८ टक्क्यांवर झेप घेतली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही विकासाचा दर वाढला हे राज्य सरकारच्या उत्तम नियोजन आणि प्रामाणिक प्रयत्नांचे फलित आहे. अर्थसंकल्पात कृषी व ग्रामविकासाबरोबच पायाभूत सुविधांसाठीही भरीव तरतुदी करण्याचे आव्हान पेलण्यात आले आहे. राज्यावरील दुष्काळाच्या सावटामुळे कृषिक्षेत्रासमोर विविध आव्हाने निर्माण झाली आहेत. ही आव्हाने डोळ्यासमोर ठेवून कृषी व कृषिपूरक क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पात २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ती अत्यंत महत्त्वाची असून यातून कृषी क्षेत्राशी निगडित अनेक नावीन्यपूर्ण योजना राबवता येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.**

- राज्यातील ४ कृषी विद्यापीठात सेंद्रीय शेती संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राची स्थापना
- राज्यातील २ हजार ६५ महसूलमंडळस्तरावर स्वंयचलित हवामान केंद्रे

### पशुसंवर्धन

- दुग्धविकास प्रकल्प उभारण्यासाठी शेतकऱ्यांची उत्पादक कंपनी स्थापणार, १०० कोटी रुपयांची तरतूद
- १४ जिल्ह्यांत सघन कुक्कूट विकास गट स्थापणार
- गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र योजनेद्वारे स्वंयसेवी संस्थांमार्फत राज्यातील ३४ ग्रामीण जिल्ह्यांत भाकड गायी व गोवंश संवर्धन कार्यक्रम



- किनारपट्टीवरील ५ जिल्ह्यांत जेट्टी बांधणी कार्यक्रम, ससून गोदी बंदराच्या नुतनीकरणासाठी १५ कोटी रुपये

### सिंचन

- सिंचन प्रकल्पांसाठी ७,८५० कोटी रुपये
- प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेत समाविष्ट ७ प्रकल्पांसाठी २ हजार ७८ कोटी रुपये
- समाजात जलसाक्षरता वाढविण्यासाठी यशदा, पुणे येथे कायमस्वरूपी केंद्र तर चंद्रपूर, औरंगाबाद, अमरावती येथे उपकेंद्रे



### ग्रामविकास

- मुख्यमंत्री रस्ते ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याचा दर्जा सुधारणे, नवीन रस्ते जोडण्यासाठी ५०० कोटी रुपये
- गावांच्या विकासासाठी 'स्मार्ट गाव' ही नवीन योजना प्रस्तावित
- शासननिर्णयांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी यासाठी ग्रामपंचायतीमध्ये डिजिटल बोर्ड बसवणार
- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रामीण आणि दुर्गम भागातील पाणी समस्या सोडवणार– ५०० कोटी रुपयांची तरतूद
- बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत व महिला सक्षमीकरण अभियानाद्वारे ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण
- सुमतीताई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण या नवीन योजनेद्वारे महिलांच्या स्वयं साहाय्यतागटांना शून्य टक्के व्याजदराने कर्ज.



### वीजनिर्मिती

- वीज निर्मिती प्रकल्पांसाठी ७८४ कोटी रुपयांचा निधी
- वीज वितरण प्रणाली सुधारण्यासाठी पायाभूत आराखडा योजनेंतर्गत २४० नवीन उपकेंद्रे उभारणार
- नवीन व नवीकरणीय ऊर्जास्रोतांची क्षमता वाढवण्यासाठी ४५६ कोटी रुपयांचा निधी
- विदर्भ– मराठवाड्यात नव्याने येणाऱ्या उद्योगांना वीजदरात सवलत. १ हजार कोटी रुपयांची तरतूद

### कौशल्यविकास

- शासनाच्या औद्योगिक धोरणांतर्गत ११ लाख २३ हजार थेट रोजगार निर्मिती
- विशाल प्रकल्प धोरणांतर्गत ५३ हजार ३३० कोटी २५ लाखांची गुंतवणूक. ८५ हजार प्रत्यक्ष रोजगाराची निर्मिती
- मुद्रा बँक योजनेचा लाभ जास्तीत जास्त तरूणांना व्हावा, यासाठी जिल्हास्तरावर समित्या
- महाराष्ट्र उद्योजकता परिषदेची स्थापना

### पायाभूत सुविधा आणि रस्ते विकास

- रस्ते बांधणीसाठी ४०५० कोटी रुपये
- २१ हजार कि.मी लांबीचे रस्ते पुढील आठ वर्षात सुधारणार
- राज्य महामार्गावर महिलांसाठी ४०० स्वच्छतागृहे
- मिहान प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसानासाठी २१६ कोटी रुपये



**''वित्तमंत्री म्हणून हा अर्थसंकल्प मी मांडत असलो तरी यातील भावना आणि अपेक्षा या राज्यातील कान्याकोपऱ्यात वसलेल्या सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. राज्यातील शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सक्षम शेतकरी आणि समृद्ध ग्रामीण क्षेत्र हाच 'मेक इन इंडिया'चा पाया आहे. शेतकरी जगला तरच राज्याची अर्थव्यवस्था सक्षम होऊ शकेल ही बाब विचारात घेऊन, राज्य अर्थसंकल्पात कृषी क्षेत्र आणि शेतकऱ्यांच्या विविध योजनांसाठी सुमारे २५ हजार कोटी रुपयांची भरीव तरतूद करत आहे.'' - सुधीर मुनगंटीवार, वित्त व नियोजन मंत्री**

## सर्वांना घरे

- सर्वांसाठी घरे २०२२ या केंद्र पुरस्कृत योजनेसाठी ७०० कोटी रुपये
- नवीन चंद्रपूर शहराच्या विकासासाठी १०० कोटी रुपये
- स्वातंत्र्य सैनिकांना किंवा त्यांच्या पत्नीला राहत्या घरासाठी १० लाख

## नगरविकास

- महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी १ हजार कोटी रुपये
- नागपूर व पुणे मेट्रो प्रकल्पाला गती देण्यासाठी १८० कोटी रुपये
- मुंबई मेट्रो ३ प्रकल्पासाठी ९० कोटी ४७ लाख रुपये
- ८ शहरांचा स्मार्ट सिटी म्हणून विकास
- मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, कल्याण, डोंबिवली या शहरांमधून केवळ महिलांसाठी तेजस्विनी बसेस

## आरोग्य

- राष्ट्रीय आरोग्य अभियानासाठी ९७० कोटी रुपये
- शहरी आणि ग्रामीण भागात आरोग्य सेवांच्या बांधकामासाठी २३३ कोटी रुपये
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेसाठी ३०० कोटी रुपये

## शिक्षण व क्रीडा

- सर्वशिक्षा अभियानासाठी ७४० कोटी रुपये, संगणक प्रशिक्षण कार्यक्रमासाठी १८० कोटी रुपये
- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी १३७ कोटी ४४ लाख रुपये
- मुलींच्या वसतिगृहासाठी ५० कोटी रुपये

- ४३ सार्वजनिक ग्रंथालयांचे ई ग्रंथालयात रूपांतर



## सुरक्षा व वाहतूक

- पोलिसांना घरे उपलब्ध करून देणार- ३२० कोटींची तरतूद
- सीसीटीव्ही प्रकल्पासाठी ३५० कोटी रुपये
- पनवेल, मुंबई, पुणे, सांगली यासह एकूण १३ बसस्थानकांचे आधुनिकीकरण
- परिवहन महामंडळाच्या ३५०० निवाऱ्यांची पुनर्बांधणी
- मांडवा येथे रो-रो पायाभूत सेवा आणि लाट प्रतिबंधक भिंत

## न्यायालयांकरिता

- न्यायालयाच्या इमारती व न्यायाधीशांची निवासस्थाने बांधण्यासाठी ४९१ कोटी रुपये



## वन व पर्यावरण

- राज्यातील ६ व्याघ्रप्रकल्पातील ६५ गावांचे पुनर्वसन- ६० कोटी रुपयांची तरतूद
- निसर्गपर्यटनाला चालना. तिवर संवर्धन प्रतिष्ठानच्या माध्यमातून कांदळवनांचे संरक्षण
- राज्यातील चंद्रभागा नदी २०२२ पर्यंत प्रदूषणमुक्त करून तिचे संवर्धन करण्यासाठी नमामी चंद्रभागा अभियान
- १ जुलै २०१६ रोजी कृषि दिन व वनमहोत्सवाचे औचित्य साधून एकाच दिवशी २ कोटी झाडे लावणार

## पर्यटन व सांस्कृतिक कार्य

- पर्यटनस्थळी पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी २८५ कोटी रुपये
- औरंगाबाद जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित. जिल्ह्यातील म्हैसमाळ, वेरुळ, खुलताबाद, सुलीभंजन या पर्यटनस्थळांच्या विकासावर विशेष लक्ष

## आदिवासी विकास- सामाजिक न्याय- अल्पसंख्याक विकास

- आदिवासी उपयोजनांतर्गत नामांकित शाळा प्रवेशासाठी २९० कोटी रु.
- रस्ते विकासासाठी ३०० कोटी रुपये
- आश्रमशाळा बांधकामासाठी ३७० कोटी रुपये
- वारली कलेचे जतन आणि संवर्धनासाठी वारली हाट - ६० कोटी रुपयांचा निधी

## महिला सक्षमीकरण

- **राज्यात १ एप्रिल २०१६ पासून माझी कन्या भाग्यश्री योजनेची अंमलबजावणी**
- **राज्यातील १० हजार अंगणवाड्या आदर्श करणार- १०० कोटी रुपयांची तरतूद**
- **अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यासाठी २ लाख रुपयांपर्यंत जीवनविमा आणि २ लाख रुपयांपर्यंत अपघात विमा. विमा हप्त्याची रक्कम राज्य शासन देणार**






## विकासाची नवी दिशा

''कृषी आणि ग्रामविकासावर भर देतानाच कठीण काळातही पायाभूत सुविधांसाठी तरतूद करण्यात आली आहे, हे या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट्य आहे.

राज्यावरील आर्थिक बोजा नजरेसमोर ठेवून त्यावर उपाय ठरू शकणारा प्रगतिशील अर्थसंकल्प महाराष्ट्रासाठी तयार करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प म्हणजे राज्याच्या कृषी व ग्रामविकासाला नवी दिशा देणारा आहे. शेतकरी हा ग्रामीण विकासाचा केंद्रबिंदू या अर्थसंकल्पात मांडण्यात आला असून ग्रामीण भागाच्या सर्वंकष विकासाबरोबरच शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या अर्थसंकल्पाने राज्याला विकासाची नवी दिशा मिळणार आहे. या अर्थसंकल्पात शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाचा यात प्राधान्याने विचार करण्यात आला असून मराठवाडा व विदर्भाच्या दुष्काळी परिस्थितीची दखलही प्रामुख्याने घेण्यात आली आहे. स्मार्ट ग्राम योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी विशेष तरतूद करताना या योजनेंतर्गत निवड झालेल्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहनपर बक्षिसे यापुढे देण्यात येणार आहेत. ग्रामीण पातळीवर राबवल्या जाणाऱ्या शासकीय योजनांची माहिती जनतेला व्हावी यासाठी ग्रामपंचायतमध्ये डिजिटल बोर्ड बसवण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे. जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, कृषिपंपाचे अनुशेष निर्मूलन, पालकमंत्री पांदण रस्ते योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री पाणी पुरवठा योजना, स्मार्ट अंगणवाडी योजना यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे काम होणार आहे. 'मेक इन महाराष्ट्र' कार्यक्रमांतर्गत मराठवाडा आणि विदर्भाच्या विकासावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या हिताचा आणि राज्यासमोरील आव्हानांना उत्तर देणारा असा समतोल अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.''



वित्त राज्यमंत्री दीपक केसरकर

**शब्दांकन : वर्षा फडके, विभागीय संपर्क अधिकारी**

- संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेच्या अनुदानात १ एप्रिल २०१६ पासून वाढ. ३३२ कोटी रुपयांचे दायित्व शासन स्वीकारणार
- अल्पसंख्याक विकासाच्या विविध योजना राबविण्यासाठी ४०५ कोटी रुपयांचा निधी
- अनुसूचित जातीच्या कुटुंबांना घरकूल योजनेचा लाभ देण्यासाठी ३२० कोटी रुपये
- आदिवासी युवकांसाठी एकलव्य क्रीडा व उद्योजकता प्रबोधिनी उभारण्यासाठी – २५ कोटी रुपये
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना विहीर खोदण्यासाठी २ लाख अनुदान तसेच विद्युत पंप बसवून ग्रीडमधून शक्य नसल्यास सौर ऊर्जेतून वीज पुरवठा
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्ताने समता आणि सामाजिक न्याय वर्ष साजरे करण्यासाठी १७० कोटी रुपये
- शासकीय वसतिगृहाच्या बांधकामासाठी २२० कोटी रुपये

### सुशासन

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत १५६ सेवा ऑनलाइन
- शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार निधीतून अधिस्वीकृतीधारक पत्रकारांच्या कुटुंबालाही दुर्धर आजारासाठी आर्थिक मदत. मुदतठेवीत वाढ करून ती १० कोटी रुपये इतकी करणार



### स्मारके

- **महाराष्ट्राबाहेर इतर राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी ५ कोटी रुपये**
- **सार्वजनिक गणेश मंडळाच्या माध्यमातून लोकमान्य टिळकांच्या कार्याविषयी जनजागृती व्हावी यासाठी ५ कोटी रुपये**
- **गणिततज्ज्ञ भास्कराचार्यांच्या स्मरणार्थ जागतिक दर्जाची भास्कराचार्य गणित नगरी उभारणार**
- **माजी गृहमंत्री आर.आर पाटील यांच्या स्मरणार्थ उभारण्यात येणाऱ्या सभागृहासाठी ५ कोटी रुपये**

### करविषयक तरतुदी

- साखर निर्यात करणाऱ्या साखर कारखान्यांना उस खरेदी कर माफ
- वस्त्रोद्योगाला चालना म्हणून वार्पिंग व सायझिंग प्रक्रियेला मूल्यवर्धित करातून माफी
- ब्रेस्ट कॅन्सर तपासणीसाठी आवश्यक असलेल्या मॅमोग्राफी मशिनवर विक्रीकर सूट
- इंजेक्शन निर्जंतूक पाण्याच्या कराचा दर १२.५ टक्क्यांवरून ५.५ टक्के
- एल.ई.डी ट्युबवरील विक्रीकर १२.५ टक्क्यांहून ५.५ टक्के
- सीआरपीएफ व बीएसएफच्या सशस्त्र कर्मचाऱ्यांना व्यवसाय करातून माफी
- अनुदानित शैक्षणिक संस्थांकडून ई-विवरणपत्र दाखल न केल्याचे विलंब शूल्क माफ
- ३१ मार्च २००५ पूर्वीच्या कालावधीसाठी विवादित व थकित रकमेपैकी कराची पूर्ण रक्कम भरल्यास व्याज व शास्तीची पूर्ण सूट. दिनांक १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २०१२ पर्यंतच्या कालावधीतील विवादित व थकित रकमेपैकी कराची संपूर्ण रक्कम भरल्यास व व्याजाची २५ टक्के रक्कम भरल्यास उर्वरित व्याज व शास्तीत सूट
- विद्यार्थ्यांच्या उपयोगाच्या पेन्सिलबॉक्स, स्टेपलर पिन्स, डस्टर, डिंक या वस्तूंवरील कराचा दर १२.५ टक्क्यांहून ५.५ टक्के
- बांबूपासून बनवलेल्या फर्निचरव्यतिरिक्त हस्तकला उत्पादनांच्या विक्रीवरील विक्रीकर माफ
- पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या बंदर उद्योग घटकांसाठीची अभय योजना २०१६-१७ मध्ये नव्याने राबवणार
- लॉजिस्टिक हबची स्थापना. या हबमधून होणाऱ्या आंतरराज्य विक्रीवरील केंद्रीय विक्रीकर माफ करणार

**(लेखिका वरिष्ठ सहायक संचालक आहेत.)**

# शासन शेतकऱ्याच्या शिवारात

**एकाच वेळी मुख्यमंत्र्यासह महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील जवळपास सर्व मंत्री मराठवाड्यातील ३ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांशी संपर्क साधतात...दोन दिवसांचा दौरा आटपून मुख्यमंत्र्यांकडे आढावा सादर करतात...मुख्यमंत्री त्याच ठिकाणी उपाययोजना जाहीर करतात...जिल्हास्तरावरील यंत्रणेला अंमलबजावणीची गती वाढवण्याचे आदेश देतात...नव्या काही बाबी जाणून घेता आल्याची कबुली देतात...आणि मंत्रालयात दुसऱ्या दिवशीपासून यासंदर्भात प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात होते...अर्थसंकल्पीय अधिवेशनात मदतीचे धोरण जाहीर होते...शेतकऱ्याच्या शेतातून सुरू झालेल्या चर्चेला सभागृहात उत्तर मिळते...अशी गतिशील कार्यतत्परता दुष्काळाबाबत शासनाने महिनाभरात दाखविली आहे. मराठवाड्याच्या दुष्काळग्रस्त भागात मंत्र्याच्या दौऱ्यादरम्यान तालुक्यातील गावागावांत झालेल्या मंत्री आणि शेतकऱ्यांच्या संवादाचा हा आढावा लोकराज्य वाचकांसाठी...**





**मराठवाड्याच्या दुष्काळग्रस्त भागातील तलावाची पाहणी करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषी मंत्री एकनाथराव खडसे.**

मराठवाडा विभागात गेल्या पाच वर्षात फक्त एकदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. २०१४ आणि २०१५ या लागोपाठच्या वर्षात पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने यंदा विभागात पाणीटंचाईचे संकट उग्र स्वरूप धारण करत आहे. या पार्श्वभूमीवर विभागातील बीड, लातूर, उस्मानाबाद या तीन जिल्ह्यातील तालुक्यांचा मंत्र्यांनी पाहणी दौरा केला आणि त्यानंतर ४ मार्च रोजी सायंकाळी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर अहवाल सादर केला. विभागातील टंचाईग्रस्त भागात मंत्र्यांकडून या पद्धतीची पाहणी केली जाणे अभूतपूर्व ठरले. या पाहणीचे वैशिष्ट्य म्हणजे खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील लांबोटा शिवारात ग्रामस्थांशी संवाद साधला आणि नंतर निलंगा, देवणी आणि शिरुर अनंतपाळ या तीन तालुक्यातील परिस्थितीचा आढावा घेतला. या दौऱ्यात मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांच्यासह संबंधित खात्यांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

गेल्या वर्षी म्हणजे २०१५ मध्ये पावसाची सुरुवात दमदार झाली खरी, पण त्यानंतर त्याने साथ दिली नाही. सरत्या पावसाळ्यातच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न उपस्थित झाला. बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यात चारा छावण्यांना परवानगी द्यावी लागली. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी लातूर, उस्मानाबाद, बीड, परभणी आणि नांदेड

या जिल्ह्यांचा दुष्काळ पाहणी दौरा केला. या दौऱ्यात मुख्यमंत्र्यांनी ३१ गावांना भेट देत सुमारे तीस हजार ग्रामस्थांशी संवाद साधला. गेल्या वर्षीही म्हणजे २०१५ मध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी पावसाळ्याच्या सुरुवातीसच जलयुक्त शिवार अभियानातील कामांची विभागात व्यापक पाहणी केली होती. यावेळी मुख्यमंत्र्यांचा दौरा हा दुष्काळी भागातील सलग तिसरा दौरा होता. मात्र या दौऱ्याचा हेतू केवळ पाहणी करणे हा नव्हता, तर दुष्काळी भागातील जनतेसाठी ज्या योजना राबवण्यात येत आहेत, त्या योजनांची अंमलबजावणी कशी होत आहे, ज्यांच्यासाठी योजना राबवली जाते, त्यांच्यापर्यंत लाभ पोहोचतो काय? टंचाईग्रस्त भागातील गावकऱ्यांचे म्हणणे काय आहे, हे समजावून घेणे हा या दौऱ्याचा हेतू होता. विभागातील उस्मानाबाद जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये मंत्रिमहोदयांनी तीन तारखेला दौरा केला. तर उर्वरित




**लातूरमध्ये जलयुक्त शिवारांतर्गत कामाची पाहणी करताना मुख्यमंत्री, कृषी मंत्री व मुख्य सचिव.**

बहुतेक तालुक्यात ४ मार्चला दौरा झाला. दिवसभराच्या या दौऱ्यात मंत्र्यांनी शेतकरी आणि गावकऱ्यांशी संवाद साधला. चारा छावण्यांना भेटी दिल्या. पाणी पुरवठ्यासाठी तातडीच्या उपाययोजनांची कशी अंमलबजावणी होत आहे हे जाणून घेतले. शेतकऱ्यांसाठी राबवली जात असलेली अन्न सुरक्षा योजना ग्रामीण भागात पोहोचली आहे की, नाही याची खातरजमा करून घेतली. सरकारने जाहीर केलेली मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होते आहे काय आणि आणखी मदतीबाबत शेतकऱ्यांच्या काय अपेक्षा आहेत, याचीही माहिती त्यांनी घेतली. आपल्यावरील कठीण संकटाच्या प्रसंगी सरकार आपल्या मदतीला येत आहे, ही मदत आपल्यापर्यंत पोहोचत आहे किंवा कसे याचीही खातरजमा सरकार करत आहे, असा अनुभव या दौऱ्यामुळे ग्रामस्थांना

### दौऱ्यातील काही ठळक बाबी

- निलंगा तालुक्यातील लांबोटा येथील कार्यक्रमात मुख्यमंत्री साहायता निधीतून नातवाचा इलाज झाल्याबद्दल वृद्ध महिलेने मुख्यमंत्र्याचे आभार मानले.
- औसा तालुक्यातील आत्महत्या करणाऱ्या संजय जाधव या शेतकऱ्याच्या कुटुंबीयांचे पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी भेट घेतली
- आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांनी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या पत्नीला चापोली येथे स्वत: भेट घेऊन मदतनिधी दिला.
- शिरुर अनंतपाळ तालुक्यातील अधिकाऱ्यांनी मुख्यालयी हजर राहून सामान्यांची मदत करावी, असे आवाहन जलसंपदामंत्री गिरीष महाजन यांनी केले.
- उदगीर तालुक्यात गृह राज्यमंत्री प्रा. राम शिंदे यांनी दीड किलोमीटर पायपीट करून तिरु प्रकल्पाची पाहणी केली; तसेच उदगीर रुग्णालयाला भेट दिली. शेतकरी बांधवांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधांची माहिती घेतली.
- अलगीरवाडी, ता. चाकूर येथे वीज पडून म्हैस ठार झाल्याने घुगे परिवाराला सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी मदत दिली.
- लांबोटा येथे मुख्यमंत्र्यांनी निलंग्याचे आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या विहीर पुनर्भरण अभियानाचा शुभारंभ केला.
- निलंगा तालुक्यातील ३०० कीर्तनकारांनी त्यांना मिळालेल्या मानधनापैकी ५१ हजार रुपयांची रक्कम जलयुक्त शिवार अभियानासाठी मुख्यमंत्र्यांकडे सोपवली.
- बीड जिल्ह्यातील पाथोटा येथे वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी चारा छावणीत गुरांना चारा दिला.
- पांढरवाडीगावात ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी ग्रामस्थांची बैठक घेतली.
- अंबाजोगाई तालुक्यातील होळणानदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी उद्घाटन केले.
- परळीमधील आत्महत्याग्रस्त बोबडे कुटुंबीयांची सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट घेतली.
- अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट यांनी पांगरी गावातील गावकऱ्यांशी संवाद साधला.
- केज तहसील कार्यालयात ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा घेतला.
- आष्टी तालुक्यातील नांदूर भागात सुकलेल्या लिंबाच्या फळबागाची महसूल राज्यमंत्री संजय राठोड यांनी पाहणी केली.
- सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी पाटोदा तालुक्यातील धनगर जवळा साठवण तलावाची पाहणी केली.
- राज्यमंत्री दीपक केसरकर यांनी वडवणी तालुक्यातील पुसरा येथील चारा छावणीला भेट दिली.
- शिरुर तालुक्यातील वीज कोसळून मृत्यू पावलेल्या ज्योती बहीर यांच्या कुटुंबीयांची सहकार राज्यमंत्री दादाजी भुसे यांनी भेट घेतली.






**१. बीड तालुक्यात चारा छावणीतील गुरांच्या चाऱ्याची पाहणी केल्यानंतर गुरांना चारा घालताना वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार.**
**२. उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांशी सुसंवाद साधताना शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे.**
**३. उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यात दुष्काळग्रस्त भागातील गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेताना उद्योगमंत्री सुभाष देसाई.**
**४. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात दुष्काळग्रस्त भागातील गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेताना महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे.**

आला. हा अनुभव अर्थातच दिलासा देणारा होता.

दौऱ्यानंतर लातूरच्या शासकीय विश्रामगृहात आढावा बैठक झाली तेव्हा मंत्र्यांनी दौऱ्यांचा अहवाल सादर केला. या बैठकीला एकनाथराव खडसे, सुधीर मुनगंटीवार, विनोद तावडे, प्रकाश मेहता, विष्णू सवरा, गिरीश बापट, गिरीष महाजन, दिवाकर रावते, रामदास कदम, एकनाथ शिंदे, डॉ. दीपक सावंत, चंद्रशेखर बावनकुळे, राजकुमार बडोले, दिलीप कांबळे, राम शिंदे, विजय देशमुख, संजय राठोड, दादाजी भुसे, विजय शिवतारे, दीपक केसरकर, राजे अम्ब्रीशराव अत्राम, रवींद्र वायकर,





डॉ. रणजित पाटील, प्रवीण पोटे हे मंत्रिमहोदय तसेच सर्व विभागाचे सचिव आणि जिल्हाधिकारी सहभागी होते.

मुख्यमंत्र्यांनी निलंगा तालुक्यातील लांबोटा येथे बोलताना शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांची माहिती दिली. शेतकऱ्यांसाठी विनाअट अन्न सुरक्षा योजना राबवणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. या योजनेच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवा हे त्यांनी आवर्जून सांगितले आणि गावपातळीवरील स्वस्त धान्य दुकानदार योजनेच्या अंमलबजावणीत कसूर करत असेल तर गय करू नका, असे त्यांनी यंत्रणेला स्पष्टपणे बजावले. शेतकऱ्यांना जीवनदायी योजनेचा लाभ देण्याबाबतही त्यांनी विस्ताराने विवेचन केले.

### आम्ही दौरे का करतो

मंत्र्यांच्या तालुकानिहाय दौऱ्यांचे तसेच मुख्यमंत्र्यांचे दौरे का आवश्यक आहेत, याबद्दल स्वत: मुख्यमंत्र्यांनी लांबोटा येथे या प्रश्नाचा उल्लेख केला. ते म्हणाले, शासन विविध योजना राबवत असले तरी त्या योजनेतील त्रुटी किंवा अपुरेपणा प्रत्यक्ष योजना जेथे राबवली जात आहे, त्या भागात गेल्यानंतर आणि तेथील जनतेशी संवाद साधल्यानंतर लक्षात येते.

अन्नसुरक्षा योजनेत कोणतेही रेशनकार्ड नसलेले अनेक लोक आहेत आणि त्यांना या योजनेचा लाभ द्यावा लागेल, ही बाब या दौऱ्यामुळे समोर आली. तसा निर्णय शासन घेईल, हे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रमीण रोजगार हमी योजना राबवताना निकषात काही व्यवहार्य सुधारणा कराव्या लागतील. तसेच नगर पंचायतीच्या हद्दीत या योजनेखाली काम सुरू करताना संबंधित नगरपंचायतींनी वाटा उचलण्याची अट शिथिल करावी लागेल. याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्येनंतर त्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून व्हावा आणि हा अहवाल तातडीने उपलब्ध करून घ्यावा, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

**– राधाकृष्ण मुळी (प्रभारी माहिती संचालक, मराठवाडा), अनील अलुरकर (जिल्हा माहिती अधिकारी बीड), अरुण सूर्यवंशी (जिल्हा माहिती अधिकारी, लातूर), दीपक चव्हाण (माहिती साहाय्यक, उस्मानाबाद) व टीम लोकराज्य.**

### लातूरसाठी तत्काळ निर्णय

मराठवाडा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूर शहराकरिता पाणी पुरवठा योजनेसंदर्भात महत्त्वाचे निर्णय जाहीर केले. शहरासाठी भंडारवाडी, मातोळा आणि डोंगरगाव येथून तात्पुरता उपाय म्हणून पाणी घेण्यात येईल. मांजरा नदीवरील धनेगाव येथील धरणात चर घेण्यात येईल, विंधन विहिरी घेतल्या जातील, महापालिकेला टँकरसाठी निधी दिला जाईल. कायमस्वरूपी पाणीपुरवठ्यासाठी उजनी, जायकवाडी, सिंदफणा धरणांपैकी जो व्यवहार्य पर्याय असेल तो स्वीकारला जाईल.

### कोणते मंत्री कोणत्या तालुक्यात

**लातूर जिल्हा**

निलंगा – देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री
एकनाथराव खडसे, महसूल मंत्री
लातूर – विष्णू सवरा, आदिवासी मंत्री
औसा – रामदास कदम, पर्यावरण मंत्री
चाकूर – राजकुमार बडोले, सामाजिक न्यायमंत्री
शिरुर अनंतपाळ – गिरिष महाजन, जलसंपदा मंत्री
उदगीर – प्रा. राम शिंदे, गृह राज्यमंत्री

**बीड जिल्हा**

बीड – सुधीर मुनगंटीवार, वित्तमंत्री
गेवराई – पंकजा मुंडे, ग्रामविकास मंत्री
अंबाजोगाई – दिवाकर रावते, परिवहन मंत्री
परळी – एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम
धारुळ – गिरीश बापट, अन्न व नागरी पुरवठा
केज – चंद्रशेखर बावनकुळे, ऊर्जामंत्री
आष्टी – संजय राठोड, महसूल राज्यमंत्री
पाटोदा – दिलीप कांबळे, सामाजिक न्याय राज्यमंत्री
वडवणी – दीपक केसरकर, वित्त राज्यमंत्री
शिरूर – दादाजी भुसे, सहकार राज्यमंत्री

**उस्मानाबाद जिल्हा**

परांडा – सुभाष देसाई, उद्योगमंत्री
भूम – डॉ. दीपक सावंत, आरोग्य मंत्री
उस्मानाबाद – विनोद तावडे, शिक्षण मंत्री
वाशी – प्रकाश महेता, गृहनिर्माण मंत्री
उमरगा – प्रवीण पोटे पाटील, उद्योग राज्यमंत्री
लोहारा – राजे अम्रीशराव अत्राम, आदिवासी विकास राज्यमंत्री
तुळजापूर – डॉ. रणजित पाटील, गृह राज्यमंत्री

# दुष्काळग्रस्तांना दिलासा

**विधिमंडळातील निर्णय**

**विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात कृषिमंत्री व मदत व पुनर्वसन मंत्री एकनाथराव खडसे यांनी सभागृहात बोलताना राज्य शासन शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले. राज्यात गेली तीन वर्ष सलग दुष्काळी परिस्थिती असल्याने दुष्काळग्रस्त भागातील जनतेच्या मदतीसाठी राज्य शासन विविध उपाययोजना राबवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

### महत्त्वपूर्ण घोषणा

- कुटुंबप्रमुख शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास कुटुंबीयांना विनाअट एक लाख रुपयांची तातडीने मदत
- स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसाठीचा एक कोटी ३५ लाख शेतकऱ्यांचा विमा हप्ता शासन भरणार
- दुष्काळग्रस्त भागातील कृषी पंपांच्या वीज बिलात १०० टक्के सवलत
- दुष्काळग्रस्त भागात पाणी पुरवठ्यासाठी टँकर सुरू करण्याचे अधिकार तहसीलदारांना
- दूर अंतरावरून पाणी आणण्यासाठी जिल्हास्तरीय समितीला अधिकार
- एक हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांमधील जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून २५ टक्के अतिरिक्त पाणी आणण्याची परवानगी
- जनावरांच्या छावण्यासाठी चारा उपलब्ध होण्याकरिता वन विभागाची कुरणे राखीव
- टंचाईग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मोफत बियाणे देणार
- जलसंधारणाची कामे करण्यासाठी जिल्हा नियोजन मंडळाला जेसीबी, पोकलँडसारख्या यंत्र खरेदीचे अधिकार
- मनरेगाच्या माध्यमातून १०० टक्के फळबाग लागवडीला चालना देणारी योजना राबवणार



### शेतकऱ्यांना दिलासा देणारे राज्य शासनाचे प्रमुख निर्णय

- गेल्या वर्षभरात सुमारे एक कोटी शेतकऱ्यांना १०,५८२ कोटी रुपयांची मदत.
- शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये पेडपेंडिंग जून २०१६ पर्यंत पूर्ण करणार.
- ज्या कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी विमा काढलेला नाही, त्यांना विमा संरक्षणाच्या ५० टक्के रक्कम अनुदान
- . धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल २०० रुपये देण्यात येईल.
- थकबाकीदार शेतकऱ्यांना पुढच्या हंगामासाठी कर्ज उपलब्ध.
- नैसर्गिक आपत्तीत मृत शेतकऱ्यांना चार लाखांची मदत.
- स्व. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या माध्यमातून झाडावरून पडणे, सर्पदंशामुळे मृतांसाठी दोन लाख रुपयांची मदत.
- टंचाईग्रस्त गावांमध्ये वीज पुरवठा खंडित न करण्याचे निर्देश
- यवतमाळ व उस्मानाबादमध्ये पीडित शेतकऱ्यांना वैद्यकीय व आकस्मिक गरजेसाठी बळीराजा चेतना अभियान पथदर्शी प्रकल्प राबवणार.
- शेतकऱ्यांच्या विधवांना उपजीविकेसाठी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे निराधार स्वावलंबन योजना.
- पीक कर्जाची पुनर्रचना निर्णय, कर्जावरील व्याज माफ करून कर्जाच्या वसुलीस स्थगिती. ५.५ लाख शेतकऱ्यांना लाभ.
- कृषी संजीवनी योजनेच्या धर्तीवर ५० हजार पिण्याच्या पाण्याच्या योजनांना लाभदायी ठरणारी पाणी संजीवनी योजना सुरू.
- जलयुक्त शिवार अभियानांमुळे सुमारे ६,९०,००० सहस्त्र घन मीटर इतकी पाणी साठवण क्षमता निर्माण तर १,३३,००० कामे पूर्ण.
- विदर्भ व मराठवाडा क्षेत्रांसाठी १००० कोटी रुपयांच्या साहाय्यासह कृषी पंपाच्या उर्जीकरणाकरिता विशेष मोहीम.
- अटल सौर कृषी पंप योजनेंतर्गत अवर्षणग्रस्त क्षेत्रातील शेतकऱ्यांना १०,००० सौर कृषी पंप देणार.
- महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत आगामी ३ वर्षांमध्ये सुमारे १ लाख विहिरींचे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट
- शाश्वत शेतीस उत्तेजन देणाऱ्या मागेल त्याला शेततळे योजनेंतर्गत पहिल्या टप्प्यात सुमारे ५२,००० शेततळ्यांची कामे हाती घेणार.
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रिया
- आत्महत्या करण्यापासून रोखण्यासाठी शेतकऱ्यांना समुपदेशन.
- १९,७१९ सावकारग्रस्त शेतकऱ्यांचे कर्जमाफ.
- शेतकरी कुटुंबातील साडेनऊ लाख विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ.
- दुष्काळग्रस्त भागातील ३३ हजार विहिरींचे काम पूर्ण करणार.
- दुष्काळग्रस्त भागात एक लाख विहीरी नरेगांतर्गत नव्याने बांधणार.
- मराठवाड्यातील आठ आणि विदर्भातील सहा अशा १४ जिल्ह्यांतील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट होऊ शकले नाहीत, अशा एपीएल (केशरी) मधील सर्व शेतकऱ्यांसाठी अन्नधान्याचा लाभ
- शेतकऱ्यांना ३ रु. किलो दराने तांदूळ तर २ रु. किलो दराने गहू
- महाराष्ट्रात ५ लाख शेततळ्यांच्या निर्मितीचे टप्प्याटप्प्याने नियोजन

**अजय जाधव**
**(लेखक हे विभागीय संपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९७०२९७३९४६**

# बचत पाण्याची : गरज काळाची

**राज्यातील अनेक भागात भीषण पाणी टंचाईचे सावट असल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १६ ते २२ मार्च या कालावधीत जलजागृती सप्ताहाचे आयोजन करण्याचा निर्धार केला होता. राज्याच्या कान्याकोपऱ्यामध्ये या काळात जलसंवर्धनासंदर्भात जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. राज्यभर हा आठवडा जलजागृतीसाठी महत्त्वपूर्ण ठरला असून राज्यातील पाण्याचे दुर्भिक्ष लक्षात आणून देण्यात आणि भविष्यातील बचतीचा संदेश देण्याचा उद्देश या जनजागृतीतून सफल झाल्याचे दिसून आले.**

जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी पुढील वर्षीच्या उपलब्ध असलेल्या पाण्यातून १० टक्के पाणी बचतीचे उद्दिष्ट ठेवून १६ ते २२ मार्च २०१६ या कालावधीत राज्यात प्रथमच 'जलजागृती सप्ताह' साजरा करण्याचा निर्णय घेतला होता. २२ मार्च या 'जागतिक जलदिना'चे औचित्यही सप्ताहासाठी होतेच. जलसंपदा, पाटबंधारे, पाणीपुरवठा व स्वच्छता, जलसंधारण, लाभ क्षेत्र विकास, पर्यावरण, कृषी, उद्योग, ग्रामविकास, नगरविकास, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आदी विभागांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 'जलजागृती सप्ताह २०१६'चा शुभारंभ मंत्रालयाच्या प्रांगणात झाला. कार्यक्रमास जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, उद्योगमंत्री सुभाष देसाई, पाणीपुरवठा मंत्री बबनराव लोणीकर, आदी मान्यवर उपस्थित होते. राज्यातील विविध नद्यांमधून आणलेल्या पाण्याचे पूजन या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थितांना जलप्रतिज्ञाही देण्यात आली. पाण्याच्या बचतीचे महत्त्व सांगणाऱ्या छायाचित्रे, व्यंगचित्रे, चित्रे व पुस्तकांचे प्रदर्शनही आयोजिण्यात आले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे छायाचित्रकार पद्मश्री सुधाकर ओलवे यांचा या वेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री म्हणाले की, पाण्यासारख्या अत्यंत मूलभूत अशा नैसर्गिक स्रोताचा गैरवापर केल्याने दुष्काळाचा सामना करण्याची वेळ आली आहे. पाण्याचे दुर्भिक्ष हे राज्याराज्यांत, जिल्ह्याजिल्ह्यांत, गावागावांत चिंतेचा, वादाचा विषय झाला आहे. त्यामुळे आताच पाण्याचे योग्य नियोजन न केल्यास ते पुढील पिढीसाठी घातक ठरेल. जलसप्ताहाचे शिल्पकार गिरीष महाजन यांनी या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमातून या आयोजनाचा संदेश आणि उद्देश राज्यभर गेला.

राज्यभर गडचिरोली ते नंदुरबारपर्यंत पूर्ण आठवडा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयांनी या काळात प्रसिद्धी मोहिमेचे आयोजन केले. वर्धा येथे आयोजित कार्यक्रमात वर्धा, धाम, बोर, पंचधारा, पोथरा नदीच्या जलाचे पूजन करण्यात आले. जलप्रतिज्ञेचे सामूहिक वाचन व वर्धा सिंचन पुस्तिकेचे विमोचनही या वेळी करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाच्या गोदावरी, पुर्णा, मानार, पेनगंगा, लेंडी, कयाधू व मांजरा या सात नद्यांतून आणलेल्या पाण्याच्या कलशाचे पूजन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील कळंबोलीत जलजागृती सप्ताहाकरिता रात्री कीर्तनात अर्धा तास देण्यात आला.

ठाणे जिल्ह्यात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले तर अकोला जिल्ह्यात जिल्ह्याभरातील जलसाठ्याची माहिती वृत्तपत्रातील प्रसिद्धी मोहिमेतून पोहोचवण्यात आली. औरंगाबादमध्ये प्रवचन व कीर्तनातून, पुणे येथे कार्यशाळेच्या माध्यमातून, सांगली येथे हास्य-व्यंग आणि राष्ट्रीय गीतांच्या माध्यमातून, ठाण्यामध्ये टंचाईग्रस्त भागात काम करणाऱ्या ग्रामसेवकांच्या सत्कारातून, तर अहमदनगर व हिंगोली येथे जलदौड आणि नाशिकमध्ये हास्ययोगातून जलजागृतीसंदर्भात प्रबोधन करण्यात आले.



जलजागृती सप्ताहानिमित्त मंत्रालयात मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागातील नद्यांच्या पाण्याचे पूजन केले.

## महाराष्ट्राने खेळली कोरडी होळी!

**या आठवड्याच्या प्रचार आणि प्रसाराचा तत्काळ प्रभाव महाराष्ट्रभर दिसून आला. या सप्ताहाच्या दुसऱ्याच दिवशी २४ मार्चला रंगपंचमी होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, पर्यावरण मंत्री रामदास कदम यांनी केलेल्या आवाहनाला अवघ्या राज्याने प्रतिसाद दिला. सोशल मीडियावरून याबाबतचे संदेश फिरायला लागले आणि पाण्याचा प्रचंड मुक्तवापर होणारा पारंपरिक होळी उत्सव विविधरंगी कोरड्या रंगात साजरा झाला. कोट्यवधी लीटर पाण्याची बचत झाली. एका यशस्वी प्रबोधन मोहिमेची फलश्रुती लगेच अनुभवता आली.**

**टीम लोकराज्य**

## विशेष मुलाखत



**महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करायचे असेल तर कायमस्वरूपी पाण्याचे साठे आणि त्या माध्यमातून सिंचनाचे जाळे विणणे आवश्यक आहे. या सरकारने कायमस्वरूपी उपाययोजनांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच या सरकारच्या कालावधीत राज्याच्या सिंचन क्षमतेत कशी वाढ होणार आहे, त्यासाठी काय उपाययोजना सुरू आहेत. जलजागृती म्हणजे काय आणि दुष्काळी प्रदेशातील मेगा रिचार्ज संदर्भात शासन किती गतिशील आहे. याचा उहापोह करणारी जलसंपदामंत्री गिरीष महाजन यांची ही विशेष मुलाखत..**

# दुष्काळमुक्तीला सिंचनाची जोड

विवेक भावसार

**१६ ते २२ मार्च जलजागृती सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला आहे. यामागील उद्देश आणि कोणते कार्यक्रम राबवले गेले?**

नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण आणि पावसाची अनिश्चितता झाल्याने पाण्याचे नियोजन करण्यात अडचणी निर्माण होत आहे. सततच्या अवर्षणपरिस्थितीमुळे राज्यातील पाणी टंचाईच्या संकटावर उपाययोजना म्हणून आवश्यक त्या पायाभूत सुविधा शासनामार्फत करण्यात येत आहे. यात पाण्याची उपलब्धता, पाण्याचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, नैसर्गिक जलस्रोतातील पाण्याचे प्रदूषण रोखणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे आदीबाबत समाजात जागृती व साक्षरता वाढवण्यावर भर दिला गेला. याला उत्तम प्रतिसाद मिळाला असून यातून मोठ्या प्रमाणात जलसाक्षरतेला चालना मिळाली आहे. नजीकच्या काळात या जागृतीचा निश्चितच फायदा होणार आहे.

**सततचे दुष्काळाचे सावट लक्षात घेता सिंचनासारख्या महत्त्वाच्या विषयासंदर्भात राज्य शासनाचे नेमके काय धोरण आहे?**

यासाठी मी आधी वित्त मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे आभार मानेल. त्यांनी या वर्षी अर्थसंकल्पात ७२७२ कोटी रुपयांची तरतूद करताना एक रुपयाचाही कट लावणार नाही आणि संपूर्ण रक्कम दिली जाईल, असे आश्वासन सभागृहाला दिले होते. ते त्यांनी पूर्ण केले. यंदाच्या अर्थसंकल्पात वित्तमंत्र्यांनी ७८५० कोटी अशी वाढवून रक्कम दिली आहे. यावेळीही आमच्या खात्याला कपात लागणार नाही आणि अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीएव्हढी रक्कम मिळेल, अशी आशा आहे. दुष्काळाचा सामना करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलयुक्त शिवाराचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. या योजनेला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

जलसंपदा विभागानेदेखील दुष्काळावर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना हाती घेतल्या आहेत. वाहून जाणारे पाणी अडवणे हे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी धरणे बांधण्याशिवाय पर्याय नाही. परंतु नव्याने धरण बांधण्याचा किंवा नव्या प्रकल्पांना मंजूरी देणे प्राप्त परिस्थितित शक्यच नाही. आजमितीस राज्यातील अपूर्ण असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे ९०,००० कोटीचा निधी लागेल. दरवर्षी आपली अंदाजपत्रातील तरतूद ७ ते ८ हजार कोटी यापेक्षा जास्त नसते. या गतीने गेलो तर पुढच्या १२–१३ वर्षात हे प्रकल्प पूर्ण होणार नाही. शिवाय दरवाढीचा परिणाम प्रकल्पाची किंमत वाढण्यावर होईल. म्हणूनच आम्ही काही निर्णय घेतले आहेत. यात प्रामुख्याने ७५ टक्क्यांपेक्षा जास्त कामे झालेल्या सिंचन प्रकल्पांना प्रधान्याने निधी उपलब्ध करून देऊन ते पूर्ण करायचे. त्यानंतर ६०–५० अशा टक्केवारीचा निकष लावून प्रकल्पांना निधी द्यायचा. असे करायचे म्हटले तरी खूप कालावधी लागेल. त्यामुळे खुल्या बाजारातून, आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून ४०,००० कोटी ते ५०,००० कोटी रुपयांचे कर्ज काढायचे आणि जे लवकर पूर्ण होऊ शकतील, अशा प्रकल्पांना हा निधी देऊन एकाच वेळी काम पूर्ण करून घ्यायचे, असा जलसंपदा विभागाचा पर्यायाने राज्य शासनाचा विचार आहे. तसे झाल्यास वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प पूर्ण होऊन राज्यातील मोठा भूभाग सिंचनाखाली येईल. त्याचा फायदा शेतीला होईल. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी अपूर्ण सिंचन प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणे यालाच माझ्या खात्याचे प्राधान्य राहील.

**मेगा रिचार्ज अर्थात महाजल पुनर्भरण ही योजना कशी आणि या योजनेतून कोणत्या भागाला कशा पद्धतीने लाभ होणार आहे?**

सातपुडा पर्वताची निर्मिती होताना खोल आतमध्ये काही पोकळी निर्माण झाली. खरे तर ती दगडाची सच्छिद्रता आहे. जळगाव, धुळे आणि मध्य प्रदेशातील काही भूभागात नदी नाल्यात कितीही पुराचे पाणी आले तरी ते संपूर्ण वाहून जात नाही, तर काही अंतरावर गेल्यावर जमिनीत गडप होते, असे निदर्शनास आले. त्याचा शास्त्रीय अभ्यास

करण्यात आला.

दोन्ही राज्यांचे शास्त्रज्ञ आणि केंद्रीय जल बोर्डाचे तज्ज्ञ यांनी सातपुडा पर्वतात मोठ्या प्रमाणावर पाणी जमिनीत जिरू शकते असे शिक्कामोर्तब केले. हाच महाजल पुनर्भरण प्रयोग आहे. इमारतीच्या गच्चीवरचे पाणी जमिनीत जिरवणे हे आपल्याला माहीत आहे. हे त्याचेच विशाल रूप. जगात झाला नसेल असा हा प्रकल्प आहे. केंद्रीय जलसंपदा मंत्री उमा भारती यांनी प्रत्यक्ष या विशिष्ट भूभागाची पाहणी केली आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले.

या प्रकल्पाचा फायदा जळगाव, धुळे आणि बुऱ्हानपूर जिल्ह्यातील सुमारे ५०० किलोमिटरच्या पट्ट्यातील ३ लाखाहून अधिक हेक्टर क्षेत्राला होणार आहे. हा परिसर सिंचनाखाली येईल आणि कायमचा सुजलाम सुफलाम होईल, या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे, जमीन संपादन करावी लागणार नाही. विस्थापन नाही त्यामुळे पुनर्वसनही नाही.

**केंद्राने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सुरू करण्याचा निर्णय घेतला. ही योजना महाराष्ट्राला किती उपयोगी? कोणत्या प्रकल्पांना यापुढे गती मिळणार?**

देशातील शेती उत्पादनात सुधारणा करण्याच्या उद्देशाने गेल्या वर्षी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची (पीएमकेवायएस) सुरुवात झाली. केंद्रीय जलसंपदा व नदी विकास मंत्रालयाच्यावतीने पीएमकेवायएस योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध राज्यांच्या जलसंपदा मंत्र्यांची समिती नेमली असून यानुसार येत्या एप्रिल महिन्यात राज्यांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. हे प्रकल्प पूर्ण करताना केंद्र आणि राज्याचा वाटा ६०-४० प्रमाणे ठेवण्याची मागणी मंत्र्यांनी या बैठकीत केली. मुख्यत्वे दुष्काळग्रस्त व नक्षलग्रस्त भागातील सिंचन प्रकल्पांना अधिक निधी देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. या योजनेंतर्गत राज्यांच्या मदतीने देशभर ४६ प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. सर्व प्रकल्प २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात निवड झालेल्या प्रकल्पांमधे महाराष्ट्रातील ७ प्रकल्पांचा समावेश असून वेगवर्धित सिंचन प्रकल्प व पीएमकेवायएस योजनेतून हे प्रकल्प पूर्ण करण्याकरिता ७२१०.६२ कोटी रुपये खर्च येणार आहे. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ७ सिंचन प्रकल्प पूर्ण होणार आहेत. जळगांव जिल्ह्यातील वाघूर नदीवरील 'वाघूर सिंचन प्रकल्प' या योजनेंतर्गत पूर्ण होणार आहे. विदर्भ सिंचन विकास महामंडळांतर्गत येणाऱ्या भंडारा जिल्ह्यातील बावनथडी नदीवरील 'बावनथडी सिंचन प्रकल्पांचा' विकास या योजनेंतर्गत होणार आहे.

वर्धा जिल्ह्यातील वर्धा नदीवरील 'लोवर वर्धा सिंचन प्रकल्प', परभणी व जालना जिल्ह्यातील शेतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या दुधना नदीवरील 'लोवर दुधना सिंचन प्रकल्प', कोल्हापूर जिल्ह्यातील चांदगड येथील तिल्लारी नदीवरील तिल्लारी प्रकल्प, धुळे जिल्ह्यातील पांझरा नदीवरील 'लोवर पांझरा प्रकल्प', अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद आणि ठाणे जिल्ह्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या गोदावरी नदीवरील 'नांदूर मधमेश्वर -२' या प्रकल्पांचा समावेश आहे.

**(लेखक हे दै. एशियन एज या वृत्तपत्र समूहात विशेष प्रतिनिधी आहेत.)**
**संपर्क : ०९९३०४०३०७३**

**जलजागृतीनिमित्त काढण्यात आलेली रॅली.**



# स्वच्छतेचा वाढता आलेख

**'स्वच्छ भारत अभियान'च्या धर्तीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान'ची घोषणा केल्यानंतर शहरे हागणदारीमुक्त व स्वच्छ करण्याची शपथ राज्यातील नगरपालिकांनी घेतली. या अभियानाच्या नियोजनबद्ध कार्यक्रमामुळे आतापर्यंत ५५ हून अधिक शहरे हागणदारीमुक्त व तीन शहरे संपूर्ण स्वच्छ झाली आहेत. स्वच्छ शहरांचा आलेख दिवसागणिक वाढत आहे. या दिशेने देवळी, मलकापूर व भंडारा नगरपालिकेने टाकलेल्या स्वच्छतेच्या सप्तपदीची ही ओळख...**

## स्वच्छसुंदर देवळी

विदर्भ केसरीसह विविध स्पर्धांमध्ये देवळी येथील पहिलवानांनी आपला वेगळा ठसा निर्माण केला आहे. त्यासोबतच देवळी नगरपरिषदेने स्वच्छ भारत अभियानामध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली. लोकसहभागातून प्रत्येक घरी स्वच्छतेचा संदेश पोहचविला आहे. नागरिकांच्या उस्त्फूर्त सहभागामुळे देवळीने स्वच्छ शहराच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकले आहे.

देवळी ही विदर्भातील सर्वात जुनी



नगरपरिषद. नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई रामदास तडस यांच्या पुढाकाराने ३१ मार्चपर्यंत शहर हागणदारीमुक्त करण्याचा पालिकेने संकल्प केला. शहराचे सर्वेक्षण केले. १ हजार १७५ कुटुंबांकडे शौचालय नसल्यामुळे स्वत:ची जागा असलेल्या ७३१ कुटुंबांना १२ हजार रूपये प्रमाणे आर्थिक मदत करून शौचालय उभारणीला सुरुवात केली. झोपडपट्टी अथवा गलिच्छ वस्ती सुधार कार्यक्रमांमध्ये सार्वजनिक शौचालयाची व्यवस्था केली. महिला व पुरुषांसाठी १३ नवीन स्वतंत्र शौचालये उभारली.

### घनकचरा व्यवस्थापन

घनकचरा व्यवस्थापनामध्ये दररोज शहरातील १०० टक्के कचरा उचलण्याची व्यवस्था केली. जेथे कचरा संकलनाचे वाहन पोहोचू शकत नाही, अशा ठिकाणी घंटा गाड्यांमार्फत कचरा गोळा केला. सकाळी व सायंकाळी अशा दोन्ही वेळेस दररोज सरासरी ५ मेट्रिक टन कचरा गोळा केला जातो. घरातील कचरा बाहेर फेकला जाऊ नये, यासाठी ओला कचरा व सुका कचरा टाकण्यासाठी ३,८०० प्लास्टिकच्या कचरापेट्या सज्ज करण्यात आल्या. कचरा गोळा करणाऱ्या घंटा गाडी व वाहनांना कचरा जमा करण्याचा मार्ग व वेळा निश्चित करून दिल्या. नगराध्यक्षा शोभाताई तडस तसेच मुख्याधिकारी विजय चव्हाण यांनी स्थानिक सदस्यांना सोबत घेऊन जनजागृतीसाठी वॉर्डांमध्ये सभा घेतल्या. स्वच्छतेचा संदेश दिला. नागरिकांचे मतपरिवर्तन केले.

### शेतकऱ्यांना खत, पालिकेला उत्पन्न

घनकचरा गोळा केल्यानंतर त्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी वाटखेडा येथे कंपोस्ट डेपो तयार केला. या उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना सुलभपणे खताचा पुरवठा होणार आहे. नगरपरिषदेलाही या माध्यमातून आर्थिक उत्पन्न मिळणार आहे.

### सर्वांगीण विकास

शहरातील मल:निस्सारण व सांडपाणी वाहून नेण्यासाठी २६ कि.मी नाल्यांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले. नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा, तसेच प्रतिमाणशी १३० लीटर पाणी पुरवठा व्हावा यासाठी ३४ कोटी रुपयांची योजना कार्यान्वित होत आहे. गलिच्छ वस्ती सुधार योजनेंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, सार्वजनिक शौचालयातून निघणाऱ्या घाणीची विल्हेवाट लावण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे. त्यासोबतच इ-गव्हर्नन्सच्या माध्यमातून जलद सुविधा पुरवण्यासाठी ११ सेवा ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. देवळी शहराच्या स्वच्छतेसोबतच सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमुळे स्वच्छ देवळी, सुंदर देवळीची संकल्पना साकारली आहे गेली.

---

नागरिक, लोकप्रतिनिधी व प्रशासन यांच्या सांघिक प्रयत्नांमुळे हागणदारीमुक्तीबरोबरच कचरा आणि घनकचरा व्यवस्थापन या सर्वांमध्ये मलकापूर नगरपरिषदेची कामगिरी गौरवास्पद ठरली आहे. हिरव्या गर्द वनराईने नटलेले हे छोटेसे शहर अल्पावधीतच म्हणजे मे २०१५ मध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) अभियानाच्या घोषणेनंतर सप्टेंबर २०१५ मध्ये हागणदारीमुक्त झाल्याचे घोषित झाले.



### स्वच्छतेचा निर्धार

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची साद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातली आणि 'दिलसे दिल तक' या ओळीप्रमाणे तिला तत्काळ प्रतिसाद देत मलकापूर

## स्वच्छतेसाठी डायल करा...

**मलकापूर शहरातील सर्व गटारे, नळ आणि सार्वजनिक शौचालये आदी ठिकाणच्या स्वच्छतेबाबतच्या तक्रारींसाठी नगरपरिषदेने १८००२३३२९३८ हा टोल फ्री क्रमांक सुरू केला आहे. यावर तक्रार प्राप्त झाल्यास सफाई कामगारांना पाठवून तत्काळ स्वच्छता केली जाते.**

नगरपरिषदेने शहर हागणदारीमुक्त करण्याचा निर्धार केला. याची सुरुवात खरे तर नगराध्यक्ष बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासूनच म्हणजे स्वच्छ भारत अभियानाचे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले त्या दिवसापासूनच झाली होती. लोकप्रतिनिधी, महिला बचत गट, तरूण मंडळे, विद्यार्थी यांच्या मदतीने घरोघरी जाऊन लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

## मलकापूरचा 'टोल फ्री' पॅटर्न

उघड्यावर शौचास न जाण्याबाबत, प्लास्टिकमुक्ती, घनकचरा व्यवस्थापन यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली. घरोघरी पत्रेवाटप, बोर्ड, बॅनर, रिक्षातून पुकारा, प्रभात फेऱ्या या सर्व साधनांचा वापर करण्यात आला. विविध मार्गांनी केलेल्या या प्रयत्नांना नागरिकांनी उत्फूर्त प्रतिसाद दिला. मलकापूर शहरात सध्या ८७५ कुटुंबीयांकडे वैयक्तिक शौचालये आहेत. केवळ २४० कुटुंबीयांकडे शौचालय नसल्याने ती उघड्यावर जात होती. त्यामुळे २४० कुटुंबांसाठी १७ ठिकाणी ७२ शौचालय सीट्स उभारल्या आहेत. रमाई आवास योजनेंतर्गत ३५ वैयक्तीक शौचालये बांधण्यात आली आहेत.तीन फिरती शौचालय वाहने अद्ययावत असून त्यामध्ये ६ सीट्स आहेत. राष्ट्रीय महामार्ग, बाजार, जत्रा या ठिकाणी आवश्यकतेनुसार शौचालय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. नादुरुस्त स्वच्छतागृहांची दुरुस्ती करण्यात आली असून त्यामुळे उघड्यावर शौचास जाण्याचे पूर्णतः बंद झाले आहे.

### कचरा व्यवस्थापन

मलकापूर शहरातून दररोज सकाळी ६.३० ते ११.३० या वळेत कचरा संकलनासाठी घरोघरी घंटागाडी फिरते. दुपारी गटारांची सफाई करून घंटागाडी, ट्रॅक्टरद्वारे कचरा एकत्रित उचलला जातो. सायंकाळी ४.३० ते ६.०० या वेळेत मास व मासे विक्रेत्यांच्या दुकानातील कचरा उचलून कचराडेपोवर नेण्यात येतो. या ठिकाणी कचऱ्यावर जंतुनाशके फवारली जातात. शुक्रवारी आठवडा बाजाराच्या दिवशी बाजार संपल्यानंतर सायंकाळी ८.०० वाजता कचरा उचलून तातडीने साफसफाई केली जाते. मलकापूर शहरातील सर्व दवाखान्यामधील कचरा कचराकुंडीत न टाकता बायोमेडीकल वेस्ट प्रोसेससाठी इचलकरंजी येथे पाठवला जातो. नागरिक, व्यापारी यांनी ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांचा वापर बंद केला आहे. परिसर स्वच्छतेबरोबरचा आरोग्याच्या बाबतीतही जनजागृती होत आहे. स्वच्छ सुंदर प्रसन्न मलकापूर असे एक नवे चित्र निर्माण झाले आहे.



भंडारा शहरातील खांब तलाव अनेक वर्षांपासून हागणदारी बनला होता. मात्र स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत भंडारा नगरपरिषद, ग्रीन माइंड ग्रुप व नागरिकांनी श्रमदानातून हा गलिच्छ परिसर स्वच्छ व सुंदर झाला. जेथे लोक शौचास बसत तेथे योगासने व मॉर्निंग वॉक करणाऱ्या नागरिकांनी हा परिसर फुलून गेला.



### श्रमदानातून स्वच्छता

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत स्थानिक महिलांनी सुरुवातीला श्रमदान करून एका चौकाची स्वच्छता केली. श्रमदानाचे महत्त्व नागरिकांना कळले.

## भंडारा

श्रमदान ही सवय झाली. श्रमदानाची व्याप्ती वाढत गेली. स्थानिकांना स्वयंसेवी ग्रीन माइंड ग्रुपची साथ मिळाली. नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनीही पुढाकार घेतला. यामुळे अनेक चौक स्वच्छ झाले. नगरपरिषदेच्या सहकार्याने व नागरिकांच्या साहाय्यामुळे शहरातील गलिच्छ समजला जाणारा खांब तलाव परिसर आता सुंदरतेने नटला आहे.

### गतवैभव मिळाले

भंडारा शहरातील खांब तलावाचा वापर पूर्वी पिण्याच्या पाण्याकरिता होत असे. परंतु दुर्गंधी, अस्वच्छतेमुळे या परिसराची हागणदारी झाली होती. स्वच्छता अभियानांतर्गत या तलावाचा चेहरामोहरा बदलला आहे. भिंतींना वार्ली पेंटिंगने सजवले गेले. प्लास्टिक बंदी, श्रमदान, हागणदारीमुक्ती, इत्यादी विषयांवर भित्तीचित्र साकारण्यात आले. रंगहीन भिंती बोलक्या झाल्या. या परिसराला पर्यटन स्थळाचे रूप आले असून परिसर चैतन्यमय झाला आहे.

**अनिल गडेकर (जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा), वर्षा पाटोळे (जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर), राहूल खंडारे (स्वच्छ महाराष्ट्र नागरी अभियान) व टीम लोकराज्य.**

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १.८० लाख घरे




सर्वांसाठी घरे या विभागीय परिषदेला संबोधित करताना मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय आणि अन्य अधिकारी.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची 'सर्वांसाठी घरे २०२२' ही एक महत्त्वाकांक्षी योजना असून महाराष्ट्रात या योजनेच्या यशस्वितेसाठी राज्य शासनातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत. या योजनेंतर्गत राज्यात एक लाख ८० हजार घरांच्या प्रस्तावास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली असून आता हे सर्व प्रस्ताव केंद्राच्या मान्यतेसाठी तत्काळ सादर करण्याचे, निर्देश मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय यांनी दिले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणारी महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, गोवा, दादरा नगर हवेली, दमण आणि दिव या पश्चिम विभागीय राज्यांची कार्यशाळा सह्याद्री अतिथीगृहात घेण्यात आली. त्यावेळी मुख्य सचिव बोलत होते. केंद्रीय गृहनिर्माण सचिव नंदीता चॅटर्जी, अभियान संचालक अम्रित अभिजात, राज्याचे गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्रीकांत सिंग यावेळी उपस्थित होते. मुख्य सचिव यावेळी म्हणाले की, देशात कुणीही गरजू निवाऱ्याशिवाय राहू नये यासाठी ही योजना तयार करण्यात आली आहे. शहरी भागासाठी ही योजना असून महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात ५१ शहरांमध्ये ही योजना राबवण्यात येणार आहे. त्याअंतर्गत १ लाख ८० हजार घरे बांधण्यात येणार असून त्यासाठीचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे एप्रिल २०१६ पर्यंत पाठविण्यात येतील. यासाठी संबंधित महापालिकांनी कामास गती देण्याचे आवाहनही श्री. क्षत्रिय यांनी यावेळी केले.

## आदिवासींसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र ऑनलाइन

आदिवासी विद्यार्थी, कर्मचारी यांना आता जात पडताळणी प्रमाणपत्रांसाठी शासकीय कार्यालयात जावे लागणार नाही. हे प्रमाणपत्र त्यांना ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाचे मंत्री विष्णू सवरा यांनी दिली.

आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च किंवा व्यावसायिक शिक्षण, नोकरी आणि लोकप्रतिनिधींच्या उमेदवारीसाठी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. त्यांचे हे हक्क निर्विवाद जपण्यासाठी आणि वेळेची तसेच पैशांची बचत करण्यासाठी हा लोकोपयोगी निर्णय घेण्यात आला. जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी तालुक्यातील सेतू कार्यालय, संग्राम, ई-महा सेवा केंद्र तसेच सायबर कॅफेत जाऊन प्रमाणपत्र ऑनलाइन प्राप्त करता येणार आहे. एप्रिल २०१६ पासून www.etribevalidity.gov.in या संकेतस्थळावर ही सेवा सुरू होईल. प्रमाणपत्रासाठी अर्ज अपलोड करून संबंधित प्रमाणपत्र स्कॅन करून जोडावी लागतील.

### तारांकित

## 'आपले सरकार' पोर्टलने रस्ता केला दुरुस्त

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र शासनाने २६ जानवोरी २०१५ रोजी आपले सरकार हे पोर्टल जनतेच्या हाती दिले. जनता आणि सरकार यांच्यामध्ये हे संकेतस्थळ संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम बनले. ग्रामीण भागातील नागरिकसुद्धा या पोर्टलचा आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रभावीपणे वापर करू लागले आहे. उदाहरण द्यायचेच झाले तर चंद्रपूर जिल्ह्याच्या दुर्गम भागातील राजुरा तालुक्यातील सास्ती येथील नागरिकांचे द्यावे लागेल. राजुरा, कोरपना तालुक्याच्या सीमेवरील जैतापूर ते नांदगाव या तीन किलोमीटर रस्त्याचे १५ लाख रुपये किंमतीचे बांधकाम जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामपंचायतीला दिले होते. हे काम ग्रामपंचायतीने गडचांदूर येथील कंत्राटदारास दिले. हे काम निकृष्ट दर्जाचे असल्याची नागरिकांची तक्रार होती. या तक्रारीची स्थानिक पातळीवर दखल न घेतल्यामुळे नागरिकांनी आपले सरकार या पोर्टलवर तक्रार नोंदवली. या तक्रारीची शासनाने तत्काळ दखल घेऊन चौकशीचे आदेश दिले. चौकशी समितीने चौकशी करून रस्ता नव्याने करण्याची शिफारस केली. नागरिकांच्या तक्रारीची दखल थेट मंत्रालयात घेतल्या गेल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या पोर्टलवर सामान्य नागरिकांच्या तक्रारींची दखल तातडीने घेऊन कारवाई केली जात असल्याचा आनंद राजूरा, कोरपना तालुक्यातील नागरिकांनी व्यक्त केला. सर्वसामान्य नागरिकांनाही आपल्या परिसरातील कोणत्याही तक्रारीसाठी https://aaplesarkar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर थेट मंत्रालयात संपर्क साधता येतो.

## चैत्यभूमी होणार ‘अ’ दर्जाचे पर्यटनस्थळ




**चैत्यभूमीवर भेटीप्रसंगी दयाराम राऊत या काष्ठशिल्पकाराने साकारलेल्या कलाकृतीचे निरीक्षण करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी. सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार रामदास आठवले आदी मान्यवर.**

दादर येथील चैत्यभूमीला पर्यटनाचा ‘अ’ दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित आढावा बैठकीत; मुंबई शहराच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले. मुख्यमंत्री म्हणाले की, जयंतीनिमित्त येणाऱ्या अनुयायांची संख्या लक्षात घेता चैत्यभूमी परिसरात सीसीटीव्ही तत्काळ बसवण्यात येतील. इंदू मिलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा अभिवादनासाठी ठेवण्यात येणार आहे. सांस्कृतिक खात्याच्या वतीने गेट वे ऑफ इंडिया येथे ‘भीमपहाट’ आयोजित करण्यात येईल. तसेच राज्यभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत.

### एमएमआरडीएचे १२५ कोटी रुपये

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३९ व्या बैठकीत सन २०१६-१७ साठीचा रुपये ६,६४७.६७ कोटीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला असून या अर्थसंकल्पात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्ताने त्यांच्या स्मारकासाठी रुपये १२५ कोटींची तरतूद केली आहे.

## मुंबईत महिलांसाठी ५० हजार शौचालये

मुंबई शहरामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत महिलांसाठी ५० हजार शौचालये बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

मुंबई शहरामध्ये म्हाडा, मुंबई महापालिकेमार्फत महिलांसाठी शौचालयांची निर्मिती करण्यात आली आहे. या शौचालयांमध्ये वीज, पाणीपुरवठा, स्वच्छता ठेवण्यासाठी संबंधित यंत्रणेला निर्देशदेखील देण्यात आले आहेत. या शौचालयांना पुरवण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी करण्यासाठी आवश्यकता भासल्यास विधानसभा सदस्यांची समिती देखील नेमण्यात येईल. स्वच्छ भारत अभियानांतर्गत ३५ व्यक्तींमागे एक शौचालय आणि २५ महिलांमागे एक शौचालय असे प्रमाण असून सध्या ५० महिलांसाठी एक शौचालय अशी स्थिती आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत ही स्थिती बदलण्यासाठी मुंबईमध्ये महिलांसाठी ५० हजार शौचालये येत्या तीन वर्षांत बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. म्हाडालादेखील महिला शौचालय निर्मितीसाठी कालबद्ध कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश देण्यात येतील. मुंबईमध्ये कार्यरत असलेल्या शौचालयांना पाणी पुरवण्याचे आदेश म्हाडा आणि मुंबई महापालिकेला देण्यात आले आहेत. जागोजागी स्वच्छतेचे संदेश देणारे फलकदेखील लावण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

# तारांकित

## ऐतिहासिक मांगीतुंगीचा विकास

मांगीतुंगी (जि. नाशिक) येथे १०८ फूट उंच भगवान ऋषभदेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व महामस्तकाभिषेक सोहळा नुकताच पार पडला. ‘जैन समाजातील सर्व तीर्थंकरांसह भगवान ऋषभदेव यांचे कार्य मोलाचे आहे. भगवान ऋषभदेव यांनी सर्वांनाच विकासाची समान संधी दिली. त्यांचे कार्य देशातील सर्व स्तरावरील शासकांना मार्गदर्शक आहे’, असे प्रतिपादन येथे या सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मांगीतुंगीसारख्या सुंदर



परिसराच्या विकासासाठी २७५ कोटींचा बृहद आराखडा तयार केला आहे.

महामस्तकाभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने ४० कोटींची विकासकामे तातडीने हाती घेण्यात आली. मांगीतुंगी परिसराला धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील ऐतिहासिक लढाई याच भागात झाली आहे. त्यामुळे या भागाच्या विकासासाठी शासनस्तरावर सर्व प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाहीदेखील मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

## पंचायत राज संस्थांच्या सक्षमीकरणात महाराष्ट्र आघाडीवर




**पंचायत राज अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या पंचायत राज संस्थांचा सत्कार राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते करण्यात आला.**

महाराष्ट्र हे पंचायतराज संस्थांना अधिक सक्षम करणाऱ्या राज्यांमध्ये आघाडीचे राज्य ठरले असल्याचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी सांगितले.

ग्रामविकास विभागामार्फत यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत राज्यातील उत्कृष्ट काम करणाऱ्या पंचायतराज संस्था आणि गुणवंत अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मा. राज्यपाल यांच्या हस्ते व ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारंभात गौरव करण्यात आला.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास राज्यमंत्री दीपक केसरकर व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, लोकसभा आणि विधानसभेइतकीच ग्रामसभाही महत्त्वाची आहे. १४ व्या वित्त आयोगातून गावांच्या विकासासाठी १५ हजार कोटी रुपयांचा भरीव निधी उपलब्ध होणार आहे. त्याचा प्रभावी वापर करण्यासाठी ग्रामसभा शक्तिशाली असणे गरजेचे आहे.

### २ कोटी ७० लाख रुपयांचे पुरस्कार प्रदान

यशवंत पंचायतराज अभियानाअंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कोल्हापूर, लातूर व अहमदनगर या जिल्हा परिषदांना अनुक्रमे पहिले तीन राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच ब्रम्हपुरी (जि.चंद्रपूर), कराड (जि. सातारा) या पंचायत समित्यांना अनुक्रमे पहिले दोन तर राहुरी (जि. अहमदनगर) व मालवण (जि. सिंधुदुर्ग) या पंचायत समित्यांना तिसरा पुरस्कार विभागून प्रदान करण्यात आला. महालगाव (ता. कामठी, जि. नागपूर), लोणी बु. (ता. राहाता, जि. अहमदनगर), कसबा उत्तूर (ता. आजरा, जि. कोल्हापूर) या ग्रामपंचायतींना अनुक्रमे प्रथम तीन पारितोषिके प्रदान करण्यात आली. याशिवाय विविध विभागीय पुरस्कार तसेच उत्कृष्ट कर्मचारी, अधिकारी यांनाही याप्रसंगी पुरस्कार प्रदान करण्यात आले. स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्रांसह एकूण २ कोटी ७० लाख रुपयांच्या रकमेचे पुरस्कार धनादेशाद्वारे प्रदान करण्यात आले.

## तारांकित

### ऑलिम्पिक स्पर्धेसाठी कविता राऊतला साहाय्य

आंतरराष्ट्रीय धावपटू श्रीमती कविता राऊत यांची ब्राझिल येथे होणाऱ्या ऑलिम्पिक-२०१६ या स्पर्धेसाठी निवड झाली असून, पूर्वप्रशिक्षणासाठी साहाय्यभूत ठरावे यासाठी कविता राऊत यांना आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा यांच्या हस्ते मंत्रालयात १४ लाख ९४ हजार रुपयांचा धनादेश सुपुर्द करण्यात आला. यावेळी श्री. सवरा यांनी ऑलिम्पिकमध्ये पदक मिळवून राज्याचे व देशाचे नाव उंचावण्याच्या शुभेच्छा दिल्या.

आदिवासी भागातून अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून



कविता राऊत यांनी राज्याचा नावलौकिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढवला आहे.

भविष्यातही तिची कामगिरी उंचावत जावी यासाठी शासनाने पूर्वप्रशिक्षणासाठी प्रोत्साहनपर मदत केली आहे. यावेळी श्रीमती राऊत यांनी शासनाचे आभार मानले. क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी कामगिरी करून महाराष्ट्राचे नाव उज्वल करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

## छत्रपती शिवरायांच्या नियोजित स्मारक प्रकल्पाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी





**अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियोजित स्मारक प्रकल्पाची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच केली. आमदार विनायक मेटे यांच्यासह अनेक अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी प्रकल्पाची माहिती घेतली व अधिकाऱ्यांशी चर्चा करून नियोजनाचा आढावा घेतला.**

## मुंबई मेट्रो, मोनो आणि सागरी मार्गाला गती

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३९ व्या बैठकीत सन २०१६-१७ साठीचा रुपये ६,६४७.६७ कोटीचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतूसाठी रुपये १ हजार कोटींची तरतूद तर कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो मार्गासाठी रुपये १ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत तर नगर विकास राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील यांनी विधानपरिषदेत निवेदनाद्वारे दिली.

अर्थसंकल्पामध्ये मेट्रो मार्ग, शिवडी-न्हावा शेवा सागरी सेतू, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प-२, महानगर प्रदेशामध्ये उड्डाणपूल, खाडी पूल, रस्त्यांचे जाळे उभारणे, मोनोरेलचा दुसरा टप्पा आणि अविरतपणे वाढत असणाऱ्या वांद्रे-कुर्ला संकुलाची सुधारणा आदी प्रकल्पांना महत्त्व व प्राधान्य देण्यात आले असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, दहिसर ते डी.एन.नगर आणि अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) या दोन मेट्रो मार्गांसाठी प्रत्येकी रुपये ५०० कोटी इतकी तरतूद तर कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मेट्रो मार्गासाठी रुपये १ हजार कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वडाळा ते संत गाडगे महाराज चौक या मोनोरेल मार्गाचा दुसऱ्या टप्प्यासाठी रुपये ३४१.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. तसेच डी.एन.नगर-वांद्रे-मानखुर्द या मेट्रो मार्गालाही प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

### एमएमआरडीएचे निर्णय



शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतूसाठी रुपये १ हजार कोटी, मुंबई नागरी प्रकल्प-२ साठी रुपये ७१८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अंतर्गत छत्रपती शिवाजी टर्मिनस आणि कुर्ला दरम्यानचा पाचवा व सहावा रेल्वे मार्ग, मुंबई सेंट्रल ते बोरिवली दरम्यानचा सहावा रेल्वे मार्ग, हार्बर मार्गाचे गोरेगावपर्यंतचे विस्तारीकरण केले जाईल. वाढत असणाऱ्या वांद्रे-कुर्ला संकुलासाठी रुपये १७१ कोटींची तरतूद प्राधिकरणाने अर्थसंकल्पात केली आहे. यामुळे छेडा नगर येथे दोन उड्डाणपूल आणि एक उन्नत रस्ता बांधून तेथील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्राधिकरणाने अर्थसंकल्पामध्ये रुपये ५० कोटींची तरतूद केली आहे.

# तारांकित ★★★★★★

## मंत्र्यांनी केली रुग्णांची तपासणी

नामवंत अस्थिव्यंगतज्ज्ञ म्हणून विदर्भात ओळख असणारे गृह राज्यमंत्री तथा अकोल्याचे पालकमंत्री डॉ. रणजित पाटील यांच्याकडून तपासणी करून घेण्याचा योग नुकताच अकोल्यातील रुग्णांना आला. गृहराज्यमंत्री झाल्यापासून डॉ. पाटील यांची वैद्यकीय सेवा बंद आहे. त्यांना आता प्रॅक्टिस शक्य होत नाही. मात्र स्वत: डॉ. असणारे श्री. पाटील आणि त्यांच्याकडून उपचार करून घेण्यास इच्छुक असणारे रुग्ण यांच्यासाठी नुकतीच संधी चालून आली. अकोला येथे गरीब-गरजू रुग्णांना आवश्यक आरोग्य सेवांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाआरोग्य



अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आल्या. डॉ. पाटील यांनी अन्य दालनासोबतच अस्थिव्यंगाच्या संदर्भातील रुग्णांच्या दालनात प्रवेश केल्यावर त्यांच्यातील डॉक्टर जागा झाला. या वेळी त्यांनी स्वत: अनेक रुग्णांची तपासणी केली. सर्वसामान्यांविषयी जिव्हाळा असणाऱ्या पालकमंत्र्यांची एक डॉक्टर म्हणून रुग्णांविषयी असलेली आपुलकी या वेळी उपस्थितांना पाहावयास मिळाली.

# मागेल त्याला शेततळे...






**यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये शेततळे आणि विहिरींच्या निर्मितीसाठी २ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात दुष्काळी भागामध्ये मोठ्या प्रमाणात ही मोहीम ठिकठिकाणी राबवली जात आहे. राज्यात आतापर्यंत ७० हजार शेतकऱ्यांनी शेततळ्यांची मागणी केली असून पहिल्या टप्प्यात या उन्हाळाअखेर ५० हजार शेततळ्यांची निर्मिती होणार आहे.**

**प्रवीण टाके**

महाराष्ट्रातील दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील असून 'मागेल त्याला शेततळे' देण्याचा धाडसी निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात सध्या शेततळ्याची मोहीम महत्त्वाकांक्षी पथदर्शी प्रकल्प म्हणून सुरू असून त्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीदेखील राष्ट्रीय स्तरावर ही योजना उचलून धरली असून देशभरात ५ लाख शेततळी आगामी काळात तयार होण्याचे संकेत दिले आहेत. राज्यात ५० हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट या पावसाळ्यापूर्वी ठेवण्यात आले आहे. आतापर्यंत ७० हजार शेतकऱ्यांनी शेततळ्यासाठी अर्ज केले आहेत. यातून ५० हजार शेततळ्यांची निवड होणार असून जिल्हानिहाय उद्दिष्ट पूर्ण केले जाणार आहे. योजनेच्या माहितीसाठी शेतकऱ्यांचे जिल्ह्याजिल्ह्यांत मेळावे होत असून यामध्ये तालुकास्तरावर कर्मचाऱ्यांचे देखील प्रशिक्षण घेण्यात आले आहे. विहित अटी व शर्तींची पूर्तता केल्यानंतर शेतकऱ्याच्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा केली जाणार आहे.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनामध्येच नागपूर येथे मुख्यमंत्र्यांनी 'मागेल त्याला शेततळे' देण्याची घोषणा केली होती. जलयुक्त शिवार पाठोपाठ आता 'मागेल त्याला शेततळे' योजनेतून सिंचनाचा वाटा वाढवण्याचे त्यांनी घोषित केले होते. त्यामुळे २३ फेब्रुवारीपासून सध्या महाराष्ट्रात हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. जिल्हा, विभाग व तालुका स्तरावरील विविध समित्यांचे गठन, आढावा व समन्वय यामुळे मागेल त्याला शेततळे या प्रकल्पाला मोहिमेचे स्वरूप आले आहे. तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर ३० दिवसांच्या आत लाभार्थ्यांना काम सुरू करण्याचे बंधन टाकण्यात आले आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी व तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी (महसूल) यांना 'नोडल अधिकारी' म्हणून घोषित करण्यात आले आहे.

या अर्थसंकल्पामध्ये अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शेततळे आणि विहिरींच्या निर्मितीसाठी २ हजार कोटींची तरतूद केली असून राज्यात दुष्काळी भागामध्ये मोठ्या प्रमाणात ही मोहीम ठिकठिकाणी राबवली जात आहे. राज्यभरात आतापर्यंत ७० हजार शेतकऱ्यांनी शेततळ्यांची मागणी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी २०१६-१७ या वर्षाकरीता जिल्हानिहाय किती शेततळे निर्माण करायचे याचे लक्ष्य निश्चित केले असून पहिल्या टप्प्यात या उन्हाळ्यात ५० हजार शेततळ्यांची निर्मिती होणार आहे. सर्वाधिक लक्ष्य यवतमाळ जिल्ह्याचे असून ३४४३ शेततळी निर्माण केली जाणार आहे. या योजनेंतर्गत शेततळ्याच्या आकारमानाची निश्चिती करण्यात आली आहे. पाण्याची आवक (इनलेट) आणि जावक (आऊटलेट) असणाऱ्या शेततळ्याचे मोजमाप किती असावेत, इनलेट-आऊटलेट नसणाऱ्या शेततळ्याचे मोजमाप किती असावेत याची स्पष्टता ठेवण्यात आली आहे.

## किती मदत मिळणार..

शेततळ्यासंदर्भात खोदकाम किती करायचे हे नियम जसे ठरले आहेत तसेच यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची निश्चिती देखील झाली आहे. आकारमानानुसार शासनाकडून मदत दिली जाईल. कोणत्याही परिस्थितीत ही मदत ५० हजारांपेक्षा अधिक असणार नाही. एकत्रित किंवा सामुदायिक शेततळेही घेता येईल. तथापि, खोदकाम निर्देशित केल्याप्रमाणेच राहील. मात्र सामुदायिक शेततळे करताना अनुदान, पाण्याचे वाटप, पाण्याची हिस्सेवारी यासाठी १०० रुपयांच्या स्टॅम्पपेपरवरील करार अनिवार्य आहे.

## आपले सरकारवर ऑनलाइन नोंदणी

आपले सरकार या शासनाच्या लोकप्रिय संकेतस्थळावर यासंदर्भात ऑनलाइन अर्जाची उपलब्धता २३ फेब्रुवारीपासून करण्यात आली होती. https://maharashtra.gov.in या संकेतस्थळावर १७ फेब्रुवारी २०१६ च्या शासन आदेशाची प्रत उपलब्ध करण्यात आली आहे. या योजनेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होऊ नये यासाठी तालुका कृषी अधिकारी यांना 'आपले सरकार' पोर्टलवर माहिती अपलोड होत आहे.



## 'मन की बात'मध्ये शेततळी

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' या कार्यक्रमाध्ये प्रधानमंत्र्यांनी महाराष्ट्रात सुरू असलेल्या शेततळ्यांच्या कार्यक्रमाचा उल्लेख केला. देशभरात किमान ५ लाख शेततळी या पावसाळ्यापूर्वी तयार होणार असून यात साठवल्या जाणाऱ्या पाण्यातून ठिबक व तुषार सिंचनाद्वारे शेतकऱ्यांना पुढील हंगामामध्ये लाभ होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली आहे.**

## वेळापत्रक निश्चित

या संपूर्ण मोहिमेचे वेळापत्रक निश्चित असून जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ४५ दिवसात अर्ज करणे अनिवार्य केले होते. तांत्रिक मान्यतेसाठी १० दिवसांचा कालावधी निश्चित होता. तांत्रिक मान्यतेनंतर अर्जदाराची यादी व अन्य मान्यतेसाठी १५ दिवसांचा कालावधी दिला आहे.

## 'मिशन' मोडवर कार्य

टंचाईच्या कामात आता शेततळे, जलयुक्त शिवार, पीक वीमा योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, पाणी टंचाई यासाठी युध्दस्तरावर जिल्ह्याजिल्ह्यात प्रशासन काम करीत आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी या कामांना सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी वॉररुमची स्थापना करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकतेच यासंदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधून आढावा घेतला. मागेल त्याला शेततळे योजनेसाठी आवश्यक निधी जिल्ह्याला दिला असून हा निधी पूर्णपणे उपयोगात आणा, असे आवाहन केले आहे.

संपर्क : ०९७०२८५८७७७

## शेततळे कुठे आणि का ?

**गेल्या ५ वर्षात एक वर्ष तरी ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी जाहीर झालेल्या गावांमध्ये संरक्षित व शाश्वत सिंचनाची उपलब्धता करणे यासाठी शासकीय नियमानुसार तांत्रिक मान्यतेनंतर किमान ०.६० हेक्टर जमीन असणाऱ्या शेतात शेततळ्याला मान्यता दिली जाते. ॲग्रिकल्चर फायनान्स कार्पोरेशन या संस्थेने केलेल्या पाहणीत दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना याचा उपयोग आणि फायदा झाल्याचे म्हटले आहे. त्यामुळे शासनाने यासाठी पुढाकार घेतला आहे.**



## कोणाला मिळू शकते ?

- **शेतकऱ्याकडे कमीत कमी ०.६० हेक्टर जमीन असणे आवश्यक.**
- **शेतकऱ्याने यापूर्वी शेततळी योजनेचा, सामुदायिक शेततळे, बोडी याचा लाभ घेतला नसावा.**
- **७/१२ उतारा आवश्यक.**
- **८-अ नमुना आवश्यक.**
- **बँकेचे पासबूक आवश्यक.**
- **स्वत:च्या स्वाक्षरीसह केलेला अर्ज आवश्यक.**
- **दारिद्र्यरेषेखालील असल्यास यादीतील अनुक्रमांक आवश्यक.**
- **आधारकार्ड असल्यास त्याचा क्रमांक.**
- **आत्महत्याग्रस्त कुटुंबाला प्राधान्य.**




@Dev_Fadnavis

**शासनाने घेतलेले निर्णय व योजनांची माहिती तातडीने देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ट्विटर माध्यमाचा अत्यंत प्रभावीपणे वापर करतात. यामुळे नागरिकांना शासनामध्ये चाललेल्या विविध घडामोडींची तत्काळ माहिती मिळते. मुख्यमंत्रिपदाची सूत्रे सांभाळल्यानंतर गेल्या दीड वर्षात त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध कार्यक्रमांना, प्रकल्पांना प्राधान्य दिले. त्यासंबंधी त्यांनी वेळोवेळी केलेल्या काही ट्विटसचा हा आढावा.**

भारतीय राज्यघटनेचा अभ्यास करणाऱ्या चिमुकल्या गौरीचे कौतुक करताना...

Surprised & proud to know about Gauri Kodhe's feat of learning the Indian Constitution by heart. Appreciated her!

जपानमधील कोयासन विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर...

Unveiled the statute of Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar at Koyasan University, Japan. Feelings proud & blessed!

कोयासन व मराठवाडा विद्यापीठादरम्यान झालेल्या कराराची माहिती देणारे मुख्यमंत्री कार्यालयाचे ट्विट रिट्विट केले

Governor Yoshinobu Nisaka witness MoU signing between Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University & Kosayan University

डॉ. आंबेडकरांचे हस्तलिखित प्राप्त झाल्यानंतर...

Honoured to get the copy of handwritten letters of Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar from the delegation today.

डॉ. आंबेडकरांचे लंडन येथील घर

आंतरराष्ट्रीय स्मारक म्हणून सर्वांसाठी खुले होत असल्याचे सांगताना...

Dr Babasaheb Ambedkar stayed in this house when he was studying in London, which is now converted into a Memorial.

**@ लंडन**



**लंडन येथील डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रीय स्मारकाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी उद्‌घाटन केल्यानंतर त्यांचे धन्यवाद मानताना...**

**It was a Historic moment in London. Thank you Hon@narendramodi Ji for inaugurating Dr. Babasaheb Ambedkar memorial.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे चैत्यभूमिला भेट देऊन डॉ. आंबेडकरांना अभिवादन करणारे पहिले प्रधानमंत्री असल्याचे सांगताना...

PM@narendramodi is the 1st PM of India to visit Chaityabhoomi and pay respects to Dr. Babasaheb Ambedkar.

महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकरांना अभिवादन करताना...

Paid tributes to Father of Indian Constitution, Bharat Ratna Dr. Babasaheb Ambedkar on #MahaparinirvanDin Jai Bhim!

कामठी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक व संशोधन केंद्राच्या उद्‌घाटनानंतर मुख्यमंत्री कार्यालयाने केलेले ट्विट रिट्विट केले.

@Dev_Fadnavis inaugurates Dr. Babasaheb Ambedkar Cultural & Research Centre at Dragon Temple Palace, Kampthi, Nagpur

डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक तत्त्वज्ञानामुळे गरिबी दूर करण्याचा मार्ग देशाला मिळाल्याचे सांगणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे ट्विट रिट्विट केले.

Dr. Babasaheb Ambedkar's economic thinking shows us the way to eliminate poverty in this country

इंदू मिल येथील डॉ. आंबेडरांच्या स्मारकाचे भूमिपूजन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. याची माहिती देणारे मुख्यमंत्री कार्यालयाचे ट्विट रिट्विट केले.

@narendramodi @Dev_Fadnavis perform Bhoomipujan for Dr. Babasaheb Ambedkar Memorial at Indu Mill, Mumbai



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित
शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...
सर्वत्र : सर्वोत्तम
लोकराज्य
४ लाख खप ४० लाख वाचक
ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in
रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा
لوک راجیہ
उर्दु लोकराज्य
ऐकायलाच हवा
दिलखुलास
संवाद...
@२५४४
राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार, सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम
लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...
जय महाराष्ट्र
नाबाद...८४४ भाग
दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.२५ ते ८.१० या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम
बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा
महान्यूज
@१ कोटी ७५ लाख
www.mahanews.gov.in
MAHARASHTRA Ahead
English Magazine
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
http://dgipr.maharashtra.gov.in
माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th April 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक